## दिवाळी विशेषांक २०२४

स्त्री मनाशी संवाद साधणारी...

# सखी संवादिका

संपादक

विशाखा विलास पवार



ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य :२०१/-

With best compliments from

Harsh®

Constructions Pvt. Ltd.

Managing Director

**Vilas Birari**

With best compliment from

# KSHATRIYA

INFRASTRUCTURE PVT LTD

Managing Director

**Sanjay Sing**

दिवाळी विशेषांक २०२४

स्त्री मनाशी संवाद साधणारी ...

# सखी संवादिका

-: संपादक :-

**विशाखा विलास पवार**



प्रकाशन : ओम पब्लिकेशन



**ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला.**

**अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.**

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com

# अंतरंग

★ **लेख**


१.आईचे हात-छाया दीक्षित ०५
२.सान्वी, बाप्पा आणि सांताक्लॉज-कविता झुंजारराव ०७
३."ती" आफ्टर लॉकडाउन...-शितल चेंदवणकर ११
४.या पावसाची रीतच न्यारी-सीमा पाटील १५
५.आनंदाचा झरा-अस्मिता सावंत १७
६.बहुगुणी मीठ-ओमनी फिचर्स २१
७.फॅशन काळाची गरज-नीता गोळे २५
८.माझी माय- पुष्पा लंकेश्वर ३३
९.सौंदर्याला आधुनिकतेची जोड-वृषाली भोईर ३५


★ **कथा**


१.जीवन संजीवनी- माधुरी चौधरी ३९
२.पूत्र असूनी- साधना झोपे ४७
३.वसंत ऋतू- स्मिता हर्डीकर ५१
४.नाही कशी म्हणू तुला-नेहा उजाळे ५५
५.आयुष्याच्या संध्याकाळी- माधुरी चौधरी ७१
६.माहेर एक हिरवळ-कल्पना मापूसकर ७५
७.दोष कुणाचा-सुनीता देहरकर ७७

★ काव्यविश्व ८८
★ पाककृती ९४

# संपादकीय !


## जगण्याचे भान

एक स्त्री म्हणून वाटणारी खंत आता वाढत चालली आहे. एकीकडे आपण अती उच्च ज्ञान संपादन करत आहोत. स्त्री म्हणून परिपूर्ण होत आहोत. तर दुसऱ्या बाजूला स्त्रीवर होणारे अत्याचार कमी होत नाहीत, तर त्यामध्ये लक्षणीय, धोकादायक अशी वाढ झाली आहे. त्यासाठी कोणाला जबाबदार धरावे? असे प्रश्न आपल्याला नेहमी पडत असतात. इतकी अमानुषता वाढत चालली आहे की, माणसाला स्वत:ला कळत नाही की तो काय करत आहे! महिला सक्षमीकरण खरंच घडत आहे का? की फक्त 'लाडकी बहीण' इत्यादी योजनांवर आपण समाधान मानत आहोत? खरंतर स्त्री किंवा पुरुष यांनी जगण्याचे भान ठेवून जीवन जगायला हवे. म्हणजे संपत्ती, साम्राज्य वाढायला हवे. पण त्याचा विपरीत हव्यास नको. तसेच अति भौतिक सुखाची लालसा नको. अति हव्यासापोटी माणूस 'माणूस' न राहता त्याचं जनावर होत आहे. त्यात फक्त पुरुषच असतात असं नाही, स्त्रियाही तितक्याच गुन्हे करण्यात पुढे आहेत. असे कितीतरी रिसर्च नंतर समोर आले आहे. स्त्रियांमध्येही द्वेषाची भावना, सूडबुद्धी, सुखवस्तू जगण्याची लालसा हे सारं वाढलेलं दिसत आहे. ह्यासाठी स्त्रीदेखील कोणत्याही थराला जाताना दिसत आहे. सायबर क्राईम मध्ये तर स्त्रिया गुन्हे करण्यात अग्रेसर दिसत आहेत! खोटे गुन्हे दाखल करून आपल्या सासरच्या लोकांना, आपल्या सहकाऱ्यांना तसेच आपल्या वरिष्ठांना त्या जाळ्यात ओढत आहेत. अति स्वच्छंदी जीवनाचा उपभोग घेण्याकरता त्या एक पायरी वरतीच आहेत.

तर, स्त्री असो वा पुरुष आपण थोडं विचार विचारपूर्वक वागायला हवं. आपल्या गरजांवर थोडा ताबा ठेवला असता, थोडे संयमाने वागलो, तर आपण सगळे एक समृद्ध आणि आनंदी जीवन जगू शकतो. चला तर ह्या दिवाळीत आपण सर्वांनी ह्या विचारांचा ज्ञानदीप लावू आणि ही दिवाळी प्रकाशमय करू .

**वाचकांना दिवाळीच्या अनेक शुभेच्छा!!!**

**शुभ**
**दीपावली**


टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
सोनेरी क्षणांनी सजलेली, चैतन्याची दिवाळी
सोनेतारण कर्ज
गृहकर्ज
शैक्षणिक कर्ज
ॲसेट बॅक्ड क्रेडीट
ऑटो फायनान्स कर्ज
एसएमई कर्ज
औधोगिक सौर योजना
टीजेएस्बी संदेश
संयुक्ता अकाउंट
फॉरेक्स सर्विसेस
टीजेएस्बी सोसायटी ॲप
डिजिटल (क्यु.आर. कोड, युपीआई लाईट, नेट बँकिंग, डेबिट कार्ड), मोबाईल बँकिंग, बीबीपीएस
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 I 1800 223 466

# आईचे हात

- छाया दीक्षित

**संगोपन करणारी माय, ममता खऱ्या अर्थाने आज जाणवू लागली. "पण ती आज नाही." झोपताना गोड अंगाई, घरात शांतता, बाळ उठेल झोप पुरेशी झाली पाहिजे,त्याला रडू नाही द्यायचे; टाळू पडते.**

नातवंड झाल्यावर कळलं.!
काय म्हणता ?
अहो, आईचा हात.
मुलीला बाळ झाले.

काही वेळाने मी तिला बाळ देत होते. तिने असे नजाकतीने घेतलेले पाहून कौतुक वाटले. त्याच क्षणी आईचे हात आठवले! क्षणभरासाठी डोळ्यांत पाणीही आले आणि नातवंडासोबत आईला आठवणे सुरू झाले. आज ती नाही. पण मला मोठे करताना तिचे हात असेच नाजूक होते हे जाणवले मला.

हे सारं किती लक्षपूर्वक असतं. त्या बाळ जीवाला काही कळत नसतं. त्याला मोठे करणे आपलीच जबाबदारी, तिथे कसलीही मनमानी नसते हे लक्षात आले. शिस्त आणि वेळ पाळलीच पाहिजे, नाहीतर म्हणे बाळाला मोडशी होते.

स्वच्छ सुती जुन्या मऊ कपड्यात लपेटून उबदार हाताळणं. जराही धसमुसळेपणा नाही. आंघोळीच्या वेळी तेल मॉलीश,रोज अभ्यंग स्नान. शरीरातील नाजूक नसांना वाढवण्यासाठी हा उपाय. नाजूक पोटासाठी पचन क्रिया तयार करण्यासाठी बाळगुटी सहाणेवर उगाळून तेही एक, दोन मात्रा रूपाने हळूहळू वाढ करत. संगोपन करणारी माय, ममता खऱ्या अर्थाने आज जाणवू लागली. "पण ती आज नाही." झोपताना गोड अंगाई, घरात शांतता, बाळ उठेल, झोप पुरेशी झाली पाहिजे,त्याला रडू नाही द्यायचे;टाळू पडते.

स्वतःच्या हाताने तूप-भात मऊ करून घास भरवतांना काऊ, चिऊची ओळख करून विश्वाचे ज्ञान देणारी. पापा गोड आवाजात म्हणत बोटाला पकडणारी, पहिले अक्षर आपल्या हाताला धरून गिरवू लागणारे हात.

या साऱ्या आठवणी नव्याने डोळ्यासमोर

आल्या ते चिमुकले हात 'आजी खा' म्हणून मायेने मला घांस भरवत. हाताला हात धरून इंग्रजी अक्षरे गिरवून घेतं आजी.....,'तुला कळत नाही'! फार गोड म्हणतोय. आई हात तुझा आजही मला कळतो, जाणवतो. आज तो हाताला धरून बागेत नेतो. फिरवून पाय मोकळे करून लाडाने घरी आणतो. तिथे मला आईचा हात भासतो.

नाळ घट्ट ममतेची
आई नंतर नातवांची
स्पर्श तसाच कोमल
आठवण जुन्या क्षणांची...




## किचन टीप्स

१.ओल्या नारळाची वाटी शिल्लक राहिली तर टिकण्यासाठी थोडेसे मीठ चोळून ठेवावे.


२.नारळाचे दूध काढल्यावर चव फेकून न देता, त्यामध्ये कांदा आणि डाळीचे पीठ घालून भजी करावी. अत्यंत रुचकर भजी होते.

३.कणिक चाळताना चाळणीत दोन-चार नाणी टाकली तर पीठ लवकर चाळले जाते.

४.भेंडी चिरताना हाताला थोडेसे तेल लावल्यास भेंडीचा बुळबुळीतपणा हाताला न लागता, काम सोपे होते.

५.पुलावासाठी तांदूळ शिजवताना त्यामध्ये एखादा चमचा साखर घातल्यास शितं मोकळी होतात.

६.जायफळ टिकण्यासाठी रांगोळीमध्ये पुरून ठेवावी. त्यामुळे कीड लागत नाही.


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
मराठमोळा
साजश्रृंगार
आमच्या
मासिक भिशी योजनेत
सहभागी व्हा...
आणि मिळवा आकर्षक लाभ!
नातं विश्वासाचं...
चिंतामणी®
ज्वेलर्स (इंडिया) प्रा. लि.
ठाणे • डोंबिवली
नितिन कदम एंटरप्राइज
ठाणे: जांभळी नाका, ठाणे (प) 022 2543 2241 / 42 / 43
डोंबिवली: फडके रोड, डोंबिवली (पू) 0251 2470 117 / 18 / 19 / 10

## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

'अर्थ' सार्थ करणारी पतसंस्था

# सह्याद्री

नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिवंडी

(रजि.नं.: टी.एन.ए./बी.डब्लु.आय./आर.एस.आर./सी.आर./३८१/१९९२)

कार्यक्षेत्र संपूर्ण ठाणे जिल्हा

---

# सिंधूदुर्ग नागरी सहकारी पतपेढी मर्या.

## अंबरनाथ

ए विंग, वर्धमान नगर, पहिला मजला, शिवाजी नगर रोड, वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व)

---

## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# खान्देश विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था म., भिवंडी

अध्यक्ष- श्री. साईनाथ (भाऊ) आर. पवार

उपाध्यक्ष- श्री. तुलसीदास गणपत पाटील

# सान्वी, बाप्पा आणि सांताक्लॉज

**- कविता झुंजारराव**

**सान्वी तशीच उठली व थेट देवघरातल्या बाप्पासमोर उभी राहिली. हात जोडून तिने बाप्पाजवळ काहीतरी मागितले. आजीने हसून नातीला जवळ घेतले व तिचा एक गालगुच्चा घेतला. सान्वीचे रडू पळाले.**

आज सकाळपासूनच सान्वी आईवर रागावलेली होती. सान्वी रागावली की तिचे गोरेगोबरे गाल अजूनच टम्म फुगायचे. तिच्याकडे बघूनच आई गालातल्या गालात हसली मात्र आणि नेमके सान्वीचे लक्ष आईकडे गेले.

'आई, मी रागावलेय अन् तू हसतेस ? जा मी बोलणारच नाही तुझ्याशी' इती सान्वी.

'अग, सोन्या, पण तू का बरं रागावली आहेस ? ते तरी सांग.' आई उत्तरली.

'आई, आज माझा वाढदिवस ना ? आणि बाबा आले नाहीत. माझे गिफ्टही नाही. मला नाही बोलायचे तुझ्याशी व बाबांशीपण. अगदी वाईट्ट आहात तुम्ही' सानू म्हणाली.

'वेडाबाई, बाबा येणार होते, पण नाही ना जमलं त्यांना. आता ते दूर आपल्या शत्रूबरोबर लढताएत ना ? आपण तू सांगितलेले गिफ्ट आणू या ना' आई समजूत काढत म्हणाली. पण सानूची कळी काही खुलेना.

'आज तुझ्या सगळ्या मित्र-मैत्रिणींना पण बोलावू या हं राजा आपण. शहाण आहे माझं बाळ' आई सान्वीला जवळ घेत म्हणाली.

'पण मी बाबांना सांगितले होते का, 'मला एक छानशी बाहुली हवी आहे वाढदिवसाला तुमच्याकडून. तुम्ही आला नाहीत तर नो वाढदिवस आणि नो सेलिब्रेशन'. सान्वी पुन्हा फुरंगटून बसली. आता आईला कळेचना काय करावे ते. तिने पर्समध्ये डबा व पाण्याची बाटली ठेवली व ती निघाली ऑफिसला.

जाताना तिने सानूच्या आजीला सांगितले. आज परत लेटमार्क लागला की लवकरही निघता येणार नाही संध्याकाळी. परत लवकर येऊन वाढदिवसाची तयारी करायची आहे.

सानूबाळाची समजूत काढायची आहे.

इकडे सानूची आजी सानूची गंमत पहात होती. सानूच्या टपोऱ्या डोळ्यांत हलके हलके पाणी जमू लागले होते. मनाशी काहीतरी ठरवून सान्वी उठली व थेट आजीकडे आली.

'आजी आज माझा वाढदिवस आणि ख्रिसमस पण. आम्हाला शाळेत शिकवलेय. सांता आम्हा लहान मुलांना काय हवे ते देतो आम्ही मागितल्यावर! मग मी आत्ता जाते सांताला सांगायला. मग तो मला पण देईल ना मला हवे ते.' सानू आजीला मिठी मारत म्हणाली.

आजीने तिला प्रेमाने जवळ घेतले व एक पापा घेत म्हणाली 'सानू बाळा, अग सांता काय आणि आपला बाप्पा काय. दोघेही एकच. तू मनापासून आपल्याही बाप्पाला सांगितलंस ना तर तोही तुझे ऐकेल बघ'.



सान्वी तशीच उठली व थेट देवघरातल्या बाप्पासमोर उभी राहिली. हात जोडून तिने बाप्पाजवळ काहीतरी मागितले. आजीने हसून नातीला जवळ घेतले व तिचा एक गालगुच्चा घेतला. सान्वीचे रडू पळाले. ती मैत्रिणींबरोबर खेळायला खाली पळाली. इकडे सानूच्या आजीने सानूच्या बाबांच्या मित्राला रवीला फोन केला. त्याला सर्व सांगितले. त्याच्याशी बोलल्यावर आजीला पण बरे वाटले. तिच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

संध्याकाळ झाली. आई लवकर आली आज ऑफिसमधून. येताना केक, सानूसाठी साधाच पण छानसा फ्रॉक आणला. मित्रमैत्रिणींसाठी चॉकलेटस, फुगे असे बरेच काही. छोटेसच घर साधेपणाने पण खूप छान सजवले. सान्वीला छान तयार केले. नवीन फ्रॉक घातला. तिचे औक्षण केले.

सानूची इमारतीमधील सगळी छोटी दोस्त मंडळी आली होती. तेवढ्यात दारात पावले वाजली. दरवाज्यात रवीकाका, बाबांचा जिवलग मित्र उभा होता भले मोठे प्रेझेंट घेऊन, सानूसाठी.

'रवीकाका' अशी हाक मारतच सान्वी रवीला जाऊन बिलगली. रवीने तिचा एक गोड गोड पापा घेतला व तिच्या हातात प्रेझेंट देत म्हणाला 'सानू, तुझ्यासाठी बाबांनी बघ काय पाठवले आहे. बाबांनी फोन केला होता मला. त्यांनी निरोप दिलाय तुझ्यासाठी की ते लवकरच तुला भेटायला येणार आहेत. आतासुद्धा त्यांना घरी यायच होतं गं. पण त्यांना जमलंच नाही यायला. ते तिथे आपल्या शत्रूशी लढतायत ना. त्यामुळे सुट्टी नाही मिळाली त्यांना. त्यांनी सांगितले मला की, माझ्या सानूसाठी छानशी बाहुली घेऊन जा माझ्यातर्फे.

आता खुश ना राजा ?’

ती बाहुली पाहून आणि रवीकाकाचे बोलणे ऐकून सानूचा राग कुठल्याकुठे पळाला. ती धावत देवघरातल्या बाप्पासमोर उभी राहिली.

‘आजी म्हणाली ते खरचं आहे. सांता काय आणि तू काय सारखेच. मी बाबांबद्दल बोलले बाप्पाला आणि लगेच बाबांचा निरोपही आला व गिफ्टही. Thank you बाबा’. सान्वी म्हणाली.

आजीच्या आणि आईच्या डोळ्यांत आता आनंदाश्रू तरळत होते आणि रवीकाकाच्या चेहऱ्यावर हसू.



## ओळखा आदर्श बायको...

तुमची बायको आदर्श व गृहकृत्यदक्ष आहे हे तुम्ही कसे ओळखाल ?
भात चिकट झाल्यास...
तांदूळ नवीन होता.
चपात्या कडक झाल्यास...
चांगले दळून दिले नाही.
चहा गोड झाल्यास...
साखर जाड होती.
व चहा पातळ झाल्यास...
दुधात पाणी जास्त होतं.
लग्नाला जाताना...
कुठली साडी नेसू ? मला चांगली साडीच नाही !
घरी लवकर आल्यास...
आज लवकर कसे आलात ?
उशीर झाल्यास...
इतका वेळ कुठे होतात ?
एखादी वस्तू स्वस्त आणल्यास...
तुम्हांला सगळे फसवतात.
महाग आणल्यास...
तुम्हांला कुणी आणायला सांगितलं होतं ?
जेवणाचं कौतुक केल्यास...
मी दररोज करते.
नावं ठेवल्यास...
तुम्हांला मेलं कौतुकच नाही कशाचं
एखादं काम केल्यास...
एक काम कधी धड करीत नाहीत.
न केल्यास...
तुमच्या भरवशावर राहिले तर एकही काम होणार नाही.

# ब्युटी टीप्स

## फेस मास्क

त्वचेची स्वच्छता जितकी गरजेची आहे तितकीच त्वचेची काळजी घेणे गरजेचे असते. फेस मास्क हे त्वचेसाठी गरजेचे असतात. त्वचेला हवे असलेले घटक फेस मास्कमधून मिळतात. त्वचा अधिक चांगली करण्यासाठी, त्वचेला थंडावा देण्याचे काम फेस मास्क करते. कोणतेही ऑर्गेनिक फेस मास्क चेहऱ्याला एकदा तरी लावा. त्यामुळे त्वचा अधिक चांगली होण्यास मदत मिळते.

## एक्सफोलिएट

त्वचेची काळजी घेण्यामध्ये एक्सफोलिएट देखील येते. त्वचा स्वच्छ करण्यासाठी त्वचा स्क्रब करणे गरजेचे असते. बाजारात असे एक्सफोलिएटर मिळतात. ते तुम्ही नक्की वापरायला हवे. स्क्रब हे त्वचेच्या पोअर्समध्ये अडकवलेली घाण काढून त्वचा स्वच्छ करण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा एक्सफोलिएट आठवड्यात एकदा तरी करा.

## सनस्क्रीनचा करा वापर

सनस्क्रीन हे त्वचेसाठी मस्ट असते. तुम्ही अगदी घरी जरी असलात तरी देखील तुम्ही मॉश्चरायझर नंतर सनस्क्रीन लावायलाच हवे. सनस्क्रीनमुळे तुमच्या चेहऱ्यावर एक संरक्षण कव्हर तयार होते. त्यामुळे त्वचेचे संरक्षण होते. उन्हात जाण्याआधी सनस्क्रीन लावायलाच हवे. त्यामुळे त्वचा चांगली राहते. हल्ली त्वचेच्या प्रकारानुसार सनस्क्रीन मिळतात. त्यामुळे तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार तुम्ही सनस्क्रीन निवडायला हवे.

## मेकअप करा रिमूव्ह

मेकअप तुम्हाला सुंदर करतो. घरच्या घरी मेकअप करून सुंदर दिसायला सगळ्यांना आवडते. हा मेकअप तुमच्या त्वचेवरून उतरवणेही तितकेच गरजेचे असते. मेकअप केल्यानंतर तो काढणेही गरजेचे आहे. कारण मेकअप हा त्वचेच्या पोअर्सच्या आत जाऊन बसतो. तो काढला नाही तर त्यामधील घटक त्वचेवर पिंपल्स आणण्यास कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे मेकअप काढायला कधीही विसरू नका.

With best compliment from

# SHIV- KALA

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD.

B-3, Ganpati Plaza UMC Road, Chopra Court Ulhasnagar-421 003
Tel.: 0251-2708989 / 2705959

---

**With best compliment from**

# NANDLAL THAKUMAL

## CO.OPERATIVE CREDIT SOCIETY LTD.

Shop no. 1, Tilson Market, Ulhasnagar- 421003 Thane

---

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ

श्री. प्रकाश पाटील- अध्यक्ष

श्री. मनोहर जाधव- उपाध्यक्ष

श्री. सुनील घनवट- कार्यकारी संचालक

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

# श्रीमती प्रियांका थोरवे

## कॉन्ट्रॅक्टर

## सार्वजनिक बांधकाम मंडळ ठाणे



# "ती" आफ्टर लॉकडाऊन...

- शितल चेंदवणकर

**आपल्या भारतीय स्त्रियांबद्दल खरंच ही अभिमानास्पद गोष्ट आहे की, ती किितीही वाईट परिस्थिती येवो, पण ती खंबीर उभी असते; हार मानत नाही.**

कधी असतेस जननी तू ,
कधी असतेस भगिनी तू ,
कधी असतेस भार्या तू ,
कधी असतेस मैत्रीण तू ,
प्रत्येक भूमिका तुझी निराळी ,
परी तरीही कधी ना थांबतेस तू ,
झुकतो सदैव हा माथा तुज समोर
करते सलाम तुज "स्त्री शक्ती" तू.....

आपल्या सर्वांच्याच परिचयाची "स्त्री शक्ती" जी आज प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. मग ते क्षेत्र कुठलंही असो; आज तिने स्वतःची अशी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून ऑफिस सांभाळण्यात आज ती सर्वांत पुढेच आहे. पण तरीही आज आपल्या ह्या भारत देशात संस्कृती नांदते ती पुरुष प्रधानांची! आजच्या काळात स्त्रियांबद्दल आदर सन्मान व्यक्त करणारे बरेच आहेत. पण तरीही एक प्रश्न सतत मनाकडे वळण घेतो तो असा की,, खरंच स्त्रियांना स्वातंत्र्य मिळालंय का? आजची स्त्री देशात सुरक्षित आहे का? आज सरकार अनेक उपक्रम, योजना स्त्रियांसाठी राबवताना दिसतात, पण अशा किती सुविधा आहेत ज्या स्त्री-वर्गाला पूर्णपणे प्राप्त झाल्याची नोंद घेतली जाते? सकाळी वृत्तपत्र हाती पडलं किंवा टी.व्ही. चालू केला तर त्यात बलात्काराची एकतरी बातमी आल्यावाचून रहात नाही. "वासना" अशी वाढलेली असते की अगदी जन्मलेल्या चिमुरडीलाही कोणी सोडत नाही. न्यायलयात तर दाद मागता मागता पीडित व्यक्ती मृत्युमुखी पडते! मग आपल्या न्याय व्यवस्थेचा उपयोग तरी काय? कधी कधी तर स्त्रीच स्त्रीची वैरी झालेली दिसते! हे सगळं थांबणार की ?नाही ह्याचं उत्तर कधी कधी वाटत त्या परमेश्वराकडेही नाही!

आजच्या २१ व्या शतकातही कन्यारत्न नको, असल्याची तसेच हुंडा मागणी करणाऱ्यांची संख्याही कमी झालेली दिसत नाही. अशिक्षित स्त्रियांचं काय; पण सुशिक्षत स्त्री वर्गाची सुद्धा हीच अवस्था! आज एखादी स्त्री भरपूर शिक्षण घेऊन नोकरीला लागते तरी कोण ना कोणी एक लांडगा तिच्या वाटेल आलेला दिसतोच! पण माझं मात्र ह्या स्त्री वर्गाला एकच सांगणं आहे ते हे की अन्याय सोसण्यापेक्षा किंवा कोणी तिच्या मदतीला येईल ह्याची वाट पाहत बसण्यापेक्षा तिने स्वतःच स्वतःचे संरक्षण करावे. कारण ती कमजोर नाही हे तिने स्वतःच समजावे. प्रत्येक मातेने आपल्या मुलीला घराची जबाबदारी शिकवता शिकवता स्वतःच्या संरक्षणाचे धडेही नक्कीच शिकवावे. आज जेव्हा जेव्हा मी "स्त्री" विशेष लेख वाचते तेव्हा ह्या मुद्यावर बोलले, लिहिले जातेच; पण त्या पलीकडेही काही मुद्दे माझ्या मात्र नजरेस आले ते असे की, जसा पुरुष आपल्या कुटुंबीयांसाठी झटत असतो. तसेच एक स्त्री सुद्धा तिच्या संसारासाठी झटत असते. मग ती ऑफिसात मॅनेजर हुद्यावर काम करणारी स्त्री असो वा एखाद्या बंगल्यात घरकाम करणारी मोलकरीण असो. तिचा जन्मच मुळी सगळ्यांना सावरण्यासाठी झालेला आहे असं मात्र प्रकर्षाने जाणवते.



साल २०२० हे वर्ष अख्या विश्वाला ग्रहण लावणारे होते. अर्थातच "कोरोना" ह्या भयंकर आजाराने संपूर्ण विश्वावर मृत्यूचे थैमान मांडले होते. पण ह्या आजारावर नियंत्रण मात्र आपल्या थोर शास्त्रज्ञांनी अखेर काळ मिळवले आणि ह्या मृत्यूच्या विळख्याला आळा बसला. आज आपला भारत देश हळूहळू ह्या मोठा संकटातून पुन्हा नव्याने उभा राहतोय. पण ह्या "कोरोनामुळे" अनेक संसार कोलमडले. चोयामाऱ्या, व्यसने ह्या गोष्टी वाढीस लागल्या. अर्थात कारण म्हणजे "पोटाची भूक". "कोरोनाने" माणुसकी काय? जीवन काय? ह्याचा धडा मात्र दिला! पण सर्व सामान्यांच्या मुखातला घास मात्र ओरबाडून घेतला. आता आपण म्हणाल, लेखतर स्त्री वर्गाबद्दल आहे मग कोरोना मध्ये कसा? खरं तर आजच्या ह्या माझ्या लेखामध्ये "कोरोना आणि स्त्री" वर्ग ह्याचा जवळ जवळ संबंध आला आहे. तो असा की, जेव्हा घरातल्या कर्त्या पुरुषाची नोकरी जाते तेव्हा तो टेन्शन कमी करण्यासाठी सर्रास दारू पितो किंवा आत्महत्येचा मार्ग पत्करतो. पण आपण असं कितीसं ऐकलंय की, नोकरी गेल्याने स्त्री दारूच्या आहारी गेली किंवा तिने आत्महत्या केली?

आपल्या भारतीय स्त्रियांबद्दल खरंच ही अभिमानास्पद गोष्ट आहे की ती कितीही वाईट परिस्थिती येवो, पण ती खंबीर उभी

असते, हार मानत नाही. आज सर्वजण हा विचार करतात. "अरे नोकरी गेली लाईफ थांबलं यार " ...! आणि रात्री जेवून विचार करीत झोपी जातात. पण आज अशी किती लोक आहेत जो हा विचार करतात की ह्या लॉकडाऊन मध्ये आणि विशेषतः नंतर ह्या "गृहिणीवर" किती परिणाम झाला असेल ? संसाराचा गाडा पुढे कसा चालवायचा ? हा सतत विचार त्यांच्या मनात येत असतो. एका बाजूला सरकार आज प्रत्येक गोष्टींविषयी विचार करतेय. तर घरातली प्रत्येक गृहिणी मात्र आपल्या कुटुंबातील



कोणीच व्यक्ती उपाशी राहू नये याचा विचार करत असते. ह्याचं उदाहरण म्हणजेच लॉकडाऊन हळूहळू कमी होताना दरम्यानचं आहे. त्या दिवसात ती गोष्ट माझ्या आणि माझ्या मित्रपरिवाराच्या नजरेस पडली होती. तेव्हा ते सत्य इतकं विदारक होत कि डोळ्यांतून पाणी आल्यावाचून राहीलं नाही.

मी आणि माझ्या बिल्डिंग मधील माझे काही मित्र-मैत्रीण रोज जेवण उरकल्यावर फेरफटका मारायला जात असत. त्या दिवशी सुद्धा आम्ही रात्री फेरफटका मारत होतो. तेव्हा आमच्या पुढे एक बाई हातात कापडी पिशवी घेऊन आमच्या पुढे घाईघाईत जाताना आम्हाला दिसली. त्यावेळी आम्ही कोणी विशेष लक्ष दिले नाही. पण हा प्रकार रोजचाच होऊ लागला तेव्हा मात्र आम्ही त्या बाईचा पाठलाग करायचा ठरवलं आणि जे पाहिलं ते पाहून खरंच आम्हाला फार वाईट वाटलं. ती स्त्री रात्रीच्या वेळी भाजी मार्केटमध्ये खाली पडलेल्या भाज्या गोळा करताना दिसली. कारण तिच्याकडे अन्न घेण्याकरिता पैसे नव्हते. हे त्या दृश्यावरून समजले होते. खरं ह्या कोरोनाने माणसाला भूक काय? आयुष्य काय ? ह्याचं महत्तव पटवून आणि दाखवून मात्र दिलं होतं आणि "स्त्री" हि आपल्या कुटुंबीयांसाठी काय करू शकते हेही दाखवून देत होते. तेव्हा माझं ह्या लेखा मार्फत प्रत्येकाला एवढंच सांगणं आहे की, प्रत्येक गृहिणीचा आदर करा. तिची काळजी आणि रक्षण करा. तसेच कठीण प्रसंगात खचून न जाता तिच्यासारखं खंबीरपणे प्रसंगाशी लढा द्या .

माझं ह्या समस्त "स्त्री शक्तीला" नतमस्तक होऊन मानाचा मुजरा.



## टीप्स

# परफ्यूम किंवा अत्तराचा वापर करत असल्यास या गोष्टी लक्षात ठेवा...

परफ्यूम किंवा अत्तराचा वापर करायला आपल्यापैकी बऱ्याच जणांना आवडतं. पण जर का आपल्याला वाटत असेल की, हा वास किंवा सुगंध बराच काळ असाच टिकून राहो, त्यासाठी आपल्याला काही गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. चला तर मग जाणून घेऊ या अशा काही टीप्स ज्यांच्या साहाय्याने हा सुवास बऱ्याच काळ दरवळत राहील.


१. परफ्यूम किंवा अत्तराची बाटली उघडल्यावर त्याचा वापर नियमानं करावा. फार काळ वापरण्यासाठी ह्याला जास्त थंड किंवा गरम जागी ठेवू नये.

२. परफ्यूम जास्त काळ टिकून राहण्यासाठी यावर लेयरिंग करणे आवश्यक आहे. त्वचेवर सेंट लेयरिंग करा. एकाच वासाच्या वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करावा,जसे लेमॅन शॉवर, लेमॅन साबण बॉडी लोशन, लेमॅन युडी कोलन वापरावं.

३.असे परफ्यूम वापरणे जास्त चांगले आहे, जे आपल्या व्यक्तिमत्त्वाला, शैलीला आणि तुमच्या कामाशी मॅच करत असेल.

४.परफ्यूम शरीरातील अशा जागांवर लावावे, जे गरम राहतात. नाडी बिंदू (पल्स पॉइंट)वर ह्याला लावावं.

५. त्वचेपासून २० सें.मी. अंतरावरून स्प्रे करावं.



WITH BEST COMPLIMENTS FROM

CSS

**Mission & Vision**

**To create a cyber safe world**

**ACTIVITIES UNDERTAKEN**

- WORKSHOPS ON THE PREVENTION OF CYBER CRIME
- SEMINARS ON CYBER SAFETY
- GUIDANCE & SUPPORT TO VICTIMS
- PUBLICATIONS ON CYBER SECURITY
- TRAINING PROGRAMS FOR SAFE CYBER LIFE
- DISASTER MANAGEMENT
- AWARENESS CAMPAIGNS
- COLLABORATION WITH LAW ENFORCEMENT

Join our movement and make India a cyber safe country

www.cybersafesociety.org | +919167785599

HAPPY DIWALI

With warm wishes,

**President : Dr. Vilas Pawar    Secretary : Adv. Virat Vilas Pawar**

**M-3, Paradise Tower, Gokhale Road, Naupada,**
**Thane (W), Mumbai, Maharashtra 400602**

SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

# सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :**

संस्थापक / अध्यक्ष

**डॉ. विलास ज. पवार**

ऑफिस : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) -४०० ६०२

०२२-२५३६४१४१ / ९८२११६१६६२

# या पावसाची रीतच न्यारी...

- सीमा पाटील

**कधी मनातल्या मनात झिम्माड आठवणीत नागपंचमीच्या सणाचा झोका इंद्रधनूच्या झुल्यावरून तो आभाळाला भिडवतो आणि परतून खाली येताना अनभिज्ञ रंग अंगावर माखून घेतो; कोणाला न ओळखू येणारे...**

कधी अंगणात बरसतो, कधी मनात गुणगुणतो, तर कधी भरपावसात भिजतो आणि भिजवतो बेधुंद होऊन कधी मनाला, तनाला आणि चिंब आठवणींनाही.. कधी गाणं म्हणत मस्त फेरफटका मारतो गर्द झाडींतून, शिवारांतून, नदीच्या काठावरून, आमराईतून... तर कधी सुरोळीतल्या पाण्याच्या आवाजासोबत सो सो आवाज करत धावणाऱ्या वाऱ्याच्या पाठीवर स्वार होऊन तो सहल करतो, मानवी मनाच्या अव्यक्त गाभाऱ्याची! हो पाऊस असाच असतो!

एखाद्या तिन्हीसांजेला रिमझिमत असतो तो मनातील अध्यात्माच्या ओढीने आणि तेवत असतो देवघरातील वातीच्या मंद प्रकाशात कंदिलाच्या ऊबदार काचेमधील देखणी वात होऊन प्रकाशाच्या वाटेवर !

घरंगळतो तो कधी कौलांवरून, पत्र्यावरून, झरोक्यांच्या तावदानावरून, तर कधी एखाद्याच्या खोचक बोलण्यातून आणि दिङ्मूढ होऊन कुढतो मनातच...हो पाऊस असाच असतो ! पाऊस भिजतो मनसोक्त तडामाडांत, रानजाईच्या जाळीत, तर कधी धो धो वाहणाऱ्या धबधब्याखाली अगदी त्याला हवं तसं..हो पाऊसच तो !

वाफ होतो तो कधी वाफाळलेल्या चहाच्या कपातील...तर कधी वेल्हाळतो सखी सोबतच्या कॉफीच्या घोटामध्ये!.. तर कधी संवादतो त्रयस्था प्रमाणे, भंगता भंगता अभंग झालेल्या मनाच्या सांगता न येणाऱ्या शब्दांच्या पैलतीरावरीलअवस्थेशी ! पाऊसच तो !

कधी तो गप्पांमध्ये जातो रमून बायकोने केलेल्या गरम गरम कांदाभजीसोबतच्या मसालेपापडाच्या कुर्रम कुर्रम आवाजात !

या पावसाचं काही सांगता येत नाही

खरोखर तो असाच असतो! कधी एकाच छत्रीत भिजतो तो अंग चोरून दाटीवाटीने! तर कधी फुलपाखरू होऊन गिरक्या घेतो वाऱ्यासोबत मंद सुगंधी फुलांच्या दुनियेत. हो, या पावसाचं असंच असतं!..

कधी मनातल्या मनात झिम्माड आठवणीत नागपंचमीच्या सणाचा झोका इंद्रधनूच्या झुल्यावरून तो आभाळाला भिडवतो आणि परतून खाली येताना अनभिज्ञ रंग अंगावर माखून घेतो कोणाला न ओळखू येणारे... हो, पावसाचं असंच असतं!

कधी बळीराजाच्या स्वप्नांच्या सोनेरी किनारीत हुरळून जातो त्याच्याही कळत नकळत.. अगदी सुखस्वप्नानी वेडावून रमतो काळ्या पाठीवरील हिरव्या रेघा होऊन! हो, पावसाचं असंच असतं!

रुजतो तो, कधी हिरव्या रानात, तर कधी ओसाड माळावर हरितांकुर होऊन.. पावसाचं असंच असतं!



## टीप्स

# नखांचे आरोग्य राखण्यासाठी नेलपेंट लावताना करू नका ही चूक

**जुन्या नेलपेंटवर नवा कोट देणं**

**नेलपेंट लावण्याची हौस असूनही बऱ्याचजणींना यासाठी पुरेसा वेळ काढता येत नाही. जुनी नेलपेंट काढून पुन्हा नवीन कोट लावण्यासाठी वेळ नसेल, तर काहीजणी जुन्या नेलपेंटवरच नवा कोट लावतात. असं करणं नखांसाठी मुळीच चांगलं नाही. कारण त्यामुळे नखांचे पोषण होत नाही. यासाठी नखं रिमूव्हरने स्वच्छ करावीत आणि मगच नवीन नेलपेंट लावावी.**

**नेलपेंट स्क्रॅच करून काढणे**



**नेलपेंट काढण्यासाठी नेहमी चांगल्या रिमूव्हरचा वापर करावा. कारण जर तुम्ही नखांवरील नेलपेंट नखांनीच स्क्रॅच करून काढली तर यामुळे नखांवर ओरखडे उठतात. नखांचे सौंदर्य यामुळे खराब होतेच, पण नखांची वाढही खुंटते. नखे कायम निरोगी राहण्याची ही चूक कधीच करू नका.**

# दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

## ओम फिल्म

विविध विषयांवरच्या माहितीपटाची / लघुपटांची निर्मिती करणाऱ्या

आमच्या प्रोडक्शन हाऊस साठी :

स्क्रीप रायटर्स  निवेदक कलाकार  कॅमेरामन  पाहिजेत.

**संपर्क : निर्माता/दिग्दर्शक : डॉ. विलास पवार ९८२११६१६६२ /०२२-२५३६४१४१**

एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.

## ओम पब्लिकेशन

**आमच्या ओम पब्लिकेशनसाठी अनुवादक : इंग्रजी/मराठी पाहिजेत.**

**कथा/कविता/चारोळ्या/पाककृती या विषयांबरोबर अन्य विषयांच्या**

**पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेऊन त्यास सहाय्य करणार. यासाठी संपर्क साधावा.**

**ओम पब्लिकेशन, एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२.**

**फोन : ९८२११६१६६२ /०२२-२५३६४१४१.**

For Crises management, Concept Marketing,
Media Management, Event Management, Public Relation &
Other Managing ability and Challenging Works.



Avidmedia
Management & marketing Pvt. Ltd.



**Contacts:**
022-25364141, Cell - 9167785599

# आनंदाचा झरा

- अस्मिता सावंत

**‘आनंदाचे डोही आनंद तरंग’असे आनंदाचे तरंग आपल्या आयुष्यात निर्माण व्हावे यासाठी निःस्वार्थपणे जगता आलं पाहिजे. क्षणिक सुखांच्या मागे न लागता जगण्याचा परमोच्च आनंद व चिरकाल टिकणारा...**

पडणारा पाऊस आणि हिरव्या रानात गेलं की मनाला कसा गारवा जाणवतो, मन आनंदाने भरून जातं आणि मग आपल्याला आठवतं ते निसर्ग कवी म्हणजेच बालकवी आणि मनापासून गुणगुणायला सुरुवात होते ‘आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे’ असा हा सर्व दुःखांना छेदून मिळालेला निर्मळ आनंद आपल्या जीवनाला अधिक समृद्ध करत असतो. बालपणीचा काळ सुखाचा, अत्तराच्या कुपी मधल्या सुगंधित आठवणींचा. बालपणी सगळीच नाती किती काळजी घेणारी असतात. अशा या कोवळ्या वयातील म्हणजेच नकळत्या वयामधला हा आनंद कळणं हे सुद्धा फार दुर्मीळ असतं. कारण भातुकलीचा खेळ खेळताना जो आनंद मिळतो तो मोठे झाल्यावर जीवन जगताना हरवत जातो. मज्जा, हर्ष, उत्साह, समाधान, मोद,आल्हाद, संतोष, प्रमोद, प्रसन्नता, सुख, रस, उद्धव, खुशी यासारखे अनुभूती देणारे शब्द चिंता, ताण, तणाव, मत्सर, भेदभाव ,स्वार्थ, अहंकार या साऱ्यांमुळे विरून जातात. आनंद कुठेतरी नाहीसा होत जातो. माणसाच्या वाढत्या अपेक्षा व गरजांच्या ओझ्याखाली आनंद गुदमरून जातो.घर, करिअर, पैसा, नाव, प्रतिष्ठा यात माणूस यांत्रिक व कृत्रिम होत चालला आहे. नको त्या गरजा पूर्ण करण्यासाठी आयुष्याचे खरं समाधान कशात आहे हे विसरत चालला आहे. केवळ ‘हास्य क्लब’ च्या माध्यमातून हसणं हे तेवढ्यापुरतेच मर्यादित न राहता, चिरतारुण्य देणारा आनंद हेच सकस जीवनाचे सार आहे हे प्रत्येक माणसाने ओळखलं पाहिजे.

तत्त्वज्ञानी ॲरिस्टॉटलने आनंदाची व्याख्या करताना म्हटले आहे की, ‘मानवी जीवनाचे अंतिम ध्येय काय आहे, तर आनंदी असणं’ म्हणजेच

मनाचा व भावनांचा वाहता व सुखावह स्त्रोत म्हणजे आनंद. तथागत भगवान गौतम बुद्धांनी देखील दुःख निवारण्यासाठी संपूर्ण जगाला मैत्रीपूर्ण असा संदेश दिला आहे. ‘मानवाने शुद्ध विचार, आचार अंगीकारले पाहिजे. चांगले बोलणे, वागलो तरच त्याला जीवनाचा खरा आनंद मिळेल आणि मिळालेला आनंद वाटून घेणे. कारण तो वाटल्याने कमी होत नाही, तर वाढत जातो. ‘खरंच आहे. अशा पद्धतीने जीवन जगल्यास मानवाचे भावनिक व मानसिक आरोग्य उत्तम राहील. त्याचबरोबर समाधानी वृत्ती निर्माण होईल. सकारात्मक विचारांची रुजवण होईल. कवी बा. भ. बोरकरांनी आपल्या रचनेत म्हटलं आहे, ‘वोळिती दुःखे जनाच्या, सांडिती नेत्र प्रभा’ असे देखणे दिसा की दुसऱ्यांचे दुःख तुमच्या डोळ्यांतून पाझरले पाहिजे आणि त्यांचे दुःख दूर करता आले पाहिजे.’



‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ असे आनंदाचे तरंग आपल्या आयुष्यात निर्माण व्हावे यासाठी निःस्वार्थपणे जगता आलं पाहिजे. क्षणिक सुखांच्या मागे न लागता जगण्याचा परमोच्च आनंद व चिरकाल टिकणारा आनंद कसा मिळवता येईल, तो कसा जगता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ‘आनंदाने जगणे’ ही जगण्याची एक कला आहे ती. प्रत्येकाने आत्मसात करणे काळाची गरज आहे.


आजच्या आधुनिक जगात माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. सुसंवाद नाहीच पण संवादही कमी झाला आहे. मग सांगा; आनंद तरी कसा निर्माण होणार? पैसा कमावण्याच्या नादात जीवनाचे सुरेल गीत गाण्याऐवजी दुःख, चिंता, ताण यातून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधायला सुरुवात होते. पैशाने आनंद विकत घेणारी लोकं आयुष्यात कधी समाधानी नसतात. म्हणून त्यांच्या चेहऱ्यावरती खरा आनंद दिसत नाही. विभक्त कुटुंबामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, तसेच मुलं घरात एकटी असणं, व्यसन करणं अशा समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्यात त्याचे परिणामही भयंकर घडताना दिसत आहेत. मोबाईल व माणूस याचे इतकं घट्ट नातं निर्माण झाला आहे की, मोबाईलच्या चौकटीतून मिळणारा आनंद महत्त्वाचा वाटतो. आपल्या नाळेपासून, जन्मापासून, सहवासातून निर्माण झालेली नाती दुरावताना दिसत आहेत. या सर्व समस्यांवरती उपायही आपल्याचकडे आहे. या उपायांसाठी ना कोणत्या वैद्याची गरज आहे, ना डॉक्टरांची गरज आहे. फक्त गरज आहे ती भावनिक

ओलावा निर्माण करण्याची आणि प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक व शांतपणे बघण्याची. शांतता व संयमाने विचार केल्यास मन आपोआपच आनंदी राहते यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज नाही. मनापासून आंनदी राहण्याचे ज्यांना ज्यांना उमगलं त्यांची मनं जशी आनंदी असतात तसेच त्यांचे चेहरे देखील आनंदी व प्रसन्न दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावर तेज दिसतं. डोळ्यांतून आत्मविश्वास दिसतो आणि वाणीत गोडवा. त्यांच्याकडे पाहिल्यावर आपल्यालाही आनंद मिळतो. अशा व्यक्तींना आपण पुन्हा पुन्हा भेटतो. त्यांचे विचार, त्यांचा सहवास आपल्याला हवाहवासा वाटतो.

मित्रांनो, बरेचदा घरातील मोठी माणसं मुलांना प्रसंगी रागवत असतात, पण त्या पलीकडे ते जिवापाड प्रेम करतात. आपल्या जीवनात लहान असल्यापासून ते मोठे होईपर्यंत आनंद देत असतात. त्यासाठी आपले नको ते हट्टही पुरवतात. हे जितकं सत्य आहे तितकंच आज समाजामध्ये वृद्धाश्रमांची वाढती संख्या हे देखील वास्तव आहे. ज्या आई–वडिलांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे मुलांना जपून आनंद दिला आहे तो आनंद त्यांच्या वृद्धापकाळामध्ये मुलांनीही टिकवून ठेवला पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने आनंदाचे झाड बहरेल आणि आनंदमयी सुगंध पसरेल.

"आनंदाने जगावे सारे जण प्रत्येकाने
करावा हृदयांकित, दुःख सारून आनंद घ्यावा,
वाटावा आनंद वलयांकित."

पावसाचे थेंब धरणीवर पडल्यावर धरणी मातेला झालेला आनंद, शेतातले पीक बहरल्यावर शेतकरी बापाला झालेल्या आनंद, मुलाने परीक्षेत पहिला क्रमांक मिळाल्यावर कष्टकरी बापाला झालेला आनंद, नवजात बालक जन्माला आल्यावर त्या बाळाला पाहून आनंदी झालेली माता, कवीला सुचलेला एखाद्या नव्या शब्दाचा अर्थ हा किती आनंद देऊन जातो ना! कधीही न जमणारी गोष्ट जमल्यावर झालेला आनंद, आयुष्यात भरपूर कष्ट करून मिळवलेल्या यशाचा आनंद, असे अनेक आनंद येत असतात. असा आनंद शब्दात व्यक्त करता येणार नाही कारण हा आनंद केवळ चेहऱ्यावर दिसत नाही, तर तो डोळ्यांतून पाझरतानाही दिसतो. अशा या घटना, प्रसंगातुन आपल्या आयुष्यात आपल्याला एक वेगळी दिशा देतात. त्यामुळे आनंद हा एक दिशादर्शकही असतो आणि प्रेरणादायी देखील असतो. परिपूर्ण जीवनासाठी प्रभावशाली आनंदी जगणे म्हणजे छंद जोपासणे. मनापासून केलेले आवडीचे काम आपल्याला आंतरिक समाधान देऊन जाते व आनंदही त्यातून मिळत असतो. आपल्याला सगळ्यांनाच माहिती असेल की, फुलपाखराचे आयुष्य किती कमी असतं; परंतु सुंदर असे रंगीबिरंगी फुलपाखरू बागेत फुलझाडांवर उडत असतात



कारण ते प्रत्येक क्षणाचा आनंद घेत असतात. तसचं आपल्यालाही आनंदाचे क्षण टिपता आले पाहिजेत. ‘एक धागा सुखाचा शंभर धागे दु:खाचे’ ही ग.दि.माडगूळकरांची रचना आयुष्याचे सार सांगून जाते. शंभर धागे दु:खाचे जरी असले तरी एक धागा सुखाचा घेऊन शंभर दु:खांवर मात करता आली पाहिजे, एवढं सामर्थ्य आपण निर्माण करू शकलो तरच खऱ्या आनंदाची अनुभूती जाणवेल. सुखाचे व आनंदाचे असंख्य धागे गुंफले जातील यात शंका नाही. आनंद हा आपल्या मानण्यावरही असतो. म्हणजेच आपण ज्यात समाधान मानतो त्यातून मिळालेला आनंद तितकाच समाधानी असतो. सगळ्याच गोष्टी आपल्या मनाप्रमाणे होत नसतात. बऱ्याच वेळा अपयशही येतं. परंतु काही नसण्यापेक्षा काहीतरी असणं हे फार महत्त्वाचं आहे. स्वत:वर विश्वास ठेवून पुढे जात राहणं हे ज्यांना समजलं ते समाधानी झाले व आनंदाने आयुष्याची नौका पार करत राहिले.

शेवटी एवढंच सांगावेसे वाटते की, प्रत्येकाने आपल्या मनाच्या गाभाऱ्यातून आनंदाचा झरा वाहता ठेवावा. आनंदाने जगावे व दुसऱ्यासही आनंद द्यावा. ताणविरहीत जगावे आणि आयुष्याचे सुरेल गीत आनंदाने गात रहावे.

“आनंद या जीवनाचा
सुगंधापरी दरवळावा.”

## कुकींग टीप्स

१. शेवेसाठी डाळ दळायला देताना त्यामध्ये मूठभर पांढरी चवळी घालावी. यामुळे शेव छान हलकी होते.

२. बटाट्याचे वेफर्स करताना काप पातळ चिरावेत आणि थोडा वेळ पाण्यात ठेवून नंतर कोरड्या फडक्याने पुसून घ्यावेत. यामुळे वेफर्स कुरकुरीत होतील.

३. लोणी नेहमी मिठाच्या पाण्यात ठेवावे. यामुळे ते बरेच दिवस टिकते; त्याचप्रमाणे घाण वास येत नाही.

४. केकच्या बॅटरमध्ये थोडे ग्लिसरीन घातल्यास केक मऊ होतो.

५. केळी जास्त पिकली तर काळी पडून वाया जातात. हे टाळण्यासाठी केळी कुस्करून त्यात पुरेशी साखर घालावी आणि हे मिश्रण प्लास्टिकवर थापून केळे-पोळी बनवावी. वाळल्यावर ही पोळी छान लागते.



दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

# साई सिध्दनाथ

## कन्स्ट्रक्शन



शुभ दीपावली

# With best compliment from

MCC

# M.C.CHANDANANI CONST.CO

## REGD.GOVT.CONTRACTORS

OFFICE: A-212, Woodland Complex, New Link Road, Furniture Bazar, Ulhasnagar-3
PLANT: Survery No.35/6, Maharalgaon, Kalyan-Murbad, Post Varap, Kalyan.
Email : mcchandnani@gmail.com

# बहुगुणी मीठ

- ओमनी फिचर्स

**मिठामुळे साखरेची गोडी जास्त लागते म्हणून काही ठिकाणी श्रीखंडात अगदी थोडंसं मीठ घालण्याची पद्धत आहे.**

असं म्हणतात की, मिठाचे १४००० पेक्षा जास्त उपयोग आहेत. एवढे माहीत असणं शक्यच नाही. पण काही थोडे उपयोग असे आहेत की, आपल्या स्वयंपाकघरापासून ते बाथरूमपर्यंतचे अनेक प्रश्न मिठानं सुटू शकतात. भाज्या किंवा पास्ता पाण्यात उकळवताना त्या पाण्यात थोडं मीठ घालण्याची पद्धत आहे. ज्या प्रमाणात मीठ घातलं जातं त्यामुळे पाण्याच्या उत्कलन बिंदूमधे अजिबात वाढ होत नाही. त्यामुळे शिजण्याच्या वेळेत काहीच फरक पडत नाही फक्त पदार्थाचा स्वाद वाढतो.

मिठामुळे साखरेची गोडी जास्त लागते म्हणून काही ठिकाणी श्रीखंडात अगदी थोडंसं मीठ घालण्याची पद्धत आहे. लिंबाच्या सरबतात, कोकम सरबतात, पन्ह्यामध्ये, नारळाच्या दुधात थोडंसं मीठ घातल्याने स्वाद वाढतो. कणकेत किंवा भाकरीच्या पिठातही चवीपुरतं मीठ घालण्याची पद्धत आहे.

२ चमचे जिरेपूड, २ चमचे पादेलोणाची पूड, १ चमचा हिंगपूड व १ चमचा साधं मीठ किंवा शेंदेलोणाची पूड असं एकत्र करून ठेवावं. ताक, लिंबूपाणी यामध्ये किंवा फळांच्या तुकड्यांवर अथवा सॅडलवर घालून खावं. पचनासाठी उत्तम आणि रुची वाढवणारं आहे. यात कधी कधी १ चमचा सुंठपूडही घातली जाते, तर कधी कधी थोडी मिरपूड घातली जाते.


केक, बिस्किटं यांसारखे उच्च तपमान लागणारे पदार्थ करताना शक्यतो साधं मीठ वापरावं. आयोडीनयुक्त मीठ वापरू नये. उच्च तपमानाला पोटॅशिअम आयोडाईडची रासायनिक प्रक्रिया होऊन आयेडिन तयार होण्याची शक्यता असते. ज्यामुळे पदार्थांना उग्र वास येऊ शकतो. आम्लधर्मी पदार्थांच्या संपर्कात आल्यावरही पोटॅशिअम आयोडाईडची प्रक्रिया होऊन आयोडीन तयार होऊ

शकतं. त्यामुळे कैरीची आणि लिंबाच्या रसातली लोणची व व्हिनेगर घातलेल्या चटण्या व लोणची यासाठी आयोडीनयुक्त मीठ वापरू नये.

पॉपकॉर्न, खारे काजू यांसाठी अगदी बारीक मीठ लागतं. मार्गरिटासारख्या ड्रिंक्सच्या ग्लासेसना वरच्या काठाला लावण्यासाठी थोडं जाड मीठ लागतं. असं मीठ लावण्यासाठी प्रथम ग्लासाच्या काठाला लिंबाचा रस लावावा. मग एका बशीत मीठ घालून त्यात तो ग्लास उघडा ठेवावा म्हणजे सगळीकडे काठावर मीठ नीट चिकटतं. मीठ फार बारीक असेल तर ते चिकटत नाही, विरघळून जातं.

घरी आइसक्रीम पॉटमध्ये आइसक्रीम बनवताना ते गोठण्यासाठी बर्फात खडेमीठ घालतात. खडेमिठाचे कण मोठे असल्यानं त्यांचं बर्फाच्या संपर्कात येणारं पृष्ठभागीय क्षेत्रफळ कमी असतं त्यामुळे ते पाण्यात हळूहळू विरघळतात व त्यामुळे बर्फ, पाणी आणि मीठ या मिश्रणाचं तपमान हळूहळू कमी होतं. त्यामुळे आइसक्रीमच्या मिश्रणाचं तपमान हळूहळू कमी होऊन पंखा भांड्यात बराच वेळ फिरत राहिल्यानं मिश्रणात हवा चांगल्या प्रकारे मिसळली जाऊन आइसक्रीम मुलायम व हलकं होतं.

पाच किलो बर्फाला एक किलो मीठ पुरते. जास्त मीठ घातल्यास बर्फ, मीठ व पाणी हे मिश्रण लवकर थंड होतं आणि त्यामुळे आइसक्रीम फार लवकर थंड होतं. त्यामुळे त्यात बर्फाचे जाड कण तयार होतात. बारीक मीठ वापरायचं असल्यास आइसक्रीम मुलायम होईल. हे करावं लागतं कारण बारीक मीठ लवकर विरघळतं. व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं तांब्या, पितळेची भांडी उजळू शकतात. मिठाचा संपृक्त द्राव स्वयंपाकघरातील सिंकमध्ये ओतला तर तेलकटपणा जातो आणि घाणेरडा वास येत नाही. लाकडी टेबलावर गरम थाळ्या किंवा पाणी यामुळे पडलेले पांढरे डाग मीठ आणि तेल यांच्या मिश्रणानं जातात. थोडं मीठ घातलेल्या थंड पाण्यात सफरचंदाच्या, पेअरच्या, बटाट्याच्या फोडी टाकल्यास त्यांचा रंग तसाच राहतो. या गोष्टी अख्ख्या मिठाच्या थंड पाण्यात बुडवल्या तर त्यांची साल काढल्यावरही रंग तसाच राहतो. पालकसारख्या भाज्या मिठाच्या पाण्यात धुतल्या तर लवकर स्वच्छ होतात.



मीठ सूक्ष्मजीवविरोधी असल्यानं मिठाच्या पाण्याच्या गुळण्यांमुळे घशाला आराम पडतो.

१ चमचा अगदी बारीक मीठ आणि २ चमचे बेकिंग सोडा एकत्र करून त्या मिश्रणानं दात

घासल्यास ते पांढरेशुभ्र होण्यास मदत होते आणि हिरड्यासुद्धा मजबूत होतात.

थकवा किंवा एखादेवेळेस आपण खूप दमतो आणि विशेषतः पाय खूप दुखतात अशावेळी मूठभर मीठ घातलेल्या गरम पाण्यात पाय बुडवून ठेवल्यास पायांना आराम वाटतो. मिठाचं पाणी असलेल्या टबमध्ये थोडा वेळ बसलं तर संपूर्ण शरीराचा थकवा जातो.

अंघोळीनंतर त्वचा ओली असताना कोरड्या मिठानं घासली असता मृत त्वचा निघून जाते आणि रक्ताभिसरण वाढते. हा मसाज झाल्यावर पुन्हा अंग पाण्यानं स्वच्छ करावं.

मधमाशी चावल्यास तो भाग ओला करून त्यावर मीठ लावल्यास वेदना कमी होतात. डास किंवा किडा चावल्यास तो भाग प्रथम मिठाच्या पाण्यात बुडवावा आणि नंतर त्या जागी तूप आणि मीठ यांचं मिश्रण लावावं.

आपल्या गॅसच्या शेगडीजवळ मिठाची बरणी कायम ठेवावी. एखादे वेळेस तेलानं पेट घेतला तर ज्वाळेवर मीठ टाकावं पाणी अजिबात टाकू नये. आपण पाण्यात फुलं घालून ती फ्लॉवरपॉटमध्ये ठेवतो त्यामुळे फ्लॉवरपॉटमध्ये डाग पडतात ते घालविण्यासाठी त्यावर मीठ चोळावं. काही वेळा फ्लॉवरपॉटमध्ये खोलवर आपला हात पोचू शकत नाही अशावेळी मिठाच्या जवळजवळ संपृक्तद्राव पुष्पपात्रात ओतून ते चांगलं हलवावं. मग तो द्राव ओतून देऊन साबणाच्या पाण्यानं पुष्पपात्र धुवावं. असं केल्यानं फ्लॉवरपॉट डागविरहित होतो आणि त्याला वासही येत नाही. फ्लॉवरपॉटमधील पाण्यात थोडं मीठ घालून मग त्यात फुलं ठेवली तर ती जास्त काळ ताजीतवानी राहतात.

व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं कपावरचे चहा- कॉफीचे डाग जातात.

बिडाच्या तव्यावर डोसे करताना काही वेळा डोसा तव्याला चिकटून तवा खराब होतो अशा वेळी तो तवा मिठानं घासल्यास एकदम स्वच्छ होतो आणि मग डोसे चिकटत नाहीत.

कांदा-लसणाचा वास हाताला येत असल्यास व्हिनेगर आणि मीठ यांच्या पेस्टनं हात घासल्यास तो वास जातो.

चीजवर बुरशी येऊ नये म्हणून मिठाच्या पाण्यात कापड बुडवून त्यात चीज गुंडाळून मग फ्रीजमध्ये ठेवावं.

मिरच्या, आलं, लसूण वगैरे मिक्सरमध्ये किंवा पाट्यावर वाटताना त्यात थोडं मीठ घातलं तर ते वाटण जास्त सोपं जातं.


आपला नेहमीचा झाडू जास्त टिकण्यासाठी तो नवीन असताना त्याची टोकं एका मीठ घातलेल्या गरम पाणी असलेल्या बादलीत बुडवून ठेवावीत. वीस मिनिटांनी बाहेर काढून झाडू वाळू द्यावा, वाळला की वापरायला काढावा.

आपण स्वयंपाकघरात आणि इतरत्र स्वच्छतेसाठी वापरत असलेले स्पंज खराब होतात. ते पूर्ववत होण्यासाठी १ लिटर पाण्यात पाव कप मीठ घालून त्या पाण्यात बुडवून ठेवावेत. रात्रभर ठेवून सकाळी बाहेर काढावेत. कोरडे करून वापरावेत.

कॅनव्हासच्या बुटांना उन्हाळ्यात वास येऊ लागतो तो येऊ नये म्हणून त्या बुटांमध्ये थोडं मीठ शिंपडावं. ते मीठ आर्द्रता शोषून घेतं आणि घामाचा वास येत नाही.

कचऱ्याच्या डब्याला वास येऊ नये म्हणून त्यातही मीठ शिंपडून ठेवलं तर फायदा होतो.

कधी कधी दूध करपतं किंवा एनॅमलच्या भांड्यात एखादा पदार्थ करपतो. करपलेल्या दुधाचा वास जाण्यासाठी पातेलं ओलं करून त्यात मीठ शिंपडावं. दहा मिनिटांनी पातेलं घासावं. एनॅमलच्या भांड्यातले करपलेले डाग जाण्यासाठी ते भांडं मिठाच्या पाण्यात रात्रभर ठेवावं. दुसऱ्या दिवशी त्या भांड्यात मिठाचं पाणी उकळवावं. डाग जातील.



## नॅचरल मॉइश्चरायजर

पार्लरमध्ये जायला वेळ मिळत नाही. काळजी का करता... तुमच्या त्वचेला सुंदर बनविणारे अनेक पदार्थ उपलब्ध आहेत. त्वचेची सुंदरता आणि कोमलता कायम राखण्यासाठी आपल्या किचनमध्ये अनेक गोष्टी असतात ज्या नॅचरल मॉइश्चरायजरचं काम करतात.

**मध :** त्वचेचं क्लिन्जिंग करण्याचा सर्वांत चांगला उपाय म्हणजे मध. मधाच्या वापरामुळे त्वचा कोमल बनते आणि उजळतेही. यामुळे चेहरा, हातापायाची चमक कायम राहते.

**ताक:** ताक तुमच्या त्वचेतून डेड स्किन सेल्स बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करते. त्यामुळे तुमची त्वचाही एव्हरयंग दिसते. एक सुती कपडा घेऊन तो थंड ताकात बुडवा आणि या कपड्याने आपला चेहरा ५ ते १० मिनिटांपर्यंत झाकून ठेवा. त्यानंतर थंड पाण्यानं चेहरा धुऊन घ्या.

**ऑलिव्ह ऑईल :** गेल्या अनेक वर्षांपासून ऑलिव्ह ऑईल मॉइश्चरायजर म्हणून वापरलं जातं. यामध्ये लव्हेंडर असेन्शियल ऑईलचे काही थेंब टाकून आंघोळीच्या पाण्यात वापरा. त्यामुळे तुमची त्वचा मुलायम होण्यास मदत होते.

**नारळाचं तेल :** नारळाचं तेल खूप चांगलं मॉइश्चरायजर असतं. हे तेल प्रत्येक प्रकारच्या त्वचेसाठी लाभदायक ठरतं. नारळाचं तेल वापरल्यानं अवेळी त्वचेवर सुरकुत्या दिसून येत नाहीत. दोन चमचे नारळाचं तेल, एक चमचा मध आणि एक चमचा संत्र्याचा रस मिसळून त्वचेवर लावा. त्यानंतर कोमट पाण्यानं चेहरा धुऊन घ्या.

**काकडी :** काकडीमध्ये ९५ टक्के पाण्याचा अंश असतो, त्यामुळे ती त्वचेचं मॉइश्चरायजेशन चांगल्या पध्दतीनं करू शकतं. काकडीचा रस चेहऱ्यावर आणि मानेवर ३० मिनिटांपर्यंत लावून ठेवा. त्यानंतर पाण्यानं चेहरा धुऊन घ्या.

**कोरफड :** कोरफड हा सर्वोत्तम उपाय तुम्ही वापरू शकता. कारण त्वचा तेलकट असो वा कोरडी त्यासाठी कोरफड उपयोगी ठरतं. यामध्ये असणारे बीटा- कॅरोटिन, व्हिटॅमिन 'सी' आणि 'ई' त्वचेला स्वस्थ ठेवतात. यासाठी कोरफडीचा गर चेहऱ्याला लावून काही वेळाने धुऊन टाका.. मग पाहा तुमच्या चेहऱ्याची चमक..

With best compliments from

# Aasha Developers




With best compliment from

# Dimple Enterprises

Builder & Developers

**Mahesh Shirke**
**Director**
**9370488011**

Building no. 21/B, 202 Ashok Nagar, Bhiwandi, (E).

# फॅशन- काळाची गरज

**- नीता गोळे**

**साडी जरी स्त्रिने व्यवस्थित घातली थोडा शृंगार केला तरीही स्त्री छान दिसते. उलट तिला साडीसारखे कुठलेही वस्त्र शोभून दिसत नाही. स्त्रिचे स्त्रित्व हे साडीतच आहे. आपल्या देशातील संस्कृती आपण जपली पाहिजे.**

भारतात स्त्री अनेक रूपांनी नावांनी ओळखली जाते. माता, गृहिणी, भगिनी अशी अनेक रूपे गुण तिच्या अंगी आहेत. तिला लक्ष्मीचा, दुर्गामातेचा दर्जा दिला जातो. मायाळू, प्रेमळ, येईल त्या परिस्थितीला झुंज देणारी अशी ही स्त्री आहे. जणू गुणांचा व सौंदर्याचा अमूल्य असा खजिना तिच्यात सामावलेला आहे. स्वर्गात देवदेवतांच्या दरबारात अप्सरा म्हणून ओळखली जाणारी ही स्त्री. स्त्रिला अथांग रूप व गुण दऊन कोणी बरे पाठवले असेल आपल्या वसुंधरेवर! जितकी ती सौंदर्यवान तितकीच मायाळू, आईच्या रूपात ती आपल्या मुलांना इतकी माया देते की, तशी माया कुणीही देऊ शकत नाही. अगदी स्वतःच्या मुलांसाठी तिचे काळीजसुद्धा काढून देऊ शकत नाही. स्त्री ही दोन्ही कुळांचा उद्धार करते. स्त्री ही आई-वडील, पती, भावंडे सासू-सासऱ्यांकडच्या व्यक्तीवर कुठल्याही प्रकारचा स्वार्थ न बघता अथांग प्रेम करत असते. सांभाळ करत असते. घरांतल्या लोकांच्या आवडी-निवडी, कुणी आजारी असतील तर त्यांना औषधी वेळेवर देणे, त्यांची सेवा करणे इत्यादी अनेक कामे ती करीत असते. खरोखर स्त्रीमुळे हे विश्वच सौंदर्यवान झाले आहे. तिच्यामुळेच सगळ्या विश्वाला सौंदर्य प्राप्त झाले आहे. ती कुणाला आवडत नाही असे कुणीच म्हणणार नाही. तिच्या आई-वडिलांना, मुलांना, भावंडांना, पतीला व सासरकडच्या लोकांना ती आवडत असते. जीवनात इतर अभिनय करताना ती शिक्षिकेचे अभिनयसुद्धा अप्रतिमपणे करत असते. ज्यावेळी आपला स्वतःचा प्राण धोक्यात टाकून ती बाळाला जन्माला घालते त्यावेळी तिच्या वेदना बघवल्या जात नाहीत. त्या वेदना फक्त तिलाच माहिती असतात. यानंतर तिचे शिक्षिकेचे रूप सुरू होते. बाळाला बोलायला, चालायला, खायला इतर

सर्व गोष्टी ती शिकवत असते. बाळाला चांगले



संस्कार मिळावेत. म्हणून ती चांगल्या संस्कारित गोष्टी सांगत असते आणि तिला हे रूप प्राप्त करण्यासाठी काही शिक्षण घ्यावे लागत नाही, तर हे रूप प्राप्त होते ते तिच्या मायेमुळेच.

महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कामे सुद्धा करतात. कुणी डॉक्टर, पायलट, अंतराळवीर, इंजिनीयर, पंतप्रधान, राष्ट्रपती, अधिकारा. घरकाम करणाऱ्या स्त्रिया आपले करियर आणि कुटुंब अशारीतीने सांभाळत असतात की, जणू काही तारेवरची कसरतच असते. कुठल्या क्षेत्रांत स्त्रिया मागे आहेत? प्रत्येक क्षेत्रात त्या पुरुषांच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या आहेत. इतकी सामर्थ्यशील महिला अफाट शक्ती, माया, रूप, गुण असलेली आहे. खरोखर स्त्री - वर्गाचे कौतुक करण्यासारखेच आहे. ती रिक्षा चालवू शकते, ती हमालाचे कामसुद्धा करू शकते. तसेच ती बसचालक, कंडक्टर सुद्धा आहे. एकदा मी जळगावला गेले होते आणि तेथून मला आईकडे जायचे होते. मी बसडेपोत गेले असताना तिथे मला बसकंडक्टरच्या गणवेशात चांगल्या आठ ते दहा बायका दिसल्या आणि त्याचक्षणी मला इतका अभिमान वाटला त्या स्त्रियांचा. गावाकडेसुद्धा स्त्रिया मागे नाहीत. तर खरोखर अशा स्त्रियांचा मला हेवा वाटतो. कुटुंब सांभाळता सांभाळता स्त्रिया देशालाही सांभाळण्यातही काही मागे नाहीत आणि कार्य केले ते इंदिरा गांधी व प्रतिभाताई पाटील यांनी. तसेच तुरूंगात कैद्यांना चांगल्या वळणावर चांगला त्यांना रोजगार मिळत असे. त्यांचे हित साधणाऱ्या त्या पोलिस दलातील किरण बेदी याही स्त्रीच आहेत. कल्पना चावला, सुनिता विल्यम्ससारख्या स्त्रियाही काही मागे नाहीत. त्या अंतराळातसुद्धा जाऊन आल्या आहेत. म्हणजेच स्त्री जात ही किती हुशार, गुणवान अशी आहे.

स्त्री आपले कुटुंब सांभाळते आणि तिला ते सांभाळायला आवडते, तिला उंच भरारी घ्यायला आवडते. म्हणजे थोडक्यात, तिला तिचे करियर करायला आवडते. जितका जिव्हाळा तिला ह्या गोष्टींचा आहे, तितकाच जिव्हाळा तिला फॅशनबाबतीतही आहे आणि फॅशन म्हणजे "स्त्रीचे जीव की प्राण" मग ती कुठल्याही शाखेत असो. अशी कुठलीही स्त्री नाही की तिला फॅशन हा प्रकार

आवडत नाही. एवढेच की, कुणी कमी प्रमाणात फॅशन करते तर कुणी जास्त प्रमाणात करते. फॅशन या अनेक प्रकारच्या आहेत. त्यात कपड्यांची फॅशन, अनेक प्रकारच्या साड्या, ड्रेस, पंजाबी ड्रेस यातसद्धा अनेक फॅशन आहेत. पटियाला, धोती, चुडीदार, पॅरलल, त्यानंतर जिन्स पॅन्ट, थ्री फोर्थ पॅन्ट, वेगवेगळ्या प्रकारचे टी शर्टस, साडीवरचे ब्लाऊज हे वेगवेगळ्या गळ्यांचे, हाताचे वेगवेगळ्या प्रकारचे अशी फॅशन असते. त्यानंतर वेगळ्या प्रकारचे ज्वेलरी, हार, कानातले, अंगठी, बांगड्या, ब्रेसलेट, पीन असे कितीतरी प्रकार आहेत. ज्या प्रकारची फॅशन निघेल त्या प्रकारच्या फॅशनच्या मागे स्त्रिया धावत असतात. आता ज्वेलरी फॅशनच्या बाबतीतही म्हणायचे झाले तर एक ग्रॅम सोन्याचे दागिने घेणे जास्त स्त्रिया पसंत करतात. त्या एक ग्रॅम, पाच ग्रॅम, दोन ग्रॅम असे कमीत कमी सोन्यात अगदी चांगली कलाकुसर केलेले दागिने असतात. तसेच रंगीबेरंगी खड्यांचेही दागिने काही बाजारात कमी नाहीत. वेगवेगळ्या प्रकारच्या टिकल्या, बांगड्या म्हणजे जशी फॅशन बदलत जाते तशी स्त्री ती अवलंबत असते. पूर्वी स्त्रिया कपाळावर कुंकू, केसांचा आंबाडा, नऊवारी साडी, हात भरून काचेच्या बांगड्या; परंतु काळानुसार स्त्रीही बदलत गेली आणि आता कपाळावर कुंकवाऐवजी वेगवेगळ्या साड्यांवर किंवा ड्रेसवर मॅचिंग टिकली, बांगडी, कोणाचा यू कट, कोणाचा बॉय कट, कोणाचा स्टेप कट अशाप्रकारे फॅशन करत असतात. पूर्वी सर्व स्त्रिया साडी घालत होत्या; परंतु आता मात्र बोटावर मोजण्याइतपत स्त्रिया साडी घालतात. जशी फॅशन बदलत गेली तशीच फॅशनबरोबर स्त्री सुद्धा बदलत गेली. तिला हे करायला भाग पाडावे लागले कारण स्त्री ही मुळात प्रगतीपथावर आहे. धकाधकीचे जीवन यामुळे तिला काळानुसार बदलणे भाग आहे आणि फॅशनबरोबरच तिचे विचारसुद्धा बऱ्यापैकी बदलले



आहेत.

देशातल्या प्रत्येक स्त्रिला शृंगार करावासा वाटतो. तिची पहिली आवड असेल तर शृंगार करणे. शृंगार आला म्हणजे फॅशन आलीच. त्यांना लागणाऱ्या शृंगाराचे काही कमी प्रकार नाहीत आणि तिच्या या शृंगारामुळे अनेक व्यावसायिकांना व्यवसाय मिळाले. चलन मिळवण्याचे माध्यम मिळाले. आज कुठल्याही बाजारात जर गेला तर जास्त स्त्रियांच्याच वस्तू आपल्याला दिसतात. स्त्री ही दिसायला कशीही असो; तिने जर शृंगार व्यवस्थित केला तर ती जणू स्वर्गातील अप्सरा या वसुंधरेवर अवतरली आहे! स्त्री ही एक फॅशन कलेचा नमुना

म्हणायला हरकत नाही. स्त्रीला फॅशन करायला तर आवडते, परंतु त्यांच्या घरच्यांना मान्य नसते. कारण बऱ्याच ठिकाणी आपल्या भारतीय संस्कृतीलाही जपणारी काही माणसे असतात. मग अशा ठिकाणाच्या स्त्रियांना मन मारून साडीच वापरावी लागते. काहींच्या घरच्यांना फॅशन केलेली आवडत असेल तर त्या मात्र बिनधास्तपणे फॅशन करत असतात. बऱ्याच स्त्रियांचे मत आहे की, आपण फॅशनेबल राहिले तर काही ठिकाणी करिअरवर सुद्धा फरक पडतो. स्त्रिने साडी जरी घातली तरी त्यावर गळ्यात हार, मॅचिंग बांगड्या,पैंजण, वेगवेगळ्या प्रकारच्या लिपास्टिक्स, नेल पॉलिश अशा कितीतरी वस्तू आहेत की त्यामुळे स्त्रिचे सौंदर्य अगदी खुलून दिसते. कुणीही आपल्या पतीचे मन जिंकण्यासाठी त्याला आवडण्यासाठी, करिअरसाठी, तर कुणी स्वतःच्या समाधानासठी फॅशन करतात. मूळ गोष्ट फॅशन हा स्त्रियांचा एक छंदच आहे. हा छंद घेऊन त्या या भू-मातेवर अवतरल्या आहेत. काही स्त्रिया नोकरीला असतात. त्यांना तिथे गणवेश असला तर गणवेशात त्या समाधान मानतात. काहींचे म्हणणे असते की, आम्हांला जर गणवेश नसता तर आम्ही रोज नवनवीन फॅशन केली असती. मग फॅशन प्रत्येक स्त्रिला करावीशी वाटते, जशी फॅशन बदलत असते तशी फॅशन ती अवलंबत असते. फॅशनच्या मागे धावणारी आजची ही स्त्री आहे. त्याची तिला गरज आहेच. ती जर फॅशनेबल नसेल तर तिला थोडे हीन दर्जानेही बघितले जाते किंवा तिच्या आयुष्यातले जीवनच उद्ध्वस्त होऊही शकते. ही दशा आजच्या काळातली आहे.



एखादा नवरा मुलगा जर नवरी मुलगीला बघायला गेला असेल आणि ती मुलगी जर फॅशनेबल नसेल तर तिला पसंत केली जात नाही. आजकालच्या मुलांनासद्धा फॅशनेबल मुलगी आवडते आणि बऱ्यापैकी फॅशनला वाव दिला जातो. स्त्रिला नेहमी सुंदर दिसावे असे वाटते व वेगवेगळ्या रूपांत दिसायला आवडते. फॅशनमुळे तिला वेगवेगळे रूप मिळते सुध्दा. अशी बहुगुणी स्त्री आहे. मी अनेक माध्यमांतल्या स्त्रियांना फॅशनबाबत विचारले त्यांची मुलाखत घेतली.

प्रथम मी डॉक्टरांची मुलाखत घेतली.

१. डॉक्टर मला म्हणाल्या की, खरोखर फॅशन ही स्त्रियांची आवड तर आहेच; परंतु आम्हांला सुद्धा फॅशन आवडते. आम्ही जर चांगले नीटनेटके फॅशनेबल राहिलो, तर रुग्णालाही वाटते स्वच्छ राहावेसे वाटते. आम्ही जर चांगले राहिलो नाही तर आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांचा बदलेल की, डॉक्टरच्याच अंगी जर स्वच्छता नसेल तर रुग्णांना

काय चांगला सल्ला देणार ! फॅशनही आम्हांला शोभेल अशीच करतो, अगदी प्रमाणातच. आम्ही अलंकारही फार कमी प्रमाणात वापरतो. आम्ही जर फॅशन केली नाही तर आमच्या क्लिनिकवर सुद्धा फरक पडू शकतो.

२. कॉलेजातल्या विद्यार्थिनींना विचारले असता, तिचाही अनुभव मला सांगितला की, फॅशनलाही सध्या खूप महत्त्व आहे. फॅशन हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखादी मुलगी फॅशनेबल नसेल तर तिला महत्त्व दिले जात नाही. तिला अगदी



पायापासून निरखून बघतात व तिरस्काराची भावना, नाक मुरडणे या गोष्टी सहज त्या मुलीच्या बाबतीत घडतात. याउलट जर फॅशनेबल मुलगी असेल तर ती सर्वांना आवडते. तिच्याशी पटकन मैत्रीचा हात पुढे केला जातो. असाच अनुभव मला कॉलेजमध्ये मिळाला, म्हणजे स्वतः मी दृश्य बघितले, फ्रेंडशिप डेचा दिवस होता आणि सगळ्या कॉलेजमधल्या मुलींनी एकमेकींना फ्रेंडशिप बँड बांधायचे होते. सगळ्यांनी अगदी छान छान वेगवेगळ्या प्रकारच्या फॅशनचे कपडे परिधान केलेले होते. झाले काय की, फॅशनवाल्या मुलींनी फॅशनेबल मुलींनाच फ्रेंडशिप बँड बांधले आणि साध्या वेशातल्या मुलींना त्यांनी फ्रेंडशिप बँड बांधले नाहीत. त्यांच्याशी कुणीही मैत्री केली नाही. त्याच्याकडे बघून त्यांनी नाक मुरडले. बिचाऱ्या त्या मुलींचा चेहरा रडका झाला. त्यांना अतिशय दुःख झाले. त्या सामान्य कुटुंबातल्या होत्या. परिस्थितीमुळे त्या फॅशन करू शकत नव्हत्या. मुळात म्हणजे फॅशन ही मर्यादित असावी, मर्यादेच्या बाहेर नसावी. थोडक्यात म्हणजे, फॅशन ही अंगप्रदर्शन करणारी नसावी.

३. शिक्षकांना विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, 'आम्हांला शाळेत ड्रेस वगैरे घालायला बंदी असते. आम्हांलाही वाटते की ड्रेस वगैरे घालावते परंतु काय करणार! आम्हीच जर अतिफॅशन केली तर मुलांना शाळेत चांगले संस्कार देऊ शकत नाही; परंतु आम्ही मर्यादेत फॅशन करत असतो, बऱ्याचपैकी आम्हांला फॅशन करायला मिळते सुद्धा. वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या, चपला, बांगड्या, पर्स अशा प्रकारे फॅशन करत असतो. १५ ऑगस्ट, गॅदरिंग, २६ जानेवारी अशावेळी तर आमची मजाच असते. वेगवेगळ्या साड्या वगैरे घालून जणू काही आमचा फॅशन शोच असतो म्हणून आम्हांला जास्त काही वाटत नाही.'

'आम्हांला बऱ्याचपैकी फॅशन करायला मिळते आणि आमचा एकमेकींचा संवादही होतो की, अग तुझी साडी किती छान आहे. अशा अनेक वस्तू



एकमेकींच्या आम्हांला आवडतात. मग त्या म्हणतात की, आता फॅशन ही आहे म्हणून मीही साडी घेतली आणि आता हॅन्डवर्कच्या साड्यांची फॅशन आहे म्हणून आम्ही त्या साड्या घेणे जास्त पसंत करतो. फॅशन तर करायला हवी, परंतु मर्यादेतच आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आपण जपला पाहिजे.'

४. पदवीधर स्त्रिला फॅशनच्या बाबतीत विचारले असता मला तिचा अनुभव सांगितला. ती स्त्री बी.ए.बी.एड आहे. परंतु नोकरीला नाही. तिने सांगितले की, 'ज्यावेळी मी इंटरव्ह्यू गेले होते त्या ठिकाणी भरपूर स्त्री- पुरुष आले होते. एकेकाला आत इंटरव्ह्यूसाठी कॅबिनमध्ये बोलवत होते, आणि त्यात मीही उभी होती आणि माझ्या मागे माझ्यापेक्षाही फॅशनेबल लेडी होती. बाकी लेडीजची राहणीमानही अगदी साधी होती. माझीही साधीच राहणीमान होती. पाच-सहा जण जायचे अजून बाकीचे होते. परंतु त्यांना न बोलावता माझ्या मागच्या स्त्रिला बोलावले गेले व तिची निवड केली गेली. म्हणजे फॅशनला आधी प्राधान्य दिले गेले. म्हणजे फॅशनला किती प्राधान्य दिले जाते हे मला त्या दिवशी समजले. फॅशन ही केलीच पाहिजे. फॅशनमुळे करियरवर फरक पडतो व स्त्रिचे सौंदर्यसुद्धा खुलून दिसते असे तरी मला वाटते.

५. घरकाम करणाऱ्या स्त्रियांनाही विचारले असता त्या काही त्यांचा अनुभव सांगायला मागे राहिल्या नाहीत. 'मला साडी घालायला जास्त आवडत नाही. ती फक्त पूजेच्या वेळी वगैरे आवडते. मला ड्रेसच घालायला आवडतात. मला शृंगार करायला आवडतो; परंतु माझ्या घरच्यांची ड्रेस तर दूरच परंतु मॅक्सी सुद्धा घरात घालायला परवानगी नाही बरे, असो! नाही तर नाही. साडी का असेना; परंतु साडीसुद्धा वेगवेगळ्या फॅशनची घालायला आवडते. चांगले टीपटॉप राहायला आवडते. कारण आम्ही जर चांगले राहिलो नाही तर लोकही आम्हांला घरकामाला ठेवणार नाहीत. त्यांना सुद्धा वाटते की, आम्ही तर अगदी हायफाय फॅशन करणारे मग कामवालीसुद्धा आम्हांला उत्तम प्रकारची असावी. माणसं बायकांनाही चांगल्या क्वालिटीची घरकाम करणारी स्त्री हवी असते की, जेणेकरून त्यांचे इम्प्रेशन डाऊन होणार नाही याची ते लोक काळजी घेतात. आम्ही जर अगदी साधे राहिलो तर आमच्याकडे बघून माणसे नाक तोंड मुरडायलाही मागे पाहात नाहीत.

६. हाऊसवाईफला विचारले. त्यांचे अनुभव सांगितले की, माझा मुलगा इंग्लिश मीडियमच्या शाळेत ज्युनियर केजीच्या वर्गात होता. मी रोज त्याला शाळेत सोडायला - आणायला जायची. एके दिवशी गॅदरिंग संबंधी माहिती हवी होती. तशी शाळेच्या आवारात नोटीस लावलेली होती आणि ती इंग्रजीत होती. मला नोटीस वाचता तर



आली खरी; परंतु त्याचा अर्थ समजला नाही, मग मी इतर बायकांना त्याचा अर्थ विचारला असता त्या बायका चक्क नाकतोंड मुरडून घरी गेल्या. मला वाटले मला अर्थ समजला नसेल म्हणून त्यांनी नाक मुरडले असेल; परंतु ज्यावेळी मी पंजाबी ड्रेस घालून टापटीप गेली तर त्याच बायका माझ्याशी स्वत: बोलायला आल्या व त्यांनी माझ्याशी मैत्रीही केली. यावरून मला असे दिसून आले की फॅशन ही आजच्या काळाची गरज आहे.' दुसऱ्या हाऊसवाईफला विचारल्यानंतर तिने मला एकच उत्तर दिले की, 'फॅशनमुळे करियरवर काही फरक पडत असेल असं मला वाटत नाही. कारण प्रतिभाताई पाटील या डोक्यावर पदर घेतात. मग आजच्या त्या राष्ट्रपती आहेतच ना. काही स्त्रिया ह्या अंगप्रदर्शनाची फॅशन करतात, मुलीसुद्धा करतात त्यामुळे त्या अनेक वाईट कामाला बळी पडतात म्हणून फॅशन ही प्रमाणात असावी म्हणून मीही म्हणेन फॅशनमुळे जीवनात खूप फरक पडतो; परंतु ड्रेस किंवा पॅन्ट-शर्ट घातल्यामुळे किंवा प्रमाणाच्या बाहेर फॅशन करायला पाहिजे असे काही नाही. साडी जरी स्त्रीने व्यवस्थित घातली थोडा शृंगार केला तरीही स्त्रि छान दिसते. उलट तिला साडीसारखे कुठलेही वस्त्र शोभून दिसत नाही. स्त्रिचे स्त्रित्व हे साडीतच आहे. आपल्या देशातील संस्कृती आपण जपली पाहिजे. स्त्रि ही अशी आहे की, जगाचा उद्धार तिने केला आहे. खरोखरच काहीतरी पुण्य म्हणा की, इतके रूप तिला प्राप्त करून या भुमातेवर पाठवले याहून वेगळे मला काय हवे? म्हणून आपली संस्कृती ही नष्ट होत आहे. तिला सावरायला हवे. भारत देशात संस्कृतीचा साठा आहे. संस्कृतमय देश म्हणून या जगात, विश्वात त्याचे नाव आहे, म्हणून मीही म्हणेन की, फॅशन जरा प्रमाणातच करायला हवी. मुंबईसारख्या स्त्रियांचे सांगायचे म्हटले तर बऱ्याचपैकी स्त्रिया या नोकरीला असतात. त्यांना लोकल ट्रेनने प्रवास करावा लागतो. ऑफीसला जावे लागते. ट्रेनमध्ये बऱ्याच वेळा गर्दी असते आणि मुळात ट्रेनही जास्त वेळ थांबत नाही. म्हणून धावत धावत ट्रेन पकडाची असते. साडी घातल्यामुळे स्त्रियांना ते शक्य होत नाही म्हणून त्यांना ड्रेस हा घालावाच लागतो. मग ती फॅशन आज गरजेची वाटू लागली आहे.'

# फेशियल करताना घेण्यात येणारी काळजी



नॉर्मल स्कीनमध्ये ताजगी व लवचिकपणा असतो अशी त्वचा जास्त तेलकट किंवा जास्त कोरडी नसते. या त्वचेची व्यवस्थित देखरेख नाही केली तर पुरळ पिंपल उठू शकतात. नॉर्मलत्वचा असल्यास सॉफ्ट साबणाने चेहरा स्वच्छ व आकर्षक दिसेल.

**ड्राय स्कीन कोरड्या त्वचेसाठीः** ड्राय स्कीन दिसायला नीरस व कोरडी दिसते. ड्राय स्किनवर नैसर्गिक प्रभाव लवकर पडतो. त्वचेची योग्य देखरेख नाही केली तर लवकरच सुरकुत्या पडायला लागतात. अशा प्रकारच्या त्वचेवर साबण कमी वापरला पाहिजे. ज्या महिलांची त्वचा कोरडी असेल त्यांनी ए, बी, सी आणि डी जीवनसत्त्वाचा उपयोग केला पाहिजे. चेहरा नेहमी ग्लिसरीनयुक्त साबणाने धुतला पाहिजे.

## एलोवेरा आणि टोमॅटो पॅक

१ चमचा मसूर डाळ पावडर, १ चमचा टोमॅटो रस आणि १ चमचा एलोवेरा रस मिसळून पेस्ट तयार करावी. अर्धा तास प्रभावित भागेवर लावून ठेवावी. नंतर स्क्रब करत ताज्या पाण्याने त्वचा स्वच्छ करावी. आठवड्यातून दोनदा हे वापरू शकता.

लिंबाच्या सालांची पावडर एक चमचा दूधात मिसळून पेस्ट तयार करा ही पेस्ट चेहऱ्यावर १०-१५ मिनिट लावून राहून द्या. नंतर गार पाण्याने धुऊन टाका.

## साखर आणि लिंबू

१ चमचा साखर, अर्धा चमचा ग्लिसरीन, १ चमचा लिंबाचा रस मिसळून घ्या. स्क्रबप्रमाणे त्वचेवर मसाज करत लावा. ३ मिनिटे स्क्रब करत राहा. नंतर पाण्याने धुऊन टाका. याने मृत त्वचा आणि टॅनिंग दोन्हींपासून सुटका मिळेल.

# माझी माय

**- पुष्पा लंकेश्वर**

**पतीच्या अल्पशा कमाईत गृहदक्षतेने संसारात मोलाची भर घालणारी आई आमची. मुलांच्या पालनपोषणात तिने कोणतीच उणीव भासू दिली नाही. मुलांचे आरोग्य तिने फार चांगल्या प्रकारे जपले.**

शासनाने स्त्रियांसाठी खूप चांगले व संरक्षणाचे कायदे केले. संविधानामुळे स्त्रियांना सर्व हक्क दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाला पुरुष स्त्री समानतेला अधिक महत्तव दिले. त्यामुळे स्त्रिया ताठ मानेने समाजात वावरतात. स्त्रियांनी पंतप्रधान, राष्ट्रपती, गृहमंत्री इ. महत्वपूर्ण जागा आपल्या कर्तृत्वाने भूषविल्या. उच्च शिक्षण घेऊन स्त्रिया मोठ्या पदांच्या जागेवर कार्यरत आहेत. आपले स्वत्व, आपणही इतरांप्रमाणे चांगले कार्य करू शकतो हे त्या दाखवून देतात. शासनाने स्त्रियांना संरक्षण दिले ही फार जमेची बाजू आहे. त्यामुळे त्या निर्भिडपणे आपले मत मांडू शकतात. अर्थात ग्रामीण व अशिक्षित समाजात स्त्रियांना पाहिजे तेवढे स्वातंत्र्य मिळत नाही. त्यामुळे त्या आपले मन खुले करू शकत नाहीत. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरा यांच्या दबावात वावरत आहेत. वर्षानुवर्षे पतीच्या घरातील वरिष्ठांच्या समोर अदबीने वावरण्यातच त्यांचे आयुष्य नियमबद्ध झाले आहे. एक आश्चर्याची गोष्ट अशी की, सतत नियमाच्या चौकटीत वावरणाऱ्या माझ्या मायने आपला हक्क मिळवण्यासाठी प्रत्यक्ष जज्ज साहेबांना स्पष्ट सांगितले की, 'शेतजमिनीत मला माझा हक्क मिळाला पाहिजे' आणि एका वयोवृद्ध मातोश्रींना त्या जज्ज साहेबांनी तिचा हक्क दिला. ही फार स्तुत्य गोष्ट आहे. अर्थात कधी कोणत्याही गोष्टीची इच्छा आकांक्षा व्यक्त न करणारी माझी माय अचानक सूज्ञ कशी झाली याचे सर्व भावंडांना, आप्तेष्टांना आश्चर्य वाटले. असे म्हणतात की, शिंपल्यात मोती असताना त्याची किंमत कळत नाही पण जेव्हा शिंपल्याबाहेर मोती येतो तेव्हा त्याची खरी किंमत कळते. तद्वत् माझी माय सर्वांना कळली.

'आई सारखे दुसरे दैवत नाही' असे जे



विधान आहे ते खरोखर स्तुत्य आहे. जेव्हा आई आपल्या बाळाला जेव्हा जन्म देते तेव्हा तिचा दुसरा जन्म झालेला असतो. पण बाळाच्या जन्मवेळीच्या आवाजाने तिच्या आनंदाला पारावर रहात नाही. तिला झालेल्या वेदना तिच्या बाळाला पाहून ती विसरून जाते.

माय माझी फार धीराची, कष्टाळू. पतीच्या सेवेत कधीच हेळसांड केली नाही माझ्या मायने. आम्हा आठ भावंडांना जन्म देणारी आमुची माता आमच्या पालनपोषणात, आजारपणात इतकेच काय शिक्षणात आम्हांस मागे ठेवले नाही. अविरत आमची देखभाल करणारी माझी माता. म्हणूनच म्हणावे वाटते की, ' स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिखारी.'

पतीच्या अल्पशा कमाईत गृहदक्षतेने संसारात मोलाची भर घालणारी आई आमची. मुलांच्या पालनपोषणात तिने कोणतीच उणीव भासू दिली नाही. मुलांचे आरोग्य तिने फार चांगल्या प्रकारे जपले. स्वच्छतेची तिला फार आवड. घर छोटेच, पण टापटीप फार करायची. तिच्या हाताल फार चव होती व गोडवाही तितकाच होता. पतीच्या नातेवाईकांची तिने कधी अवहेलना केली नाही. त्यांना सन्मानाने वागवले. वडील शिक्षकी पेशात असल्याने कडक शिस्तीचे भोक्ते होते. विद्यार्थ्यांना त्यांची आदरयुक्त भीती वाटत असे. शालेय अभ्यासात कुचराई करणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षा करायचे. आज त्यांचे विद्यार्थी मोठमोठ्या हुद्यावर आहेत. वडील सर्व पालकांचे प्रिय होते. प्रत्येक नोकरीच्या गावी ते प्रिय झाले. रिटायरमेंटनंतर आजाराने त्यांना ग्रासले व त्यातच त्यांना देवाज्ञा झाली. प्रत्येक मुलाच्या हृदयात त्यांचे विचार त्यांच्या शिकवणीचे पडसाद कायम टिकून आहेत. सर्वजण आपआपल्या पद्धतीने कार्यरत आहेत.

घराचा गाडा ओढता ओढता माझी माय आता थकली. पण वयाच्या ८३ व्या वर्षातही तिने आपले शरीर कार्यरत ठेवले. ती आजही स्वतः सर्व शारीरिक कष्ट घेते. एकच उणीव अशी की, तिला मानसिक आजाराने फारसे सामूहक बोलणे, वावरणे जमत नाही. पण प्रत्येकाची आठवण तिच्या मनात कायम असते. अशा माझ्या मातेचे ऋण या जन्मी फिटणे नाही. तिला आम्हा भावंडांचा खूप खूप सॅल्युट.

आमच्या पित्याने मातेस खूप खूप आदर दिला. तेच संस्कार आम्ही जपले. धन्य ती आमची माता.

# सौंदर्याला आधुनिकतेची जोड

- वृषाली भोईर

**नेहमी वापरात असलेले ब्रँड एकदम बदलून दुसरे सुरू करू नयेत. जर नवीन प्रकार वापरायला सुरुवात केल्यावर त्वचेवर काही अनपेक्षित चमत्कारिक बदल दिसले तर लगेच त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा**

फॅशनची व्याख्या बदलू शकते, पण आरोग्याची मात्र बदलत नसते. बदलून चालतही नाही. श्रीमती पिंटो नावाच्या एक महिला एक दिवस माझ्याकडे आल्या. त्यांची तक्रार जरा वेगळीच आणि काहीशी गंमतीशीर होती ! श्रीमती पिंटोंच्या चेहऱ्यावर गेली दोन वर्षे पुटकुळ्या उठत होत्या. पण पुटकुळ्यांची पद्धत अशी की त्या शनिवार-रविवारी अगदी फुलून येत आणि नंतर आपोआप हळूहळू मावळून जात! गुरुवारी शुक्रवारपर्यंत चेहरा स्वच्छ होऊन जाई. नंतर पुन्हा शनिवारी चेहरा भरून जाई.

पिंटो अगदी वैतागून गेल्या होत्या. त्यांनी दोन वर्षांत अनेक उपचार करून पाहिले. तपासण्या, क्रीम, घरगुती औषधे सगळं झालं. पण शनिवारी - रविवारी पुटकुळ्या चेहऱ्यावर आपल्या हजर! त्यांना तपासले खरं, पण मलाही काय करावं प्रथम समजेच ना! त्यांनी ठरवून टाकलं होतं आता हा शेवटचाच उपाय, यापुढे उपचार बंद. त्यांचा निर्णय कळल्यामुळं माझीही जबाबदारी वाढली होती. मी पहिल्या प्रथम माझा सुरुवातीचा उपचार केला आणि त्यांना त्यांच्या कुटुंबीयांबद्दल विचारलं.

त्यांचे पती मुंबईला एका बड्या आंतरराष्ट्रीय कंपनीत एक्झिक्युटीव्ह होते. ते पुण्याला शनिवार-रविवार यायचे. दोन दिवस कुटुंबात राहून सोमवारी परत मुंबईला जायचे. मिस्टर पिंटो पुण्याला आले की, त्यांना भेटायला घेऊन येण्याबद्दल मी मिसेस पिंटोंना सांगितलं. नंतरच्या शनिवारी पतिपत्नी दोघं कन्सल्टिंग रूममध्ये आले. ते आत येताच इंपोर्टेड सेंटचा मंद सुवास रूममध्ये पसरला. ती दोघं बसली. पिंटोंच्या अंगावरचा वास मला अस्वस्थ करू लागला. वास आवडला नाही तर हा सेंटच मिसेस पिंटोंच्या पुटकुळ्यांना कारणीभूत असेल काय असा विचार

मनात आला म्हणून! मिस्टर पिंटोंना या आफ्टर शेव्हलोशनची खूप आवड. ते शनिवार-रविवार पुण्याला आले की साहजिकच ते इथंही दाढी केल्यावर हे लोशन वापरीत असणार!

दोन दिवस पत्नीच्या सहवासात काढून ते सोमवारी जात. म्हणजे त्यानंतर शनिवारपर्यंत मिसेस पिंटो एकट्याच. मिस्टर पिंटोंना मी सांगितलं की, तुम्ही पुण्याला पुन्हा आलात की दोन दिवस हे आफ्टर शेव्हलोशन वापरू नका. त्यांनी तसं केलं. दोनच दिवसांनी मिसेस पिंटो आनंदी चेहऱ्यानं आल्या आणि सांगू लागल्या, हा शनिवार-रविवार पुटकुळ्या आल्या नाहीत!



अशा तऱ्हेच्या कितीतरी केसेस सांगता येतील. लोशन, क्रीम यांसारख्या सौंदर्यप्रसाधनांमुळे कितीतरी स्त्री-पुरुषांना त्रास भोगावा लागत असतो. पण ते जागरूक राहत नाहीत. सध्याच्या दिवसांत सौंदर्यप्रसाधने आणि फॅशनच्या बाबतीत प्रत्येकाने विशेषतः महिलांनी त्यांची निवड करताना अत्यंत सावधगिरी बाळगायला हवी. खरं म्हणजे प्रसाधनं ही सौंदर्यवृद्धीसाठी तयार केलेली असतात. पण जर कोणी त्यांचे दुष्परिणाम काय होतात हे जर लक्षात घेतलं नाही, तर सौंदर्याऐवजी त्या प्रसाधनांपासून त्रासच होईल.

खाली उल्लेख केलेली सौंदर्यप्रसाधनं नेहमी वापरली जातात आणि त्यांच्यापासून अपायही होण्याची शक्यता असते.

१) **हेअर डाईज :**

आकर्षक आणि तरुण दिसण्यासाठी कलप वापरणारी कितीतरी माणसं असतात. या कलपांमध्ये फेनिल-अलानाईन-डायमाईन नावाचं द्रव्य वापरलं जातं. बऱ्याच पेशंटच्या बाबतीत ते सैतानी उपद्रव देणारं असते! असे कलप वापरल्यानं चेहरा सुजणं, लाल होणं, तसच टाळू, चेहरा आणि डोळ्यांची आग होणं अशा व्याधी सुरू होतात. दीर्घ काळापर्यंत हे कलप वापरल्यामुळे या व्याधी व्यक्तीला कायमच्या चिकटतात.कलप वापरल्यानं त्वचेचा कॅन्सर झाल्याचीही उदाहरणं आहेत. मेहेंदी हा नैसर्गिक कलप असून अत्यंत कमी धोकादायक आहे.

२) **शांपू :**

अनेक सुगंधी शांपूच्या सतत वापरानं डोक्याच्या त्वचेला गंभीर स्वरूपाचे अपाय होऊ शकतात. तसंच शांपूमुळे केसांची चमकही नाहीशी होत जाते आणि केस गळायला लागतात.

३) **साबण :**

बहुतेक सर्व साबणांमध्ये कॉस्टिक सोडा वापरलेला असतो. विशेषतः औषधी साबणांमध्ये जंतू प्रतिबंध द्रव्ये वापरलेली असतात. या द्रव्यामुळे त्वचेला कोरडेपणा येतो. त्यातून पुढे त्वचेचे विकार उद्‌भवू लागतात.

४) **केसांचे सुगंधी तेल :**

जर कुणाला सुगंधी द्रव्यांची ॲलर्जी असेल, तर त्यांनी सुगंधी तेल न वापरणंच इष्ट असतं. कित्येकांना अशी तेलं वापरल्यानं डोक जड होणं, दुखणं अशी दुखणी सुरू होतात. आयुर्वेदिक साबण व सौम्य तेलं विशेषतः खोबरेल तेल वापरणं हितकारक असतं.

५) **कुंकू :**

ज्या रंगाची साडी त्या रंगाची कुंकवाची टिकली कपाळावर हवीच, अशी हल्लीची फॅशन आहे. निरनिराळ्या रंगांची कुमकुमं हल्ली बाजारात मिळतात. त्यात अनिलाईन डाईन आणि मधमाश्यांचं मेण वापरलेले असते. अशा कुंकवांच्या वापरामुळे आगपण आणि कोडसुद्धा होऊ शकतं.



६) **मस्करा व आय शॅडोज :**

या प्रसाधनांमध्ये विविध धातूंचा उपयोग केला जात असल्यामुळं त्वचेचा रंग कायमचा बदलू शकतो. डागही पडू शकतात.

७) **लिपस्टिक :**

लिपस्टिकच्या वापरामुळं ओठ अत्यंत आकर्षक आणि आव्हानात्मक दिसतात, हे खरं असलं तरी काही जणींना यातील मेण आणि रंग अपायकारक ठरू शकतात.

८) **फेस पावडर क्रीम :**

विविध प्रकारच्या फेस पावडरींमध्ये क्रीम्स आणि फाऊंडेशन्समध्ये असे काही पदार्थ वापरलेले असतात की, त्यांची अनेकांना ॲलर्जी असते. त्यामुळं त्वचा लाल होते.

९) **जीवनसत्त्वांचा वापर :**

आपली प्रकृती तंदुरुस्त ठेवण्यासाठी जीवनसत्त्वयुक्त औषधांचा तात्पुरता वापर केला तर त्वचा ठीक राहतेही, पण सततच्या वापरामुळं त्वचा कधीही दुरुस्त होऊ शकणार नाही इतकी खराब होऊ शकते.

१०) **ब्लीचिंग एजंटस् :**

आपल्या त्वचेच्या काळ्या, सावळ्या रंगावर नाराज होऊन बऱ्याच स्त्रिया ब्लिचिंग करून गोरे बनण्याचा अट्टाहास करतात. पण या काळ्या सावळ्या रंगातही सौंदर्य असतं, तेज असतं याची कल्पना स्त्रियांना नसते. या ब्लीचिंग एजंटमध्ये अमोनियाकरण केलेला पारा वापरलेला असतो, त्याच्यामुळं त्वचेला अपायच होत असतो.

११) **नेल पॉलिश :**

सर्वसामान्यपणे नेल पॉलिशमध्ये फॉर्मलडिहाईड लिकर या द्रवाचा वापर केलेला असतो. त्यामुळे पॅरानोसिया म्हणजे नखांचा विकार होऊ शकतो आणि काहीजणींना तर नखापासून दूर

असलेल्या ठिकाणी म्हणजे पायाजवळ इसब वगैरेसारखे विकार होऊ शकतात. याचबरोबर एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, प्रत्येकीला प्रत्येक सौंदर्यप्रसाधनाची ॲलर्जी असेलच असं नाही. प्रत्येकीच्या त्वचेची संवेदनक्षमता वेगवेगळी असते.सौंदर्यप्रसाधनं वापरण्यापूर्वीच नीट दक्षता घेतली गेली तर त्याचा त्रास होण्याचा संभव कमी होतो.

नेहमी वापरात असलेले ब्रँड एकदम बदलून दुसरे सुरू करू नयेत. जर नवीन प्रकार वापरायला सुरुवात केल्यावर त्वचेवर काही अनपेक्षित चमत्कारिक बदल दिसले तर लगेच त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि तो प्रकार वापरणं बंद करावं. किंमत जास्त असलेलं अगदी परदेशी प्रसाधनही एखादीला छळू शकतं. कधी कधी अगदी साधं मलमसुद्धा त्रासदायक ठरू शकतं. तेव्हा निसर्ग आणि नैसर्गिक उपचार हेच खरं. पाण्यानं स्वच्छ धुतलेला चेहरा नेहमीच टवटवीत दिसत नाही का? तेव्हा आपल्या सौंदर्यासाठी आणि आरोग्यासाठी प्रसाधनांचा उपयोग न केलेलाच बरा!




## टीप्स

१. वाढत्या तापमानात केसांना तेलाऐवजी हेअर सिरम लावावं. हे कमी तेलकट असल्यामुळे केस कोमेजत नाहीत.

२. घरातून बाहेर पडताना केस स्कार्फ, टोपी किंवा स्टोलने झाकून घ्यावेत.



३. केस रंगवताना अमोनिया फ्री हेअर कलरचा वापर करावा. त्यामुळे केसांना पोषण मिळून उन्हाच्या दुष्परिणामांपासूनही बचाव होतो.

४. उन्हाळ्याच्या हवामानानुसार हेअर स्टाईल करावी. केसांची वेणी घालावी किंवा हलके वर बांधावेत.

५. केस घट्ट बांधणं टाळावं. यामुळे केस खराब होऊ शकतात आणि केसगळतीची शक्यताही वाढते.

# जीवन संजीवनी

- माधुरी चौधरी

**निधीचे काहीही ऐकून न घेता आदितीने तिचे नाव हुरडा पार्टीत नोंदवून पैसे सुद्धा भरले. निधीने थोड्या नाराजीनेच होकार दिला.**

हातात गरमागरम आले घातलेला वाफाळणारा चहा, शेजारी मोबाईलवर 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे सुमधुर गाणे कानांना तृप्त करत होते.दुसऱ्या हाताने पेपर मधून मधुरीमाचे पान बाजूला काढत आदितीने चहाचा एक जोरदार भुरका मारला. डोळे बंद करून तृप्ततेचा आनंद चेहऱ्यावर पसरवत ती स्वतःशीच हसली. एरवी सामाजिक नीतीमूल्ये सांभाळत आवाजही न करता ओठांचा नाजूक स्पर्श करत चहा पिणारी आदिती एकांतात मात्र चहाचा दिलखुलासपणे आनंद लुटायची. दुसरा भुरका मारावा यासाठी तिने कप ओठांना लावला तेवढ्यात दारावरची बेल वाजली. एरवी पाहुण्यांच्या स्वागतासाठी सज्ज असणाऱ्या आदितीला आता कुणी येणे म्हणजे तिच्या स्वर्गसुखावर दरोडा टाकल्यासारखे वाटले. पण चेहऱ्यावर सुपरिचित सुहास्य पसरवत तिने दरवाजा उघडला. समोर बाल मैत्रीण निधीला बघून तर आनंदाने तिच्या गळ्यातच पडली ती. संपत आलेल्या चहाचा कप पुन्हा भरत दोघींच्या गप्पा सुरू झाल्या. पण निधी मात्र कुठेतरी हरवल्यासारखी बोलत होती.

आदिती आणि निधी सोबतच एकत्र वाढलेल्या अगदी सख्खा बहीणींसारख्या. नशिबाने लग्न होऊन एकाच शहरात आलेल्या.दोघींचे चौकोनी कुटुंब. मुलं आपापल्या व्यापात गुंग झालेली. दोघीही पन्नाशीच्या आसपास. आदिती खाऊन पिऊन सुखी समाधानी. निधीचा नवरा राघव उच्चपदस्थ. सतत बाहेर देश-विदेशात फिरणे असायचे त्याचे. 'बायको म्हणजे घरातील शोभेची वस्तू' अशा मताचा होता तो.

वघव हा फारच व्यभिचारी होता. निधीने आत्तापर्यंत त्याची दोन प्रेम प्रकरणे पकडली होती. तरीही त्याचे हे धंदे सुरूच होते. आईवडील,

मित्रमंडळी सर्वांनी समजावून सांगितले, पण काडीचा उपयोग झाला नाही. नेहमी घराबाहेरच असल्यामुळे त्याला मोकळे रानच मिळायचे. घरी पण तो सतत मोबाईलवर व आपल्याच धुंदीत असायचा. निधीला कसलीही कमी नव्हती. पण राघवच्या अशा वागण्याने तिचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य बिघडत चालले होते.

तिने आई–वडिलांना,सासू–सासऱ्यांना याबाबत कल्पना देऊन त्याला समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न केला. पण दिवसेंदिवस त्याचे वागणे बिघडत चालले होते. मुलेही बाहेर असल्यामुळे त्यांचाही धाक त्याला राहिला नव्हता. दोन्ही मुलेही बापाच्या अशा वागण्याने परेशान होती. त्यांच्या मित्रांनाही हे सगळं काही माहिती होते. त्यामुळे त्यांनाही ओशाळल्यासारखे वाटत होते. या सर्व गोष्टींचा परिणाम निधीवर होत होता. शेवटी निधी नैराश्याकडे वळू लागली. तिला जगणे नकोसे वाटू लागले. आत्महत्येसारखे भयंकर विचार मनात येऊ लागले होते आणि त्याचविचारात ती आज घराबाहेर पडली व आदितीला भेटायला आली होती. आदितीलाही तिच्या या परिस्थितीची पूर्ण कल्पना होती.

अगदी शांततेत चहा पिऊन झाला. पण या वेळात आदिती ही निधीच्या चेहऱ्यावरून नक्की काय झालंय याचा अंदाज बांधता येतो का ते बघत होती. चहा संपता बरोबर तिने सरळ विषयालाच हात घातला.

"काय ग निधी, आज अगदी अचानक आलीस.फोन नाही काही नाही... A pleasant surprise"

"हं... आठवण आली तुझी."

"निधी खरं सांग नक्की काय झालं."

"काही नाही ग ... नेहमीचेच."

"राघव काही बोलला का "

"अगं नुसतच बोलला असता तर ठीक आहे ग, पण आजकाल त्याचं बाहेरख्याली वागणं जास्तच वाढलंय बघ. बर काही बोलायला जावे तर अंगावर धावून येतो. कसं झालंय ना 'धरल तर चावतं' आणि सोडलं तर पळतं."

"तू तुझ्या सासू-सासऱ्यांना समजावून सांगायला सांग की एकदा."

"आदिती अगं तेही प्रयत्न करून झाले बघ. सासूसासरे,आईबाबा, मित्रमंडळी, नातेवाईक सर्वांनी समजावून झाले. मुलांचाही हवाला देऊन झाला. पण त्याला काही फरकच पडत नाही. त्याला अनेकदा कौन्सिलरकडे पण घेऊन गेले पण त्याच्या वागण्यात काहीच सकारात्मकता नाही. राघवला या भरकटलेल्या मार्गावरून परत सुखी संसारात घेऊन



यायला काय नाही प्रयत्न केले? उपवासतापास, गंडेदोरे, व्रतवैकल्य ही करून पाहिले पण काहीही उपयोग झाला नाही. ह्या गोष्टींचा त्याच्यावर काहीच सकारात्मक परिणाम होत नाही. शेवटी मीच

नैराश्याकडे वळू लागलेय. आजकाल माझ्याच जीवाचे काहीतरी बरे बाईट करावे असे वाटतेय मला तर."

असं म्हणत निधी आदितीला बिलगून हमसून हमसून रडू लागली. आदिती मात्र शांतपणे तिच्या पाठीवरून मायेचा हात फिरवत होती. कितीतरी दिवसांनी निधी अशी मोकळी झाली होती.

"हे बघ निधी, तू मेल्यावर राघवला काही फरक पडणार नाही. उलट रान मोकळे होईल त्याला. तो काय आज जे बाहेर करतोय ते घरात करेल. तू मात्र जीवानिशी जाशील. मुलं उघड्यावर पडतील तुझी"

निधीचा हात हातात घेत आदिती बोलली.

"अगं याच विचारांनी तर मी अजूनही जीवंत आहे."

"हो ना? मग सोड आता त्याचा विचार. तू तुझं आयुष्य जग.गुंतवून घे स्वत:ला आवडीच्या कामात."

"अग, पण आता या अशा अर्धवट वयात काय करणार मी? सुरवात तरी कशी अन् कुठून करू?"



"असा विचार का करतेस? आता तर किती काय काय करता येईल तुला. सकाळच्या योगा, झुंबा क्लास पासून तर संध्याकाळच्या भजनी मंडळापर्यंत तू काहीही करू शकतेस. एखाद्या संस्थेसाठी काम करू शकते. वृद्धाश्रम, अनाथाश्रम यांसाठी काम करू शकतेस. आजकाल कितीतरी प्रकारचे क्लासेस असतात ते करू शकतेस."

"अगं पण आता असं अचानक या वयात? मला तर फारशा मैत्रिणी पण नाहीत."

"मग आता बनव की मैत्रिणी. हे बघ आमचा एक मैत्रिणींचा ग्रुप परवा हुरडा पार्टीला जातोय. येणार का सोबत?"

"आदिती, पण हा माझ्या समस्येवरचा उपाय नाही ना."

"मला मान्य आहे, यामुळे राघव बदलणार नाही. अगं राणी, पण तो असाही बदलणार नाहीच. पण तू तर तुझे आयुष्य बदलवू शकतेस ना?"

"कसं?"

"हे बघ, मला मान्य आहे की तू राघवला मुलांसाठी सोडून जाऊ शकत नाही. पण तू त्याचा विचार करणे तर सोडूच शकते ना? जर राघव बदलणारच नसेल तर तू त्रास का करून घेतेस? तू उद्या हुरडा पार्टीला ये. सर्वांना भेट, बघ सर्वजणी कशा जगण्याचा आनंद लुटतात. प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या आहे, पण त्यावर जीवन संपवणे हा पर्याय मात्र कधीच होऊ शकत नाही ना?तू उद्या येते आहेस, बस."

निंधीचे काहीही ऐकून न घेता आदितीने तिचे नाव हुरडा पार्टीत नोंदवून पैसे सुद्धा भरले. निधीने

थोडा नाराजीनेच होकार दिला. थोडी निश्चिंत होऊन निधी घरी गेली. निधी गेल्यावर आदितीने तिची खास मैत्रीण व मेंबर काउंसलर जयाला व ज्योतीला फोन करून निधी विषयी व तिच्या मानसिक स्थिती विषयी सर्व माहिती दिली. त्यामुळे दुसऱ्या दिवशी हुरडा पार्टीत सर्वांनी निधीला हळूहळू पूर्ण इन्व्हॉल्व्ह केले. त्या दिवशी निधी आयुष्यात पहिल्यांदाच एवढ्या मित्र–मैत्रिणींच्या ग्रुपमध्ये आली होती. ती पूर्णपणे त्या ग्रुपमध्ये सामावून गेली. रेन डान्स, जादूचे खेळ बघताना आपण दोन मुलांची आई आहोत हेही ती विसरली. नृत्याचा कार्यक्रम झाला. एकत्र भोजन झाले. सर्वांशी तिची छान ओळख झाली. निघतांना पुढच्या वेळी सुद्धा नक्की येईन असे आश्वासन देऊनच ती निघाली.



निधी आयुष्यात पहिल्यांदाच एवढी खुलली होती. हळूहळू तिने ट्रेकिंगच्या ग्रुप बरोबरही जाणं चालू केलं. सकाळचा जीम लावला. त्यात काही मित्रमैत्रिणी मिळाल्या. शॉपिंगला, सिनेमाला जाणं, गप्पा मारणं, एकमेकांना मदत करणे, काळजी घेणे चालू झाले. या ग्रुप मधून निधीला भरपूर उत्साह, आपलेपणाचा ओलावा मिळू लागला. ती प्रसन्न राहू लागली.

तिच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरही चांगले परिणाम दिसू लागले. तिच्यातील न्यूनगंड कमी होऊन आत्मविश्वास वाढला. आत्महत्येचे विचार येणे बंद झाले व आपण काहीतरी करावे ही भावना प्रबळ होऊ लागली.

राघव मात्र अजूनही तसाच होता. निधी आताशा त्याला फारशी विरोध करत नव्हती.त्याला काही समजावण्याच्या भानगडीत ती फारशी पडत नव्हती. आजही सकाळचा चहा आटोपून तो मोबाईल मध्ये डोके खुपसून बसला. जिमवरून आल्यावर निधी ही चहाचा कप घेऊन राघव जवळ येऊन बसली.

"राघव मला तुझ्याशी काही बोलायचं आहे."

"हे बघ, मला तुझी फालतूची बडबड ऐकायला वेळ नाही.काय ते बोल लवकर"

"मला काही विचारायचं नाही किंवा बोलायचं सुद्धा नाही. मला तुम्हाला स्पष्ट सांगायचे आहे."

निधीचा हा आत्मविश्वास बघून राघव थोडा चरकला. त्याने मोबाईल मधून डोकं वर काढून निधीकडे बघितले. निधी आता त्याच्या डोळ्यांत डोळे घालून बोलत होती.

"मी आणि माझी मैत्रीण श्रेष्ठा आम्ही दोन्ही मिळून एक छोटासा व्यवसाय सुरू करतोय. मी कुकींग क्लासेस घेणार आहे, तर ती बेकींग क्लासेस घेणार आहे."

हे ऐकून राघव जोरजोरात हसू लागला.

"चालू दे तुझा टाईमपास, पण एक गोष्ट लक्षात ठेव मी यासाठी माझा पैसा वाया घालवणार नाही. अशा फालतू गोष्टींसाठी माझ्याकडे फुटकी कवडीपण नाही"

"मला तुमच्याकडून कसलीही अपेक्षा नाही. श्रेष्ठाची जागा आहे व सुरवातीला लागणाऱ्या थोड्याफार पैशांची सोय झालेली आहे. मी फक्त तुम्हाला सांगितले."

निधीचे आजचे बोलणे ऐकून राघवला आश्चर्य वाटले. तिला काहीतरी विचारायचं म्हणून त्याने तोंड उघडले. पण निधी मस्त चहाचा कप हातात घेऊन खिडकीतून बाहेर बघत भुरका मारत चहा पित होती. तिच्या मोबाईलवर सुमधुर आवाजात फिरूनी पुन्हा जन्मेन मी गाणं सुरू होतं. एसी लावलेल्या बेडरूम मधील गारव्यापेक्षा खिडकीतून येणारी गार झुळूक तिला सुखावत होती. तिच्या गालावरचे केस हवेसोबत उडत होते. तिचं मन कधीच स्वप्नात रममाण होऊन स्वातंत्र्याचे झोके घेत होत. तिची द्विधा मनस्थिती कधीच संपली होती. निराशाग्रस्त मानसिकता कधीच मागे पडली होती. तिने जाणूनबुजून तयार केलेल्या मित्र मैत्रिणींच्या गोतावळ्याने तिला जगण्याची उमेद दिली होती. तिला आता राघवला सुधरवायचे नव्हते; तर स्वतःच स्वतःची पाऊलवाट निवडायची होती. थोडा उशीर झाला होता. पण इरादा पक्का होता. लग्नानंतर बावीस वर्षे तिने या घरासाठी दिली होती. राघव उच्चपदस्थ असला तरी मनाने कुजका होता. घरासाठी त्याच्याजवळ कधीच वेळ नव्हता.त्याचा बाहेरख्यालीपणा दिवसेंदिवस वाढत चालला होता. गेल्या पाच-सहा वर्षांपासून ती त्याला सुधरवण्याचा निष्फळ प्रयत्न करत होती, पण पदरात निराशाच येत होती. घर, मुले, नातेवाईक, येणारे जाणारे, सासू सासरे या सर्व पातळ्यांवर ती एकटी लढत होती. उच्चशिक्षित असूनही ती हे सगळं मनापासून प्रेमाने करत होती. तो मात्र तिच्या या वागण्याला तिची कमकुवतता समजत होता, तिला तुच्छ लेखत होता. बाहेरच्या दिखाऊपणाकडे ओढला जात होता. आता मात्र ती बदलली होती. जबाबदाऱ्या पण कमी झाल्या होत्या. मुलेही मार्गाला लागली होती आणि एक आत्मविश्वासाची झळाळी तिच्या वागण्याबोलण्यात दिसत होती.



सकाळचा चहा आटोपून निधी आज निवांत बेडरूम मध्ये येऊन बसली. राघव नेहमीसारखा बेडवर पसरला होता. ऑफिसला जायला अर्धाच तास बाकी होता, तरी मोबाईलवर कुणाशी तरी बोलत होता. संध्याकाळी फिरायला जायचे प्लॅनिंग करत होता. निधीने आज त्याच्याकडे अन् त्याच्या बोलण्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. ती पण बेडवर मस्त फतकल मारून बसली.मोबाईल हातात घेऊन आदितीचा नंबर लावला.

"ए आदि, आज थोडा वेळ आहे का ग ?"

"का ग काय विशेष ?"

"अगं थोडंसं शॉपिंग"

"मॅडम आपके लिये हाजीर है. पण काय विशेष."

"सांगते, ऐक. मी आणि श्रेष्ठा दोन्ही मिळून

छोटेसे क्लासेस सुरू करतोय. रविवारला उद्घाटन आहे. तुला तुझ्या मैत्रीणींना घेऊन यायचे आहे. मी सर्वांना फोन करणारच आहे.त्याच तर माझ्या प्रेरणास्थान आहेत."

"अरे वा.अभिनंदन निधी. तुझ्यातील हा स्पार्क असाच कायम ठेव."

"या सगळ्याचे श्रेय तुला बरं का...तू मला योग्य मार्ग दाखवला नसतास तर आज मी या जगातच नसते. म्हणूनच माझ्या या नव्या व्यवसायाचे उद्घाटन तुझ्या हातून व्हावे अशी माझी इच्छा आहे. तू ये रविवारला."

"अग पण मीच का? एखादी मोठी व्यक्ती बोलाव की उद्घाटनाला."

"हे बघ, माझ्या या वाटचालीत तुझा मोठा वाटा आहे. तू मला वैचारिक मदत केली नसतीस तर आज कदाचित मी या जगातही नसते. मला तूच हवी उद्घाटनप्रसंगी"

"बरं बाई येते.मी पण मिरवून घेते."

म्हणत आदिती खळखळून हसली तशी निधीही दिलखुलासपणे हसली. तिला हसतांना बघून राघव मात्र कुत्सित हसला.

"आदिती उद्घाटन करणार? इथेच तुमची लायकी कळते. अगं, उद्घाटनप्रसंगी एखाद्या मोठ्या माणसाला बोलाव तर प्रसिद्धी होईल."

राघव टिंगल करत बोलला. पण निधीने त्याला उत्तर देणेही टाळले. ती मस्तपैकी गाणं गुणगुणत बेडरूमच्या बाहेर पडली. राघवला तिचे हे वागणे नवीन होते, पण पुन्हा त्याचा फोन वाजला.

"हॅलो"

"हॅलो मी तुमच्या बँकेतून बोलतोय. सर तुम्ही सहा महिने झालेत कर्जाचे हप्ते भरले नाहीत. या महिना अखेर हप्ते भरले नाही तर आम्हाला कारवाई करावी लागेल."



"ए ..... च्या आजपर्यंत सर्व हप्ते व्यवस्थित भरलेच की... आताही भरेल. जरा दम खा की ..... अन् कारवाईची धमकी कुणाला देतो रे हरामी."

"ओ साहेब, शिव्या कुणाला देता. एवढी चरबी आहे तर हप्ते भरा की." म्हणत बँक कर्मचाऱ्यांने फोन ठेवला. बाहेरच्या बायकांवर पैसा उडवणे आणि शान शौकीनपणे वागणे यामुळे राघव आर्थिक दृष्ट्या कंगाल झाला होता. आपले शौक पुरे करण्यासाठी त्याला लाखोचा पगार कमी पडत होता म्हणून त्याने बँकेकडे घर गहाण ठेवून लाखोचे कर्ज काढले होते. आता आता तर तो त्याचे हप्ते पण भरत नव्हता. कर्जाचा डोंगर त्याच्या डोक्यावर वाढत चालला होता.

रविवारचा उद्घाटनाचा कार्यक्रम



छोटेखानी पण सुंदर झाला. निधी खूप खुश होती. तिच्या सर्व मैत्रिणी कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या.सर्वांनी तिचे कौतुक करून तिला शुभेच्छा दिल्या. काही मैत्रिणींनी तर पहिल्या बॅचसाठी नावनोंदणीही केली. अगदी दहा दिवसांतच तिची पहिली बॅच फुल झाली. ती व श्रेष्ठा दोन्हींची मेहनत घ्यायची तयारी होती. विशेष म्हणजे श्रेष्ठाच्या नवऱ्याचे या कामात पूर्ण सहकार्य होते. बाहेरची बरीचशी कामे येता-जाता तो करत होता. थोडेफार प्रयत्न करून त्याने वृत्तपत्रांमधून सुद्धा जाहिरात दिली. त्यामुळे आजूबाजूला माहिती झाले. हळूहळू जम बसू लागला. बायका कुकिंग व बेकिंग दोन्ही प्रकारांना ॲडमिशन घेऊ लागल्या. काम करण्याची जिद्द, भरपूर मेहनत, गोड बोलणे, कामातील सफाईदारपणा व संपूर्ण समर्पण यामुळे दिवसेंदिवस निधी व श्रेष्ठा प्रगतीपथावर वाटचाल करत होत्या. हळूहळू त्यांनी इतर जोडधंद्यांमध्ये सुद्धा प्रवेश केला..

तिचा नवरा राघव मात्र अजून त्याच दुष्टचक्रात अडकलेला होता. तिने त्याला समजवण्याचा एक शेवटचा अतोनात प्रयत्न केला, पण राघव मात्र ऐकण्यापलीकडे गेला होता. आपण उगाच आपली शक्ती वाया घालवतोय हे तिला चांगले समजले होते. तिच्या लक्षात आले की, तिच्या ह्या प्रयत्नांचा राघववर काहीच परिणाम होत नाहीये किंवा होणार नाहीये. तर तिने त्याला सुधरवण्याचा फाजील विचार सोडून दिला.आयुष्यात तिने एक दीर्घ मोकळा श्वास घेतला आणि स्वतःचं एक सुंदर, मोकळ्या मनाचं, निःस्वार्थ मित्र-मैत्रिणींचं असं तिचं आपलं एक विश्व उभं केलं आणि ती तो धागा धरून आनंदाने पुढे जाऊ लागली. ती तिच्या जगात आता खुश होती. मध्ये कर्जामुळे बॅंकेने घरावर जप्ती आणली होती .तर तिने काही दागिने मोडून घर सोडवले. हो; पण घर स्वतःच्या नावावर करायला मात्र ती विसरली नाही. तिच्यातील हा बदल राघवच्या पचनी पडायला जड जात होता. तो त्याच्या मानसिकतेतून बाहेरच पडू शकत नव्हता. पण आता निधीला तो कमी पण लेखू शकत नव्हता. निधी मात्र आदितीने दिलेल्या जीवन संजीवनीच्या जोरावर पुढेपुढे जात होती. तिने तिच्या एका मैत्रिणीसोबत मिळून 'जीवन संजीवनी' नावाचे समुपदेशन केंद्रही सुरू केले. आत्महत्येचे विचार करणाऱ्यांसाठी हे केंद्र काम करतेय. ती अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. नुकताच तिला सामाजिक कार्यांत, उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शासनाचा "सेवाभावी कार्यकर्ती" म्हणून पुरस्कार मिळाला आहे. पुरस्कार घ्यायला ती मंचावर जायला लागली आणि सुंदर गाणं सुरू झालं....

"जीवन चलने का नाम.... चलते रहो सुबह शाम"

# ब्युटी टीप्स

## फेस मास्क

त्वचेची स्वच्छता जितकी गरजेची आहे तितकीच त्वचेची काळजी घेणे गरजेचे असते. फेस मास्क हे त्वचेसाठी गरजेचे असतात. त्वचेला हवे असलेले घटक फेस मास्कमधून मिळतात. त्वचा अधिक चांगली करण्यासाठी, त्वचेला थंडावा देण्याचे काम फेस मास्क करते. कोणतेही ऑर्गेनिक फेस मास्क चेहऱ्याला एकदा तरी लावा. त्यामुळे त्वचा अधिक चांगली होण्यास मदत मिळते.

## एक्सफोलिएट

त्वचेची काळजी घेण्यामध्ये एक्सफोलिएट देखील येते. त्वचा स्वच्छ करण्यासाठी त्वचा स्क्रब करणे गरजेचे असते. बाजारात असे एक्सफोलिएटर मिळतात. ते तुम्ही नक्की वापरायला हवे. स्क्रब हे त्वचेच्या पोअर्समध्ये अडकवलेली घाण काढून त्वचा स्वच्छ करण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा एक्सफोलिएट आठवड्यात एकदा तरी करा.

## सनस्क्रीनचा करा वापर

सनस्क्रीन हे त्वचेसाठी मस्ट असते. तुम्ही अगदी घरी जरी असलात तरी देखील तुम्ही मॉश्चरायझर नंतर सनस्क्रीन लावायलाच हवे. सनस्क्रीनमुळे तुमच्या चेहऱ्यावर एक संरक्षण कव्हर तयार होते. त्यामुळे त्वचेचे संरक्षण होते. उन्हात जाण्याआधी सनस्क्रीन लावायलाच हवे. त्यामुळे त्वचा चांगली राहते. हल्ली त्वचेच्या प्रकारानुसार सनस्क्रीन मिळतात. त्यामुळे तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार तुम्ही सनस्क्रीन निवडायला हवे.

## मेकअप करा रिमूव्ह

मेकअप तुम्हाला सुंदर करतो. घरच्या घरी मेकअप करून सुंदर दिसायला सगळ्यांना आवडते. हा मेकअप तुमच्या त्वचेवरून उतरवणेही तितकेच गरजेचे असते. मेकअप केल्यानंतर तो काढणेही गरजेचे आहे. कारण मेकअप हा त्वचेच्या पोअर्सच्या आत जाऊन बसतो. तो काढला नाही तर त्यामधील घटक त्वचेवर पिंपल्स आणण्यास कारणीभूत  ठरूशकतो. त्यामुळे मेकअप काढायला कधीही विसरू नका.

With best
compliments from

# Mayur
# Construction

Prop- Balkrishna Thakre
Sandip Thakre

Happy Diwali

# With best compliments from

इंडियान्युजनेट डॉट कॉम

Indianewsnet.com™

The News Portal In Cyber World

## Chief Editor : Dr. Vilas Pawar

## NEWS PORTAL

**Marathi & English**

HAPPY Diwali

# पुत्र असूनी...

- साधना झोपे

**शंकररावांचे सर्व उत्तरकार्य सुरळीतपणे पार पडले. सर्व कार्य आटोपल्यावर एक दिवस पवन काकूंना म्हणाला, 'काकू, मला माहीत आहे तुम्हाला नाही आवडणार; पण तरी आमची कळकळीची विनंती आहे की...**

शंकररावांना दवाखान्यात ॲडमिट होऊन आज आठ दिवस झाले होते. त्यांच्या शेजारी सरलाताई विमनस्क अवस्थेत बसलेल्या होत्या. तेवढ्यात डॉक्टर शंकररावांना तपासायला आले. सरलाताईंनी आज डॉक्टरांना कोणताच प्रश्न केला नाही. डॉक्टरांना त्याचे आश्चर्य वाटले. ते बाहेर निघाले तेव्हा सरलाताईंसाठी त्यांच्या शेजारीची निशा डबा घेऊन येत होती. डॉक्टरांना बघून ती झपाट्याने पुढे आली आणि तिने विचारले, "डॉ.,काकांच्या तब्बेतीत काही सुधारणा आहे का ?काही वेगळी ट्रीटमेंट करायची गरज असेल तर सांगा."

"चालू आहे तीच ट्रिटमेंट योग्य आहे, पण त्याला शंकरराव काहीच प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावतच आहे .मी मागेही तुम्हाला सांगितले होते, आता पुन्हा सांगतो त्यांच्या मुलांना बोलावून घ्या आणि आज मला अजून एक गोष्ट जाणवली."

"कोणती डॉ. ?"

"शंकररावांना कोणती ट्रिटमेंट देण्यापेक्षा काकूंना मानसिक आधाराची जास्त गरज आहे "

एवढे बोलून डॉ.पुढे निघून गेले.

शंकरराव आणि सरलाताईंना रमण, रोहित आणि केतकी अशी तीन मुलं, पण तिघंही वेगवेगळ्या शहरांत स्थायिक झाले होते. निशाच्या नवऱ्याने पवनने ३–४ दिवसांपूर्वी काकूंकडून तिघा मुलांचे फोन नंबर घेऊन त्यांना काकांच्या तब्बेतीविषयी कळवले. तेव्हा ते तिघंही म्हणाले की, "आम्हाला सध्यातर अजिबात वेळ नाही आणि फक्त तेवढ्यासाठी येणे आम्हाला जमणार नाही. तुम्ही त्यांना चांगल्यातल्या चांगल्या दवाखान्यात ॲडमिट करा, कितीही खर्च येऊ द्या, आम्ही तो इकडून

पाठवून देऊ"

पवनला त्यांचा खूप राग आला तो रागातच त्यांना म्हणाला, "प्रत्येक गोष्ट पैशाने होत नसते "

असे म्हणून रागातच फोन ठेवून दिला. निशा खोलीत आली तेव्हा देखील सरलाकाकू तशाच बसलेल्या होत्या. निशाने डबा बाजूला ठेवत सरलाकाकूंच्या खांद्यावर हलका स्पर्श केला. त्या मायेच्या स्पर्शाने काकूंचे डोळे भरून आले. निशा त्यांना खोलीच्या बाहेर घेऊन आली तेव्हा त्यांना हुंदकाच फुटला. निशा त्यांचे सांत्वन करत होती. सरलाकाकू तिला म्हणाल्या, "निशा, मला ठावूक आहे ग की, आम्ही पिकले पान कधीतरी गळून पडणार आहे, पण आमच्या संस्कारात काय अशी कमतरता राहिली की मुलांना आमच्या अंतिम काळात देखील आमच्या जवळ काही दिवस येण्यासाठीही वेळ नाही."



"नाही हो काकू, असे काही नाही "

"निशा,अग तीन मुलं त्यांच करता करता आम्हाला आमचे आयुष्य जगण्यासाठी वेळच मिळाला नाही कधी, म्हणून काय आम्ही यांना वाऱ्यावर सोडले ? किंबहुना आम्हाला जे मिळाले नाही ते तरी मुलांना मिळावे, त्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी माझी इच्छा नसतांना मी नोकरीसाठी घराबाहेर पडले. खूप तारेवरची कसरत पडत होती ग. यात भरीस भर म्हणजे आमच्याकडे कधी माझ्या नणंदा, दीर त्यांच्या मुलाबाळांसह असायचे. त्यांचे देखील आम्ही आनंदाने सर्व काही करायचे. आता तर आम्हाला पैशांचा प्रश्न देखील नाही, फक्त मानसिक आधार हवा आहे ग, पण यावेळी सर्वजण कुठे तोंड लपवून बसले आहे काय माहीत ? खरंच ग पडत्या काळात नातेवाईक कधी मदतीला उभे रहात नाही, पण तुम्ही ना आमच्या नात्यातले आणि गोत्यातले, पण तुम्ही देवासारखे उभे राहिलात."

"अहो काकू, असे काय म्हणताय, अहो तुम्ही आम्हाला माया लावली,ते सर्वांत मोठे आहे"

"निशा, बेटा एक सांगू का ?"

"अहो काकू विचारताय काय ? बोला की डायरेक्ट, तुमचा हक्क आहे आमच्यावर."

"निशा बेटा, माझे तुला एकच सांगणे आहे, तू माझ्यासाठी डबा आणत जाऊ नको. मी इथेच कुठेतरी माझ्या जेवणाची सोय करीन"

"अहो काकू, असं काय बोलताय "

"मला कळून चुकलेय की, तुझ्या काकांचे आता काही खरे नाही "

"काकू, धीर धरा तुम्ही आणि काहीही झाले तरी तुमचा डबा मीच आणेन तुम्ही कुठेही जेवायला जायचे नाही "

शंकररावांचे पुढच्या तीन-चार दिवसांत

देहावसन झाले. तेव्हा सरलाताई अगदी सैरभैर झाल्या, त्यांना निशाने सांभाळले आणि दवाखान्यातील सर्व फॉर्म्यालिटी पवनने पूर्ण केल्या.

"काकू, तुमच्या मुलांना कळवायचे का ?"

"अजिबात नाही. ते जीवंत असे पर्यंत त्यांना काही वाटले नाही; मग आता त्यांना नको कळवायला"

शंकररावांना अग्नी कोण देणार यावर चर्चा झाली. तर शंकररावांच्या भावाचा मुलगा पुढे येत म्हणाला,

"अग्नी आणखी कोण देणार, मीच देणार ना! मी पुतण्या म्हणजे त्यांचा मुलगाच ना!"

तेव्हा काकू म्हणाल्या, "काही नको, म्हणे मी मुलगा. जेव्हा गरज होती तेव्हा कुठे गेला होतास? जेव्हा आम्हाला गरज होती तेव्हा कोणतीही अपेक्षा न ठेवता पवन सतत धावपळ करत होता. तर त्यांना अग्नी पण पवनच देणार." तोच पुढचे उत्तरकार्य पण पार पाडणार. सगळे नातेवाईक धुसफुसत होते. अंतिम संस्कारानंतर सगळे आपल्या घरी निघून गेले. पण पवन आणि निशाने सरलाकाकूंना अजिबात एकटे वाटू दिले नाही आणि उत्तरकार्यात कुठलीच कसूर ठेवली नाही. शंकररावांच्या पिंडीला देखील कावळा लगेच शिवला.



शंकररावांचे सर्व उत्तरकार्य सुरळीतपणे पार पडले. सर्व कार्य आटोपल्यावर एक दिवस पवन काकूंना म्हणाला, "काकू,मला माहीत आहे तुम्हाला नाही आवडणार. पण तरी आमची कळकळीची विनंती आहे की, तुम्ही थोडे दिवस आमच्याकडे येऊन रहा, कारण तुम्हाला घरात एकट्यांचे लक्ष लागणार नाही."

"नाही रे,तू वाईट वाटून घेऊ नकोस, पण मला आता सवय करायला हवी एकटे जगण्याची."

"ठीक आहे जशी तुमची इच्छा, पण तुम्ही नास्ता,जेवणासाठी आमच्याकडे यायचे."

"खरंतर ते पण आता मी माझे बनवायला हवे, पण ठीक आहे, थोडे दिवस येईन कारण आता मला काकांच्या पश्चात बाकीची सगळी कामे पार पाडायची आहेत"

"काकू, तुम्हाला आता बँकेत आणि इतर काही ठिकाणी देखील काकांचे डेथ सर्टिफिकेट लागेल. मी ते कालच काढून आणले आहे. हे ते सर्टिफिकेट आणि या त्यांच्या झेरॉक्स आणि एकट्याच धावपळ करू नका. निशालाही सोबत घेऊन जात जा. घराकडे बघायला आई,आप्पा आहेत."

"बरं ठीक आहे,पण तिची काळजी घेणारं रे नाही. पोटच्या पोरांनी पाठ फिरवली, पण तुम्ही मात्र

सतत सोबत राहिले. खरंच माझी काहीतरी पुण्याई असेल म्हणून तुमच्याशी माझे ऋणानुबंध जुळले."

बॅंकेची आणि इतर कामे निशा सोबत होती म्हणून सहज पार पडली. काही दिवसांनी एक दिवस काकूंनी पवन आणि निशाला बोलवून घेतले.

"काकू,काय झाले? सगळे ठीक आहे ना?"

"अरे हो सगळे ठीक आहे. पण मला तुम्हाला माझा एक निर्णय सांगायचा आहे"

"बोला ना काकू"

"मी ना पुढच्या आठवड्यात सोबती वृद्धाश्रमात रहायला जाणार आहे"

निशा आणि पवनला तर धक्काच बसला. ते म्हणाले,

"आम्हाला आपली मुलं म्हणतात आणि आमच्यापासून दूर जात आहे. ते काही नाही, तुम्ही आम्हाला सोडून कुठेही जायचे नाही."

"अरे मी कुठे म्हटले की, मी कायमची जात आहे. मी तुमच्याकडे अधूनमधून मला वाटेल तेव्हा येत जाणार आहे. तिथेही मला माझे समवयस्क सोबती मिळतीलच ना! त्यांच्या सोबतीने मी माझे दुःख विसरेन आणि माझे पुढचे जीवन सुखकर होईल, पण मला एक फार मोठी जबाबदारी तुमच्यावर टाकायची आहे."

"बोला ना काकू"

"णाझे हे रहाते घर ,यात आमच्या खूप आठवणी जुळल्या आहेत. त्या घराची जबाबदारी मी तुमच्यावर सोपवत आहे. मी हयात आहे तोवर हे घर भाड्याने देऊन त्याचे जे भाडे येईल त्यातून माझा खर्चाला हातभार लागेल. ही जबाबदारी तुम्ही अगदी व्यवस्थित पार पाडणार याची खात्री आहे. माझी बाकीची सगळी मालमत्ता विकून त्यातून जी रक्कम आली ती मी अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमला दान केली आहे आणि माझ्या पश्चात हे घर मी तुमच्या दोघांच्या नावावर केले आहे"

"अहो काकू हे काय केले तुम्ही?"

"मी केले ते बरोबर आहे, खरंतर तुम्ही माझ्या अडचणीच्यावेळी जी मदत केली त्यामानाने हे काहीच नाही."

"अहो काकू, असे काय बोलता. काकांच्या ठिकाणी बाबा असते तर आम्ही केलेच असते ना? मग का असे करत आहात?"

"नाही रे असे काही"

पुढच्या आठवड्यात काकू सोबती वृद्धाश्रमात निघाल्या तेव्हा पवन आणि निशाला खूप वाईट वाटत होते. काकू निघाल्या तेव्हा त्यांची पाठमोरी आकृती बघून राहून राहून मनात येत होते. असे म्हणतात की, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी. पण आज ही माउली तीन मुलं असून अनाथ झाली.



# वसंत ऋतू

- स्मिता हर्डीकर

**आता आज संध्याकाळीही तो परत त्याचवाटेवरून फेरफटका मारू लागला. नजर मात्र राधेचा शोध घेण्यात हरवली होती. बराचवेळ काहीच चाहूल न लागल्याने आज तो अंगणात आला.**

कोकणातील निळ्याशार शांत आणि स्वच्छ समुद्र किनाऱ्याने सजलेलं,नारळा पोफळी सारख्या कल्पवृक्षांनी वेढलेलं गाव म्हणजे 'गुहागर'. गावाचं सौंदर्य डोळ्यांत साठवून घ्यावं असं. वसंतातल्या होणाऱ्या बदलांची चाहूल निसर्गालाच सर्वात आधी लागते. तशी आधीच सुपीक असणारी, हिरवाईने सजलेली जमीन रंगबेरंगी छोट्या छोट्या फुलांनीही बहरून आली.

घुहागर मध्ये वसलेलं एक सुबक बैठे कौलरू घर आप्पा शास्त्री यांचे. घरासमोर अंगण, त्यात पाळलेल्या शेळ्या आणि त्यांची गोंडस पिल्ले. घराच्या मागेच वाडी, म्हणजे नारळा पोफळीची उंच वाकलेली झाडे. बाजूला वाहत असणारा ओढा.

आप्पा शास्त्री आणि सुमती ह्यांची कन्या राधा असे छोटे व सुखी कुटुंब त्या घरात नांदत होते.


घराच्या अंगणात बकुळीच्या झाडाखाली राधा बकुळीच्या फुलांच्या सुगंधावरून फुलांचा मागोवा घेत फुले वेचत होती. रुमालात फुले घेऊन तिथेच ती आपले बस्तान टाकून बसली. परकर पोलक्याच्या खिशातून दोरा काढून ती त्या फुलांचा गजरा बांधू लागली. तिच्या अंगणात तऱ्हे तऱ्हे ची फुलझाडं होती, कुंदाचा वेल घराच्या कुंपणावर चढला होता, वातावरणात झालेल्या बदलांनी शुभ्र ताऱ्यांसारखी फुले जमिनीवर चमकू लागली होती.गुलाब,एकझोरा,अबोली,प्राजक्ताचा तर सडाच अंगणात पडत होता. ह्या सगळ्या फुलांचं सौंदर्य राधा स्पर्शाने मनात साठवत होती. त्यांच्या गंधाने सुखावत होती. कारण जन्मतःच दृष्टीहीन असणाऱ्या तीला निसर्गाचं खूप वेड होतं. ती निसर्गाच्या सानिध्यात रमत होती,वाढत होती. दृष्टीहीन असल्यामुळे तिचं जग संकुचित असलं तरीही ती बुद्धीने चाणाक्ष होती. आपल्या व्यंगाचे दुःख आपल्या मातापित्यांला कसे

कमी होईल ह्याचा ती सारखा प्रयत्न करीत असे.तिने ध्वनीमुद्रित रूपांतरे आणि स्पर्शपद्धतीवर आधारित ब्रेल लिपी शिकून घेऊन आपले बारावी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यांनी स्वावलंबी व्हावे ह्यासाठी धडे शाळेतच  दिले जात होते.

साहित्य, कला, संगीत ह्याची ओळख करून दिली जात होती. शिवणकला,व्यवहार,प्रवास कसा करावा ह्याची प्रात्यक्षिके दिली जात होती.

ळांबसडक काळ्याभोर केसांची पिळदार वेणी,टपोरे मोठे डोळे,गोल चेहरा,गौर वर्ण,चाफेकळी नाक.वयात आली तशी अधिकच सुंदर दिसू लागलेली राधा. बघून वाटणार हीनाही की दृष्टिहीन आहे असे. ती गवताच्या काड्यांपासून सुंदर सुंदर शोभेच्या वस्तू बनविण्यात प्रवीण होती. त्या मुळेच ती निसर्गाच्या अधिकच जवळ होती. पाण्यात पाय सोडून बसणे, गाईगुरांना आंजारून गोंजारून त्यांच्याशी बोलणे, नवनवीन झाडे लावणे, त्यांना खतपाणी घालून त्यांची निगा राखणे हीच जणू तिची दुनिया होती. त्यामुळे वसंत ऋतूच्या आगमनाने वातावरणात झालेला बदल तिच्या रूक्ष जीवनाला जणू सुखावत होता.

पर्यटनासाठी सुट्टीत मुंबईहून गुहागरला आलेला राघव एका नामांकित कंपनीत अभियांत्रिकी हुद्यावर होता. उंचापुरा,स्वभावाने साधा सरळ. शांततेच्या शोधार्थ गुहागर येथे आलेला. संध्याकाळी भाताच्या शेताच्या जवळून पायी पायी गावातून फेरफटका मारताना, फुलांशी बोलणारी, त्यांना कुरवाळणारी राधा त्याच्या नजरेस पडली. गुहागर येथील निसर्गाच्या प्रेमात असतानाच आता त्याच्या कानावर मधाळ,लाघवी बोल पडत होते. राधाच्या सर्व



हालचाली अगदी निरखत रहाव्या अशा. तिची छबी त्याच्या डोळ्यांत आणि हृदयात चपखल बसलीच म्हणायची. तिन्हीसांजा होत असल्याने केशरी पिवळसर संधीप्रकाश पडला होता. त्या सोनपिवळ्या प्रकाशात राधेचा गौरवर्ण अजूनच केतकी सारखा भासत होता. फुलांची ओंजळ भरून ती घराकडे वळली फुले. तिच्या ओंजळीत सुवास मात्र राघवच्या मनात दरवळत राहिला.

आता आज संध्याकाळीही तो परत त्याच वाटेवरून फेरफटका मारू लागला. नजर मात्र राधेचा शोध घेण्यात हरवली होती. बराचवेळ काहीच चाहूल न लागल्याने आज तो अंगणात आला. घराच्या ओसरीत राधा गवताच्या काड्यांपासून सुंदर निसर्गचित्र बनवत होती. त्याची चाहूल लागताच ती धडपडली,अडखळली आणि मग मात्र राघवच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणार्धात बदलले. तो आतून हादरलाच होता. इतक्यात आवाज ऐकून आप्पा शास्त्री बाहेर आले. त्यांनी राघवची विचारपूस केली. त्याचे येण्याचे प्रयोजन विचारले. राघवने प्रांजळपणे आपल्या मनातील राधेविषयीच्या भावनेची कबुली दिली.

आप्पांनी राधेची सगळी कहाणी त्याला सांगितली. दृष्टी सोडता तिच्यात कशाचीही उणीव नाही हे सांगताना आप्पांचा ऊर भरून आला.

काही वेळ स्तब्ध शांततेत गेला. पण मग लगेच सावरत राघवने प्रथमदर्शनीच मनात घर करणाऱ्या राधाला मागणीच घातली. आपण मामाकडे एकटेच रहात असल्याने माझा निर्णय सर्वस्वी माझा असल्याचे त्याने सांगितले.

आप्पांनी राधेला सर्व समजावून सांगितल्यावर दोघांच्या संमतीने लग्नगाठ पक्की करण्यात आली. काहीतरी ठोस विचार मनात पक्का केल्याने एक वेगळेच आत्मविश्वाचे तेज त्याच्या चेहऱ्यावर झळकत होते. दोन्ही घरांच्या उपस्थितीत विवाह सोहळा संपन्न झाला. आता राघव राधाची 'दृष्टी' बनला. तिच्या जीवनात कमी असणारे रंग तो घेऊन आला होता.

मनात निग्रह केल्याप्रमाणे तिला घेऊन मुंबईला आल्यावर तो लगेचच कामाला लागला होता. त्याने राधाला विश्वासात घेऊन थोड्याच अवधीत तिच्या सारख्याच दृष्टिहीन मुलांसाठी शाळेची स्थापना केली. योग्य साथ आणि विश्वास मिळाल्यास आपल्यातील सकारात्मक ऊर्जेचा सदुपयोग करून त्याला नवी दिशा देता येते. त्या शारीरिक व्यंगावर मात करता येते हे दोघांनी जणू सिद्ध केले होते. शाळेचे उद्घाटन दिमाखादार पणे राधाच्या हातून करण्यात आले. त्याचे व्यवस्थापनही तिच्या हाती सोपवण्यात आले. आपल्या सारख्या छोट्या छोट्या बाल मित्रांना त्यांच्या जीवनातील आनंद देताना, ज्ञान देताना जणू राधाला आज खऱ्या अर्थाने तिच्या आयुष्यात 'वसंत' फुलला आहे असे वाटत होते.



## चारोळ्या

*त्या पौर्णिमेच्या चंद्रालाही*
*रातराणीची ओढ असते*
*मनातील अबोल प्रेमाला*
*बोलण्याची गरज नसते...*

*भिडूदेत शब्द आता किनाऱ्याला*
*येऊदेत मनातील वादळाला*
*शब्दसरींसंगे भिजूदेत त्या क्षणाला*
*अबोल राहिलेल्या त्या भावनेला...*

**- निशा खरात**

# किचन टीप्स

## १.जेवणात जास्त मीठ पडतं

जर जेवणात कमी मीठ पडलं तर वरून घालता येतं. पण जर जेवणात मीठ जास्त झालं तर प्रश्नच निर्माण होतो. जर रस्सा भाजी असेल तर त्यात थोडा उकडलेला बटाटा घालावा किंवा कणकेचा छोटा गोळा घालावा. यामुळे जास्त झालेलं मीठ शोषलं जाईल आणि भाजीमध्ये काही बदल होणार नाही. पण हे करताना एक गोष्ट लक्षात घ्या की, थोड्यावेळाने कणकेचा गोळा किंवा बटाटा आठवणीने काढा. जर सुकी भाजी असेल आणि मीठ जास्त पडलं तर त्यात तुम्ही थोडंसं भाजलेलं बेसन किंवा दाण्याचं कूट घालू शकता.

## २.पास्ता किंवा न्यूडल्स शिजवताना चिकट झाल्यास

जर शेवया, पास्ता किंवा न्यूडल्स शिजवताना चिकट झाल्यास त्यात काही थेंब तेल घालावं. गरम पाण्यातून काढल्यावर लगेच थंड पाण्याने धूवून घ्या. मग बघा अगदी बाहेरसारखे न्यूडल्स घरी बनतील!

## ३.विरजणाशिवाय दही कसं लावावं ?

जर घरात विरजण नसेल आणि दही लावायचं असल्यास सर्वांत आधी दूध गरम करून घ्या. त्यात लिंबाचा रस घालून पातेलं १० ते १२ तास झाकून ठेवा. मस्त सायीचं दही लागेल.

## ४.लसणाचा योग्य उपयोग

जर जेवणामध्ये लसूण घालूनही त्याचा वास लागत नाही. अशावेळी लसूण कापून घालण्या ऐवजी कुटून किंवा किसून घालावा. असे केल्यास लसणाचा वास चांगला येतो.



# नाही कशी म्हणू तुला...

**- नेहा उजाळे**

**स्वानंदीने नुकतेच अठरा वर्ष पूर्ण केले होते आणि ती पुण्याच्या नामांकित कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.ए. ला शिकत होती. स्वानंदीला लहानपणापासून गाण्याची आवड आणि तिचा गळा अतिशय गोड असल्याने...**

टेबलावरील मोबाईल खणखणला. मोबाईलवर दादाचे नाव पाहून स्वानंदीने थोडं बाचकतच फोन घेतला, "स्वानंदी, बाबा खूप सिरीयस आहेत. तुझं नाव घेत आहेत सारखे. मला कल्पना आहे तुझ्या मन:स्थितीची आणि मी तुला बाबांसाठी इथे यायला सांगतो आहे. तरीही मी तुला विनंती करतो तू लवकर ये. बाबांना तुला भेटायचे आहे." स्वानंदीचा दादा कळकळीने म्हणाला.

"ठीक आहे, येते मी." स्वानंदी दीर्घ उसासा सोडत म्हणाली. खरंतर स्वानंदीच्या लग्नानंतर तिने तिच्या बाबांशी बोलणे टाकले होते; परंतु आता माणुसकी म्हणून नाईलाजास्तव माहेरी जावे लागणार होते. चार महिन्यांपूर्वी स्वानंदीच्या नवऱ्याचे विश्वासचे हृदयविकाराने निधन झाले होते. तिचा नवरा तिच्यासाठी फक्त कुंकवाचा धनी होता आणि आता तर त्याही बंधनातून तिला मुक्तता मिळाली होती.

निघण्यापूर्वी स्वानंदीने तिच्या लेकीला ईशाला ती जाते आहे याची कल्पना दिली. तिला आणि तिच्या नवऱ्याला घरी राहायला बोलावले. स्वानंदीने त्यांच्या वाड्याला कुलूप म्हणून कधी लावले नव्हते. ईशाने तिला 'आई तू निर्धास्त जा, मी क्लिनिकमधून डायरेक्ट घरी येते. माझ्याकडे आहे घराची चावी.' असे सांगितल्यावर स्वानंदीने ड्रायव्हरला गाडी काढायला सांगून ती गाडीत बसली. साहजिकच तिचे मन भूतकाळात गेले.

'स्वानंदी! अग हा बघ इथे स्पर्धेचा रिझल्ट लावला आहे. तुझा प्रथम क्रमांक आला आहे. किती मस्त ग.' मंजुषा स्वानंदीला उत्साहाने बोर्डवरील तिचे नाव दाखवत होती.

स्वानंदीने तिचे बोर्डवरील नाव वाचले. तिचे नाव वाचून तिला आनंद तर झालाच होता, तरीदेखील तिचे डोळे मुलांमध्ये कोणाचा क्रमांक आला आहे हे

शोधू लागले. मुलांमध्ये सुहास गायकवाडचे नाव दिसल्यावर तिच्या चेहऱ्यावर हसू उमलले. 'त्याने देखील किती सुंदर गाणे म्हटले होते. त्याचा नंबर यायलाच हवा होता.' मनातल्या मनात विचार करत असताना स्वानंदी समोर सुहास उभा राहिला.

'स्वानंदी अभिनंदन!' सुहास म्हणाला.

'थँक्स! आणि तुझे देखील अभिनंदन.'



एवढेच बोलून स्वानंदी मंजुषाचा हात धरून वर्गामध्ये जाण्यास निघाली. त्याकाळी मुलीमुले एकमेकांशी फार क्वचित बोलत असत.

स्वानंदीने 'नाही कशी म्हणू तुला' हे गाणे म्हटले होते आणि सुहासने 'भेट तिची माझी स्मरते' हे गाणे म्हणून दोघांनी परीक्षकांची मने जिंकली होती.

एव्हाना कॉलेजमध्ये स्वानंदी आणि सुहासच्या यशाबद्दल सगळ्यांना समजले होते. जो तो त्या दोघांचे अभिनंदन करत होते. सर्वांचे आभार मानत स्वानंदी आपल्या वर्गात गेली.

कॉलेज सुटल्यावर एका वेगळ्या धुंदीत स्वानंदी घरी पोहचली. घरी गेल्या गेल्या तिने तिच्या आईला हाका मारल्या, 'आई ए आई! माझा संगीत स्पर्धेत पहिला क्रमांक आला आहे आणि आई तुला माहिती आहे का? आपल्या शहरातील शंभर कॉलेजमधील जवळपास तीनशे ते चारशे मुले – मुली सहभागी झाले होते आणि त्यात माझा पहिला क्रमांक आला आणि मुलांमधून आमच्याच कॉलेजच्या मुलाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. कसलं छान वाटतंय म्हणून सांगू?' स्वानंदी भरभरून बोलत होती.

'अगबाई ! हो का? खूपच छान हो. तुझी अशीच प्रगती होत राहो. आजी-आजोबांना सांगितलंस का? त्यांना देखील खूप आनंद होईल हो.' स्वानंदीची आई म्हणजेच नंदिताताई म्हणाल्या.

"हो आई ! मी सांगते आजी-आजोबांना आणि दादा आला का ग?" स्वानंदीने विचारले.

"हो मघाशीच आला आणि तो परत आपल्या भोजनालयासाठी घाऊक माल भरायला गेला आहे. संध्याकाळपर्यंत येतो म्हणाला." नंदिताताई म्हणाल्या.

"बरं! मी आजी-आजोबांना सांगून येते." असे म्हणून स्वानंदी आजी-आजोबांच्या खोलीत पोहचली. आजी-आजोबांना तिने आनंदाची बातमी सांगितली. त्या दोघांना सुद्धा आपल्या नातीची बातमी ऐकून आनंद वाटला. जेवून झाल्यावर स्वानंदी आपल्या गुरुजींना ही आनंदाची बातमी सांगण्यासाठी तिच्या संगीत विद्यालयात गेली. स्वानंदीच्या गुरुजींना आपल्या शिष्येचा अभिमान वाटला. त्यांनी तोंड भरून स्वानंदीला आशीर्वाद दिला.

संध्याकाळी दादा घरी आल्यावर त्याच्यासमोर स्वानंदीने तिची कॉलर टाईट केल्याचा अभिनय केला आणि तिच्या दादाला ती म्हणाली, "दादटल्या! तुझ्याकडून मला काहीतरी बक्षीस हवे आहे."

"हो ग बाई! देणार आहे मी तुला बक्षीस. मी घरात शिरल्या शिरल्या आईने मला सगळं सांगितलं. बरं! माझ्या ह्या छोट्या बहिणीला काय हवं आहे बक्षीस?" स्वानंदीचा दादा नयन म्हणाला.

"दादटल्या, आता मला एक छानशी वहिनी आणून दे बाबा. मला तुझ्या लग्नात करवली म्हणून खूप मिरवायचे आहे." स्वानंदी म्हणाली. स्वानंदीच्या वाक्यावर मित्राची मेहुणी नयनच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. नयनच्या खास मित्राचे जयेशचे लग्न नाशिकला असल्याने नयन दोन दिवस नाशिकला गेला होता. तिथे त्याची मेहुणी वसुधा त्याच्या मनात भरली होती. आता स्वानंदीने वहिनीसाठी हट्ट धरल्यावर त्याला साहजिकच वसुधाची आठवण आली. नयन विचार करत असताना स्वानंदी त्याला म्हणाली, "काय रे दादा? कसला विचार करतो आहेस? कोणी पसंत केली आहेस का मुलगी?"

"तू ना खूप आगाऊ झाली आहेस बरं." स्वानंदीच्या चेहऱ्याकडे न पाहता नयन तिथून सटकला.

दादाचे कुठेतरी पाणी नक्कीच मुरते आहे असा अंदाज स्वानंदीला आलाच. दादाच्या मनात काय आहे हे जाणून घ्यायला हवे असा विचार स्वानंदीच्या मनात आला आणि तिच्या मनात आपसूकच सुहास डोकावला. जेव्हापासून स्पर्धेमध्ये सुहासचे गाणे स्वानंदीने ऐकले होते तेव्हापासून ती त्याच्यावर एकतर्फी प्रेम करू लागली होती.

स्वानंदीने नुकतेच अठरा वर्षे पूर्ण केले होते आणि ती पुण्याच्या नामांकित कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.ए. ला शिकत होती. स्वानंदीला लहानपणापासून गाण्याची आवड आणि तिचा गळा अतिशय गोड असल्याने स्वानंदीच्या आईवडिलांनी तिच्या छंदाला प्राधान्य दिले होते. स्वानंदीच्या घरचा पिढीजात व्यवसाय होता तो म्हणजे 'क्षीरसागर सात्विक भोजनालय.' स्वानंदीची पणजी अतिशय सुगरण होती. स्वानंदीच्या पणजोबांच्या आकस्मिक जाण्याने तीन मुलांसाठी पणजीने कंबर कसली आणि घरात खानावळ सुरू केली. स्वानंदीच्या आजोबांनी खानावळीचे रूपांतर भोजनालयात केले आणि आता स्वानंदीच्या वडिलांनी पुरुषोत्तम दादांनी आपल्या



भोजनालयाच्या चार शाखा पुण्यात चालू केल्या होत्या.



क्षीरसागर हे पुण्यातील बडे प्रस्थ समजले जात होते. पुण्यात ऐन मोक्याच्या ठिकाणी क्षीरसागरांचा चौसोपी वाडा होता. लक्ष्मी त्यांच्या घरात पाणी भरत होती. क्षीरसागरांच्या मोठ्या वाड्यातील अनेक उत्तमोत्तम चित्रे, राजेशाही झुंबर, संगमरवरी फरशा, कलात्मक फर्निचर, तसेच आकर्षक टेलीफोन ह्यांचे आल्या – गेल्यांना आकर्षण असायचे. त्याकाळी फार क्वचित लोकांच्या घरी फोन असल्याने लोकांना टेलीफोनचे अप्रूप वाटत असे. स्वानंदीच्या दादाने जरी मेकॅनिकल इंजिनीअरिंग केले असले तरी त्याने आपल्याच व्यवसायात लक्ष घालण्याचे ठरविले होते. स्वानंदी नयनपेक्षा आठ वर्षांनी लहान असल्याने ती तिच्या दादाची, तसेच घरात सगळ्यांचीच अतिशय लाडकी होती. नयन आता सव्वीस वर्षांचा झाल्याने आता क्षीरसागर कुटुंबाला नयनच्या लग्नाचे वेध लागले होते.

रात्री स्वानंदीचे वडील पुरुषोत्तमदादा घरी आल्यावर स्वानंदीने त्यांना तिचा पहिला क्रमांक आल्याची बातमी दिली.

“हो ! मला आईने कळवले होते फोन करून. अशीच प्रगती कर आणि केवळ संगीतामध्ये नाही तर अभ्यासात देखील अशीच प्रगती कर.”

पुरुषोत्तम दादा स्वानंदीला जवळ घेत म्हणाले. त्यांनी तिला पन्नास रुपये बक्षीस म्हणून दिले.

पन्नास रुपये पाहून स्वानंदी खूप खुश झाली. तिने लागलीच ते पैसे तिच्या पैशांच्या डब्यात टाकले. सुहासचा विचार करतच स्वानंदी झोपेच्या आधीन गेली.

दोन दिवसांनी कॉलेजमधून स्वानंदी आणि सुहासचा सत्कार केला गेला होता. कॉलेजमधून त्या दोघांना ट्रॉफी आणि प्रत्येकी दोनशे रुपयांचे बक्षीस देण्यात आले होते. त्या आनंदातच ती घरी आली. ती घरी आली तेव्हा तिचा दादा घरी जेवायला म्हणून आला होता. तो काहीतरी विचार करत असल्यासारखा तिला वाटला. तिने तिच्या दादाला काय झाले म्हणून खूप वेळ विचारले असता सरतेशेवटी दादाने तिला वसुधाविषयी सगळे सांगितले आणि ती त्याच्या मनात भरली आहे हे देखील सांगितले आणि आईच्या कानावर ही गोष्ट घाल असेही सांगितले.

जयेशने नयनला आईवडिलांना घेऊन वसुधाला मागणी घालायला ये असे सांगितल्याने आईशी ह्या विषयावर डायरेक्ट कसे बोलायचे म्हणून त्याने स्वानंदीला आईशी बोलायला सांगितले. दादाने आपल्यासाठी वहिनी पसंत केली आहे ह्याचा

स्वानंदीला अतिशय आनंद झाला. तिने लागलीच तिच्या आईला सांगण्यासाठी धूम ठोकली.

स्वानंदीच्या आईला वसुधाविषयी समजल्यावर आईने पटापट पाऊले उचलली. स्वानंदीच्या बाबांना तयार करून ते सगळे वसुधाच्या घरी मागणी घालायला नाशिकला गेले. दोन्ही घरी पसंती झाल्यावर लग्नाचा मुहूर्त ठरवला गेला आणि तीन महिन्यांनी स्वानंदीच्या दादाचे लग्न होऊन कु. वसुधा आपटे सौ. वसुधा क्षीरसागर होऊन क्षीरसागरांची सून झाली.

स्वानंदीचा दादा तिचे आता अधिकच लाड करू लागला होता आणि वहिनीच्या रूपाने तिला एक मैत्रीणच लाभली होती.



स्वानंदी आणि सुहास एकमेकांमध्ये गुंतत चालले होते हे त्या दोघांनाही समजत होते; पण अजूनही त्या दोघांनी आपल्या भावना एकमेकांकडे व्यक्त केल्या नव्हत्या. मंजुषाला स्वानंदीचे मन समजत असल्याने तिने पुढाकार घेऊन सुहासला स्वानंदीबद्दल विचारले. सुहासने देखील स्वानंदीवरील त्याचे प्रेम मंजुषाकडे व्यक्त केले. स्वानंदी आणि सुहासचे प्रेम जुळवून देण्यास मंजुषा दुवा ठरली होती.

स्वानंदी आणि सुहासचे प्रेम दोघांच्या आवडीनिवडी, दोघांची मते जुळत असल्याने दिवसेंदिवस फुलत होते. दोघेही प्रेमात इतके बुडाले होते की, दोघेही आता एकमेकांशिवाय राहू शकत नव्हते.

“स्वानंदी, मी तुझ्या घरी तुला मागणी घालायला येईन जेव्हा मी माझे अस्तित्व सिद्ध करून दाखवेन. मला संगीत क्षेत्रात नाव कमवायचे आहे; पण मला भीती वाटते ग तू इतकी श्रीमंताघरची मुलगी त्यात तू माझ्यापेक्षा उच्च जातीची. तुझ्या घरचे आपल्या लग्नाला परवानगी देतील की नाही याची कायम मनामध्ये भीती असते माझ्या.” सुहास म्हणाला.

“सुहास, नको काळजी करूस. मी माझ्या दादाला आणि वहिनीला तुझ्याविषयी सांगेन. माझे बाबा त्या दोघांचे म्हणणे नक्कीच ऐकतील.” स्वानंदी सुहासला धीर देत म्हणाली.

स्वानंदीचे शिक्षण पूर्ण होत आले होते. तिची शेवटच्या वर्षीची परीक्षा सुरू होणार होती. सुहास तिच्या एक वर्ष पुढे असल्याने त्याचे ग्रॅज्युएशन होऊन त्याने संगीतक्षेत्रात एम.ए. करण्याचे ठरविले होते.

स्वानंदीने तिच्या वहिनीकडे सुहासविषयीचे प्रेम व्यक्त केले. तिच्या वहिनीने तिच्या दादाला सांगितल्यावर नयनने स्वानंदीला बोलावले. “स्वानंदी, मी ऐकलं ते खरं आहे का ? तू एका मुलावर प्रेम करतेस ?”

“हो दादा, माझं सुहासवर खूप प्रेम आहे. त्याच्या कामकाजात त्याचा जम बसला की आम्हाला लग्न करायचे आहे.” स्वानंदी म्हणाली.

“स्वानंदी, तुला ठावूक आहे की, त्याची

आणि आपली जात एक नाही. तुला बाबांचा स्वभाव ठावूक आहे ना? ते जुन्या मतांचे आहेत. बाबा तुझ्या लग्नाला तयार होतील का? जर ते तयार झाले तर तुला लग्नानंतर कितीतरी गोष्टी जुळवून घ्याव्या लागतील. आपल्या रितीभाती, आपल्या खाण्याच्या सवयी सारं काही बदलेल. तू निभावून नेऊ शकशील का सगळं?" नयनने काळजीने विचारले.

"दादा, मला सगळं माहिती आहे. मी सगळ्या गोष्टींना तयार आहे. दादा सुहास खूप चांगला मुलगा आहे रे. त्याची जात जरी वेगळी असली, भले तो मध्यमवर्गीय असला तरी त्याच्यात आत्मविश्वास, स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द, मेहनती आहे आणि मुख्य म्हणजे तो माझ्यावर प्रचंड प्रेम करतो. इतका चांगला मुलगा माझा नवरा होणार असेल तर दादा तूच सांग ना मी सुखी नाही होणार का? तू हवे असल्यास सुहासला भेट. त्याच्याशी बोल म्हणजे तुला समजेल की माझी निवड चुकीची नाही." स्वानंदी आत्मविश्वासाने म्हणाली.

"ठीक आहे, मी भेटतो सुहासला." नयन म्हणाला.

नयनने सुहासची भेट घेतली. सुहासचा नम्र स्वभाव, त्याची महत्वाकांक्षा पाहून साहजिकच नयनला सुहास आवडला होता. आता प्रश्न होता बाबांना स्वानंदीच्या लग्नासाठी तयार करण्याचा. स्वानंदीचे बाबा तसे जुन्या विचारांचे होते त्यामुळे ते स्वानंदीच्या प्रेमाला मान्यता देतील की नाही याची काळजी नयनला लागली होती. स्वानंदीचे ग्रॅज्युएशन झाल्यावर तिच्या बाबांनी तिच्यासाठी स्थळे शोधायला सुरुवात केली असता नयनने बाबांकडे सुहासचा विषय काढला.

"नयन! तू इतका मोठा झालास का? तुझ्या मूर्ख बहिणीची वकिली करतो आहेस? तिला एक चांगलं वाईट ह्याची अक्कल नाही; पण तुला तर समजलं पाहिजे ना? फक्त प्रेमाने पोट भरतं का? त्यात आपली उच्च जात. स्वानंदी लहानपणापासून श्रीमंतीत वाढली आहे. तिला जमणार आहे सगळं निभावायला? ते काही नाही, मी एखादं चांगलं स्थळ पाहून लग्नचं लावून देतो तिचं आणि हा विषय इथेच संपवायचा. अतिलाडाचा गैरफायदा घेतला पोरीने." स्वानंदीचे बाबा रागारागात म्हणाले.

नयनने समजावून देखील बाबांनी ऐकले नाही. त्यांनी लगेच तिचे लग्न रत्नागिरीमध्ये स्थायिक असलेल्या विश्वास जोशी ह्याच्याशी ठरवले. जोशी कुटुंब हे पुजारी असून तेथील महालक्ष्मी मंदिराचे विश्वस्त होते. गावात कोणाचेही देवाधर्माचे कार्य असले तरी त्यांनाच मान दिला जात असे. रत्नागिरीमध्ये त्यांचा स्वतःचा मोठा वाडा होता. जमीनजुमला होता. एकंदरीत सधन कुटुंब होते जोश्यांचे. जोशींना तीन मुलगे आणि तीन मुली. मुलांमध्ये मोठ्या दोघांची लग्ने झाली होती आणि दोन मुलींची लग्ने झाली होती. विश्वास मुलांमध्ये धाकटा. त्याचे आणि त्याच्या पाठच्या धाकट्या बहिणीचे लग्न व्हायचे होते. मधला भाऊ शिक्षणासाठी मुंबईमध्ये गेला आणि मुंबईमधेच त्याने त्याचे बस्तान बसवले होते.

सणासुदीला कुटुंबाला घेऊन तो गावी येत होता. दोन मुली देखील माहेरपणाला येत असत. स्वानंदीच्या बाबांनी जोश्यांचे भरलेले घर, मोठा वाडा हे सर्व पाहून सोयरीक जुळवली होती.

इथे स्वानंदी जीवाचा आकांत करून

आपल्या बाबांना सांगत होती की, तिला सुहासशीच लग्न करायचे आहे तरीही तिच्या बाबांनी तिचे लग्न विश्वास यांच्यासोबत लावून दिले. विश्वास आणि त्याच्या धाकट्या बहिणीचे एकाच मांडवात लग्न लावून देण्यात आले होते.

स्वानंदी माप ओलांडून जोश्यांच्या वाड्यात आली. जोशी कुटुंबातील सदस्य अतिशय अबोल होते. कोणाच्याही चेहऱ्यावर हसू म्हणून नाही. त्यात देवाधर्माचे करणारे म्हणून अतिशय कर्मठ होते. स्वानंदीला वाटले आपला नवरा तरी बोलका असेल त्याचा तर मुक्याचाच कारभार. जोश्यांच्या घरात स्त्रियांना इतका मान नव्हता. घरातल्या स्त्रियांनी उगीच कामाशिवाय बाहेर पडायचे नाही, स्वयंपाक घरात जाताना सोवळ्याने जायचे, चार दिवसांचा मासिकधर्म पाळायचा, गाणी गायची नाहीत, कुठे फिरायला जायचे नाही, जर कुठे जायचे असेल तर एकतर देवदर्शनासाठी जायचे, नाहीतर कोणा नातेवाईकांच्या लग्नासाठी.



स्वानंदीचा हसरा, खेळकर स्वभाव जोश्यांच्या घरी येऊन लुप्त झाला. तिची गाण्याची आवड, तिची निसर्गरम्य ठिकाणी फिरण्याची आवड सारं काही स्वानंदीने मनाच्या कोपऱ्यात बंदिस्त केले. सकाळपासून ते रात्रीपर्यंत तिला घरकाम करावे लागे.  नवरा केवळ पुरुषार्थ म्हणून रात्री जवळ यायचा. त्यात प्रेम वगैरे काही नव्हते. स्वानंदी केवळ कर्तव्य म्हणून संसारात रुळली. त्यात तिचा मानसन्मान, तिची हौस सगळी धुळीला मिळाली होती.

स्वानंदीच्या लग्नानंतरचा आषाढ महिना आला. स्वानंदीच्या सासऱ्यांनी तिला माहेरी पाठवले. खरंतर स्वानंदी माहेरी जाण्यास अजिबात उत्सुक नव्हती कारण तिच्या बाबांचा तिला खूप राग आला होता. जिथे तिची स्वतःची ओळख पुसून गेली होती अशा ठिकाणी तिला आता उर्वरित आयुष्य काढायचे होते. स्वानंदीच्या बाबांनी तिच्या प्रेमाचा, तिच्या स्वाभिमानाचा एकप्रकारे बळीच  दिला होता.

स्वानंदी माहेरी आली पण ती पहिल्यासारखी स्वानंदी राहिली नव्हती. एकदम अबोल आणि उदास झाली होती. तिला पाहून आईने आणि वहिनीने घट्ट मिठी मारली. तिघीजणी मिठी मारून रडल्या. नयनच्याही डोळ्यांत स्वानंदीची अवस्था पाहून पाणी आले. बाबांनी तिच्याकडे तिची चौकशी केली असता स्वानंदीने त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचेच त्यांना उत्तर दिले. माहेरी आल्यावर देखील स्वानंदीने स्वतःला घरातच कोंडून घेतले. कारण उगीच इथे तिथे फिरण्याची सवय लागायला नको. पुन्हा सासरी गेल्यावर तिला उंबरठ्याच्या आतच राहावे लागणार होते.

स्वानंदी माहेरी आल्याचे मंजुषाला समजल्यावर ती स्वानंदीला भेटायला आली. मंजुषाला पाहून स्वानंदीला भरून आले. दोघी मैत्रिणी मिठी मारून रडल्या. अश्रूंचा आवेग ओसरल्यावर स्वानंदी मंजुषाला म्हणाली, "मंजुषा, माझं आयुष्य आता पर्णहीन वृक्षासारखे झाले आहे. सगळ्या आशा, आकांक्षा मी मनात कोंडल्या आहेत. केवळ कर्तव्य म्हणून मी माझा संसार पुढे रेटणार आहे. त्यात प्रेम, आपलेपणा काहीच नसेल." स्वानंदीने आपल्याला सासर आणि नवरा कसा मिळाला आहे ते मंजुषाला सांगितल्यावर मंजुषाला स्वानंदीबद्दल अतिशय वाईट वाटले.

थोड्या वेळाने स्वानंदीने मंजुषाला विचारले, "सुहास कसा आहे ग ? तुला भेटला का ?"

"तुझ्या लग्नानंतर सुहास एकदम खचून गेला होता. तो आता पुण्यात नसतो. तो नागपूरला निघून गेला आहे. आता तो माझ्याही संपर्कात नाही त्यामुळे त्याच्याबद्दल काहीच माहिती नाही." मंजुषाने असे सांगितल्यावर स्वानंदीच्या डोळ्यांत पाणी तरळले.

श्रावण महिन्यांतील सणवार आटोपून स्वानंदी सासरी निघून गेली. काही दिवसांनी तिला बाळाची चाहूल लागली. आपल्याला आपल्या बाळाच्या रूपाने तरी जीवनात आनंद उपभोगता येईल ह्या विचाराने ती मनोमन सुखावली.

स्वानंदीला मुलगी झाली. डॉक्टरांनी विश्वासला जवळ बोलावून सांगितले की, "स्वानंदीचे गर्भाशय खूप नाजूक असल्याने तिला पुन्हा दिवस न जाण्याची काळजी घ्या नाहीतर बाळ किंवा आई कोणाच्याही जीवाला धोका होऊ शकतो."

स्वानंदीची ही बातमी ऐकून तिच्या सासरच्या लोकांनी तिला समजावून न घेता तिला दोष देण्यास सुरुवात केली, "काय बाई हा नाजूकपणा म्हणायचा ? मुले होऊ द्यायची नाही तर मग मुलगा तरी जन्माला घालायचा होता ना ? जन्माला घातली मुलगी. परक्याचं धन. आता आमच्या विश्वासचा वारसदार कोण ?"

स्वानंदीच्या सासूसासऱ्यांनी विश्वासचे नाव लावणारा वारस हवा ह्यासाठी विश्वासचे दुसरे लग्न करून दिले. स्वानंदी ह्या सगळ्या प्रकरणाने सुन्न झाली होती आणि केवळ बघ्याची भूमिका तिने घेतली होती.

स्वानंदीची सवत कावेबाज आणि अप्पलपोटी होती. तिला मुलगा झाल्यावर तिने बरीच प्रॉपर्टी आपल्या आणि मुलाच्या नावावर केली. तिला कुठलीही बंधने नको असल्याने ती विश्वासला घेऊन वेगळी राहू लागली. तिने विश्वासवर काय जादू केली माहीत नाही; विश्वास तिच्या शब्दाबाहेर नव्हता. स्वानंदीच्या नवऱ्याचे आणि सासरच्यांचे गलिच्छ वागणे पाहून नयन स्वानंदीला कायमचे माहेरी न्यायला आला असता स्वानंदीने त्याच्याबरोबर माहेरी जाण्यास नकार दिला.

काही वर्षांनी स्वानंदीच्या मोठ्या दिरांचा मुलगा शिक्षणासाठी परदेशी निघून गेला. तिथे त्याला चांगली नोकरी लागल्यावर त्याच्या आई-वडिलांना त्याने तिथे बोलावून घेतले. आता स्वानंदी, तिची लेक आणि तिचे सासूसासरे इतकेच वाड्यात उरले. तिच्या सासऱ्यांना पॅरेलिसिस होऊन त्यांनी अंथरूण पकडले. तसेच सासू देखील वयोपरत्वे थकली असल्याने सासूसासऱ्यांचा भार स्वानंदीवर पडला.

स्वानंदी सासूसासऱ्यांचे सारे काही मनापासून करत होती. आता स्वानंदीच्या सासूसासऱ्यांना स्वतःच्याच कृत्याची लाज वाटत होती. सासूसासऱ्यांनी स्वानंदीचा कधीच विचार केला नव्हता. सगळ्यांनी साथ सोडली तरीही स्वानंदी कर्तव्य म्हणून सासरी तग धरून उभी राहिली होती आणि ह्याच गोष्टींची जाणीव तिच्या सासूसासऱ्यांना झाली होती.



स्वानंदी तिच्या लेकीसाठी जगत होती. ईशाला चांगले संस्कार, चांगले शिक्षण देऊन घडवत होती. ईशाला आई आणि वडिलांचे प्रेम देत होती. तिच्या सासऱ्यांनी त्यांचा अंत जवळ आला आहे असे वाटून त्यांनी राहता वाडा स्वानंदीच्या नावे केला. जी नात त्यांना नकोशी होती त्या नातीच्या नावावर काही रक्कम त्यांनी ठेवली. स्वानंदीने जे काही भोगले होते तिच्या पुढच्या आयुष्यात ती मानाने जगायला हवी ह्यासाठी तिच्या सासऱ्यांनी घर स्वानंदीच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला होता. मरतेवेळी स्वानंदीची माफी मागून तिच्या सासऱ्यांनी प्राण सोडला. सासऱ्यांच्या पाठोपाठ स्वानंदीच्या सासूबाईंचे निधन झाले.

स्वानंदीला तिचा दादा भेटायला आला आणि म्हणाला, "स्वानंदी, मला माहिती आहे तुला संसारसुख कधीच मिळाले नाही. आता ह्या मोठ्या वाड्यात तुम्ही मायलेकी दोघीचं कशा राहाल? आपल्या घरी चल. आपण सगळे मिळून राहू. तुमच्या दोघींचा माझ्या मनात सारखा विचार असतो. आई देखील तुझी सारखी काळजी करत असते. निदान आईला तरी भेटायला चल."

"दादा, मी आईला येईन भेटायला पण आता ह्या वाड्यातच माझा शेवट होईल. तू काही तुझ्या घरी कायमचे येण्याचा आग्रह करू नकोस. माझ्या सासऱ्यांनी माझी कदर ठेऊन मी मानसन्मानाने जगावे म्हणून तरतूद करून ठेवली आहे. आता मला सन्मानाने जगू दे." स्वानंदी नम्रपणे म्हणाली. स्वानंदीचा दादा हताशपणे निघून गेला.

काही दिवसांनी स्वानंदीच्या आईचे निधन झाले. आईच्या अंतिम क्षणी स्वानंदी आईजवळ होती. आईचा अखेरचा प्रेमळ सहवास तिला मिळाला होता.

स्वानंदीने लेकीला उच्च शिक्षण दिले. तिला स्वावलंबी बनवले. तिची लेक स्वतःच्या स्कॉलरशिपवर आयुर्वेदिक डॉक्टर झाली होती आणि तिचा नवरा देखील आयुर्वेदिक डॉक्टर होता. तिच्या लेकीने प्रेमविवाह केला होता. तिचे आणि पार्थ जगदाळेचे कॉलेजपासून प्रेम होते. पार्थचे कुटुंब सुशिक्षित आणि पुढारलेल्या मतांचे होते. ईशाचे सासर आणि क्लिनिक स्वानंदीच्या घरापासून अर्ध्या तासाच्या अंतरावर होते. त्यामुळे ईशा तिच्या आईला रोज भेटायला जात असे. स्वानंदीने ईशाच्या प्रेमाला मान्यता देऊन लेकीचे लग्न लावून दिले होते. ईशाला आपल्या आईच्या कष्टांची, तिच्या दुःखांची जाणीव होती आणि त्या करताच आपल्या आईला पुढच्या आयुष्यात कसे सुखी ठेवता येईल ह्यासाठी तिची धडपड असायची.

विश्वासचे चार महिन्यांपूर्वी हृदयविकाराचा झटका येऊन निधन झाले होते. विश्वासने स्वानंदी आणि ईशाचा कधीच विचार केला नव्हता. ज्या बायको आणि मुलासाठी त्याने स्वानंदी आणि ईशाला दुर्लक्षले होते तीच बायको आणि मुलगा विश्वासला चांगली वागणूक देत नसत. मुलगा तर अतिलाडाने बिघडला होता. विश्वासला त्याची चूक समजली होती; पण आता खूप उशीर झाला होता.

विश्वास गेल्यावर लादलं गेलेलं नातं देखील संपुष्टात आले होते. नवरा असूनदेखील नसल्यासारखा आणि तरीही मंगळसूत्राचे ओझे तिला बाळगावे लागत होते. आता स्वानंदी खऱ्या अर्थाने मुक्त झाली होती. आयुष्यातल्या अनेक कटू आठवणींनी स्वानंदीला मानसिक त्रास होत होता त्यात आता बाबा सिरीयस आहेत असा दादाकडून निरोप आला होता.

"ताई, तुमचं घर आलं." ड्रायव्हरच्या बोलण्याने स्वानंदीची तंद्री भंगली आणि स्वानंदी धडधडत्या अंतःकरणाने घरात शिरली. स्वानंदी बाबांजवळ गेली. स्वानंदीच्या बाबांनी थरथरत्या हाताने तिचा हात हातात घेतला.

कापऱ्या आवाजात बाबा म्हणाले, "स्वानंदी! बाळा, तुला भेटण्यासाठी थांबला होता बघ जीव माझा. तुला पाहिलं आता मी मरायला मोकळा झालो. स्वानंदी, खूप सोसलंस. तुझ्या स्वप्नांचा मी चुराडा केला. मी तुझा दोषी आहे. मला माफ कर मुली. मला माफ कर." एवढे बोलून स्वानंदीच्या बाबांनी प्राण सोडला.

"बाबा." स्वानंदीने टाहो फोडला. नयनने स्वानंदीला जवळ घेऊन धीर दिला.

जवळपास पंधरा दिवस राहून स्वानंदी आपल्या घरी गेली. ईशा आणि पार्थ तर तिथे होतेच. स्वानंदी घरी आल्याआल्या ईशाने तिला घट्ट मिठी मारली.

स्वानंदी घरी आल्यावर ईशा तिच्या सासरी गेली. आता स्वानंदी पुन्हा एकटी त्या वाड्यात उरली. ईशाने तिला खूप वेळा सांगितले होते की, "माझ्या घरी चल, इथे एकटी राहू नकोस." तरी स्वानंदीने तिचे म्हणणे कधीच ऐकले नव्हते.

जवळपास पंधरा दिवसांनी ईशा स्वानंदीकडे आली. तिने स्वानंदीच्या हातात विमानाचे तिकीट आणि बुक केलेले केरळ टूरचे पॅकेजचे पत्रक दिले.

"अगं! हे काय आहे ईशा?" स्वानंदीने आश्चर्याने विचारले.

"आई, तुझ्यासाठी केरळ ट्रीप मी एका ट्रॅव्हल्स तर्फे बुक केली आहे. जवळपास तीस वर्षे घरात स्वतःला कोंडून घेतलंस. कुठेही फिरायला अशी गेली नाहीस. ते काही नाही. आता स्वतःसाठी जग. तुला निसर्गरम्य ठिकाणी फिरायला आवडतं ना? आता तुला हवे तिथे फिरून घे. जा सिमरन जा, जी ले अपनी जिंदगी." ईशा अभिनय करत म्हणाली.

स्वानंदीला खूप हसू आले. तिने ईशाचे आभार मानले.

स्वानंदीसाठी ईशाने छान ड्रेस आणले. सुंदर साड्या आणल्या. त्यावर त्याला शोभतील असे आर्टिफिशिअल दागिने आणले. स्वानंदीने टूरला जाण्याची तयारी केली. त्यासाठी तिला पहिल्यांदा मुंबईत जायचे होते. ईशा आणि पार्थ तिला मुंबईला सोडून आले. ट्रॅव्हल्सच्या आयोजकांनी सगळ्या पर्यटकांची ओळख करून घेतली. पर्यटकांमधून

‘सुहास गायकवाड’ हे नाव स्वानंदीच्या कानावर पडले. साहजिकच स्वानंदीची नजर सुहासला शोधू लागली. ‘हा माझा सुहास तर नाही ना?’ ज्याच्यावर मी जीवापाड प्रेम केले होते. सुहासचा विचार करतच स्वानंदीने विमानात प्रवेश केला. तिच्या बाजूच्याच सीटवर बसण्यासाठी सुहास आला. दोघेही एकमेकांकडे पाहत राहिले. दोघांच्याही छातीत धडधडू लागले होते. काय बोलावे दोघांनाही सुचत नव्हते. शेवटी सुहास म्हणाला, “स्वानंदी, कशी आहेस?” “मी ठीक आहे सुहास. तू कसा आहेस?” स्वानंदीने विचारले. “मी देखील ठीक आहे. किती वर्षांनी भेटतो आहोत आपण. काय बोलावे काही सुचत नाही.” सुहास म्हणाला. स्वानंदी मान खाली घालून बसली होती. तिलाही काय बोलायचे सुचत नव्हते.

“तू देखील ह्या ट्रॅव्हल्स तर्फे केरळला येते आहेस का?” सुहासने विचारले.

“हं, हो! माझ्या लेकीने माझ्यासाठी हे पॅकेज बुक केले आहे.” स्वानंदी म्हणाली.

“अरे वाह! माझ्या मुलाने मला केरळ फिरायला पाठवले आहे. किती वर्षे आपला काहीच संपर्क नव्हता त्यामुळे तुझ्याबद्दल काहीच माहिती नव्हती. मी देखील तुझ्या लग्नानंतर नागपूरला निघून गेलो. तू एकटी आली आहेस फिरायला? तुझे मिस्टर नाही आले? सुहासने विचारले.

एक उदासीपणाची रेष स्वानंदीच्या चेहऱ्यावर उमटली, “माझे मिस्टर सहा महिन्यांपूर्वी वारले. तुझी बायको नाही आली का तुझ्याबरोबर?”

“नाही. माझ्या अभिरचा जन्म झाला आणि चार महिन्यांत माझी बायको जग सोडून गेली. तिला बाळंतपणात कसलेतरी इन्फेक्शन झाले होते. घरातल्या लोकांनी, नातेवाईकांनी, मित्रमंडळींनी मला अनेकवेळा सल्ले दिले की लहान बाळासाठी दुसरे लग्न कर. पण मला नंतर इच्छाचं झाली नाही पुन्हा लग्न करण्याची.” सुहास म्हणाला.



“अरे बापरे! सॉरी, मला माहीत नव्हते.” स्वानंदी म्हणाली.

“कसं माहिती असेल? तुझ्या लग्नानंतर मी इतका खचून गेलो होतो. खूप उदास उदास राहत होतो. गाणे वगैरे बाजूला ठेऊन मी नागपूरला नोकरी करू लागलो. माझ्या आयुष्यात स्मिता आली. स्मिता आमच्याच ऑफिसमध्ये होती. तिने मला पुन्हा माणसांत आणले. मला संगीतक्षेत्रात पुढे शिक्षण घ्यायला लावले. मी तिच्याशी लग्न करणार नव्हतो, पण तिने जणू चंगच बांधला होता माझ्याशी लग्न करण्याचा. सरतेशेवटी आमचे लग्न झाले. मी खूप सुखी होतो. मला खूप चांगली पत्नी मिळाली होती; पण दैवाला माझं सुख मंजूर झाले नाही आणि स्मिताला भरल्या संसारातून त्याने नेले. माझ्या छोट्या बाळाला माझ्या स्वाधीन करून गेली ती. “सुहासने एक मोठा उसासा सोडला आणि पुढे म्हणाला,” स्वानंदी, तू तुझ्या संसारात

सुखी होतीस ना?"

सुहासच्या प्रश्नावर स्वानंदीने तिची कर्मकहाणी सुहासला कथन केली.

"स्वानंदी, तू देखील किती भोगलंस ग तुझ्या आयुष्यात. तुझी लेक तुला बरोबर म्हणाली आहे की आता तू स्वत:साठी जग. तुला निसर्गात राहायला आवडतं ना? तुला केरळ खूप आवडेल. छान मनसोक्त भरभरून निसर्गाचा आनंद घे." सुहास म्हणाला.

"हम्म." स्वानंदीच्या डोळ्यांत पाणी तरळले होते.

"बरं! आता आपण फिरायला जातो आहोत ना तर हे असे डोळ्यांत पाणीबिणी नाही आणायचे. छान सात दिवस फक्त आनंद उपभोगू या आपण. ठीक आहे? आणि ह्या माणसाची सोबत तुला चालेल ना?"सुहासने स्वानंदीला विचारले.

स्वानंदीने सुहासच्या प्रश्नावर केवळ मंद स्मित केले. विमान केरळमध्ये लँड झाले. आयोजकांनी फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये पर्यटकांची सोय केली होती. स्वानंदीला एक छान रूममेट मिळाली आणि नेमकी सुहासची रूम स्वानंदीच्या बाजूलाच होती. हॉटेलमध्ये पोहचल्यावर स्वानंदीने ईशाला ती सुखरूप पोहोचल्याचा फोन केला. दुपारी हॉटेलच्या डायनिंग हॉलमध्ये सगळ्यांनी लंच केले. लंच झाल्यावर पर्यटकांना एका बीचवर नेले. सूर्यास्त पाहताना स्वानंदी भारावून गेली होती. कित्येक वर्षांनी सुंदर निसर्ग ती डोळ्यांत साठवत होती.

रात्री आठ वाजता डिनर झाल्यावर काही हौशींनी गाण्याच्या भेंड्या सुरू केल्या. पुरुष विरुद्ध स्त्रिया असल्याने स्त्रिया बाजी मारत होत्या. तरी सुहास आपला संघ पडू देत नव्हता. 'न' अक्षर आल्यावर स्वानंदीने 'नाही कशी म्हणू तुला' हे गाणे म्हटले तर सुहासने 'भेट तिची माझी स्मरते' हे गाणे गाऊन दोघांनी सगळ्यांची वाहवा मिळवली. स्वानंदीने कितीतरी वर्षांनी गाणे म्हटले असल्याने तिच्या मनाला आनंद मिळाला होता. गाणी म्हणताना सुहास आणि स्वानंदी एकमेकांकडे चोरटा कटाक्ष टाकत होते.

एरहाना बहुतेकांना समजले होते की, स्वानंदी आणि सुहास हे एकमेकांना त्यांच्या कॉलेजपासून ओळखतात. त्यामुळे त्या दोघांच्या ह्या अनपेक्षित झालेल्या भेटीचे सगळ्यांना अप्रूप वाटत होते. ट्रॅव्हल्सच्या आयोजकांनी पर्यटकांना केरळमधील प्रेक्षणीय स्थळे दाखवली. केरळमधील निसर्गाचा आविष्कार पूर्णपणे उपभोगून स्वानंदी तृप्त झाली होती. दुसऱ्या दिवशी सहलीचा शेवटचा दिवस होता. संध्याकाळी चार वाजताचे परतीचे फ्लाईट होते. मुंबईमध्ये ईशा आणि पार्थ स्वानंदीला न्यायला येणार होते. सुहासची आता ह्यापुढे भेट होणार नाही ह्या कल्पनेने स्वानंदीला कसेनुसे झाले होते. इथे सुहासची देखील तीच गत होती. दोघांना एकमेकांना सोडून जाण्याचे खूप दु:ख वाटत होते. दोघांनाही रात्री झोप लागली नाही.

नशिबाने दोघांची भेट तर घडवली होती; पण ती ह्या अशा परिस्थितीत की ते दोघे पुन्हा एकत्र येऊ शकणार नव्हते. शेवटी त्यांची मुले आणि समाज यांची त्यांच्यावर बंधने होती.

रात्रभर स्वानंदी आणि सुहास झोपलेले नव्हते. पूर्ण रात्र दोघांनी ह्या कुशीवरून त्या कुशीवर जागून काढलेली होती. सकाळी सहा वाजता स्वानंदी फ्रेश होऊन हॉटेलच्या लॉनवर चालायला गेली. तिथे

सुहास आधीच येऊन गवतावर चालत होता.

"स्वानंदी, झोपली नाहीस? इथे गवतातून चालायला बरे वाटते आहे म्हणून मी आलो. मला वाटलं तू झोपली असशील म्हणून मी तुला उठवले नाही." सुहास म्हणाला.

"झोप अशी लागली नाही रे म्हणून उठून आले. आज दिवसभर असे कुठे फिरायचे नाही त्यामुळे थोडा आराम आहे. आपल्या गाईडने प्रथमेशने सांगितलं आहे की, ज्याला शॉपिंग करायची आहे तो शॉपिंग करायला बाहेर पडू शकतो. लेकीला विचारलं तुला काही हवं आहे का तर म्हणाली काहीच नको आणूस. मग उगीच कशाला जाऊ शॉपिंगला?" स्वानंदी म्हणाली.

"अग इथे साऊथ सिल्क किंवा कॉटनच्या साड्या खूप छान मिळतात. माझा विचार आहे माझ्या सुनेसाठी घेण्याचा. तू पण तुझ्या लेकीसाठी घे." सुहास म्हणाला.

"तुझ्या लेकाचं लग्न झालं आहे? इतक्या दिवसांत काही बोलला नाहीस." स्वानंदी म्हणाली.

"अग, त्याचं अजून लग्न झालेलं नाही, पण त्याने स्वतःचं स्वतः ठरवलं आहे. ध्रुवी नाव आहे तिचं. अतिशय गोड मुलगी आहे. बरं ऐक ना, आपण चहा घेता घेता गप्पा मारु या. चालेल ना तुला?" सुहास म्हणाला. ते दोघे हॉटेलच्या कॉफी शॉपमध्ये शिरले.

"अरे वाह! म्हणजे तू आता सासरेबुवा होणार." स्वानंदी म्हणाली.

"तू पण झाली आहेस की सासू तुझ्या जावयाची." सुहास म्हणाला.

"हो रे! खूप छान आहे माझा जावई. लेकीला चांगली माणसे मिळाली. खूप प्रेमळ आणि आधुनिक विचारांची आहेत. मला अजून काय हवे?" स्वानंदी म्हणाली.

"तुला घ्यायला कोण येणार आहे एअरपोर्टवर? माझा लेक आणि सून येणार आहे. लेकाने प्लॅन केला आहे आम्ही एक रात्र मुंबईमध्ये राहणार आहोत. उद्या सकाळी नागपूरला जायला निघू." सुहास म्हणाला.

"माझी मुलगी आणि जावई येणार आहेत. त्यांचा काय प्लॅन आहे मला ठावूक नाही." स्वानंदी म्हणाली.

"आपण नाश्ता करू या आणि शॉपिंगला जाऊ या. येशील ना माझ्या सोबत?" सुहासने विचारले.

चहा, नाश्ता करून दोघे आपापल्या रूममध्ये तयार होण्यासाठी गेले. स्वानंदीने प्लेन फिकट गुलाबी रंगाची साडी नेसली. त्या साडीवर शोभतील असे नाजूकसे मोत्याचे दागिने घातले. ह्या वयातही किती सुंदर दिसत होती स्वानंदी. तयार झाल्यावर दोघे

"स्वानंदी, किती छान दिसतेस." सुहास पटकन बोलून गेला. स्वानंदीने त्याच्याकडे पाहून नुसते स्मितहास्य केले.

शॉपिंगसाठी दुकानात शिरल्यावर स्वानंदीपेक्षा सुहासचा उत्साह जास्त होता. त्याने आपल्या सुनेसाठी दोन कॉटन आणि दोन सिल्कच्या साड्या घेतल्या. स्वानंदीसाठी एक साडी त्याने गुपचूप बाजूला ठेवली.

स्वानंदीने देखील आपल्या लेकीसाठी दोन साड्या घेतल्या आणि दोन ड्रेसपीस घेतले.

लंचनंतर सगळेजण एअरपोर्टला जाण्यास निघाले. गाडीत बसल्यावर सगळ्यांनी एकमेकांचे

नंबर शेअर केले. काही हौशी कलाकारांनी आपल्या सहलीविषयी आणि आपल्या गाईडसाठी कृतज्ञता व्यक्त करायला कविता केल्या होत्या त्या त्यांनी सादर केल्या. काहींनी आपले मनोगत व्यक्त केले.

एअरपोर्टला पोहोचल्यावर सगळ्यांनी एकमेकांसोबत सेल्फी काढले. सात दिवसांच्या सहवासाने सगळ्यांमध्ये मैत्रीचे संबंध झाले होते. केरळवरून त्यांचे फ्लाईट मुंबईसाठी झेपावले.

मुंबईत चेक आऊट वगैरे करून स्वानंदी आणि सुहास एअरपोर्टच्या बाहेर आले. दोघांनाही आपली मुले दिसली नाहीत. दोघांनी आपल्या मुलांना फोन केला तर दोघांची मुले म्हणाली की, 'आम्ही थोड्या वेळात पोहचतो. ट्राफिकमध्ये अडकले आहोत.' एअरपोर्टच्या बाहेर बसून राहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. त्यांच्याबरोबरची सहलीमधील बरीच मंडळी आपापल्या दिशेने निघून गेली होती.

"स्वानंदी, खरं सांगायचं तर तुला सोडून जाण्याचे मन होत नाही; पण काय करणार ? ह्या वयात मी तुला हे देखील विचारू शकत नाही की स्वानंदी आपण पुन्हा नव्याने एकत्र येऊ शकतो का ? समाज आणि आपल्या मुलांचा विचार मनात येतो. पुढे आपण कधी भेटू ते देखील माहीत नाही. खूपच विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे." सुहासच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले होते. त्याने स्वानंदीसाठी गुपचूप घेतलेली साडी तिच्या हातात ठेवली.

"सुहास, ही साडी माझ्यासाठी ?" स्वानंदीने विचारले.

"हो स्वानंदी, माझ्याकडून तुला एक छोटीशी भेट. माझी एक आठवण तुझ्यापाशी राहावी म्हणून मी तुला ही साडी घेतली." सुहास म्हणाला.

"थँक्स सुहास. बघ ना, नशिबाने आपली भेट घडवली ती देखील आयुष्याच्या ह्या वळणावर. का दैवाने आपली भेट घडवून आणली ? आपण आपले जीवन आहे तसे जगणार होतो मग ह्या भेटीचे आपल्याला दैवाने आमिष का दाखवले ? ह्यापुढे कधी भेटू ते देखील माहीत नाही. आता ह्या आपल्या सात दिवसाच्या भेटीची आठवण ठेवून उरलेले आयुष्य काढायचे एवढेच आपल्या हातात आहे." स्वानंदीचा उर भरून आला होता.

"त्याची काही एक गरज नाही. तुम्ही दोघे अजूनही एकत्र येऊ शकता." स्वानंदी आणि सुहासने चमकून वर पाहिले तर त्यांच्या पुढ्यात ईशा होती. ईशाच्या मागे पार्थ, अभिर आणि ध्रुवी उभे होते.

"तुम्ही सगळे एकत्र कसे ?" स्वानंदीने आश्चर्याने विचारले.

"आई, पहिल्यांदा तर मी तुझी माफी मागते. तू मामाकडे गेली होतीस तेव्हा तुझी खाजगी डायरी वाचली. त्या डायरीतील मी तुझे मन वाचले. तू त्या डायरीमध्ये सुहास सरांबद्दल सारे काही लिहिले आहेस. मी 'सुहास गायकवाड' हे नाव फेसबुकवर शोधलं. तिथे त्यांचा मुलगा अभिर मला दिसला. अभिरशी मेसेंजरवर संपर्क केला असता त्याने आपल्या वडिलांबद्दल सारे काही सांगितले. मी त्याला तुझी कहाणी सांगितली. मग आम्ही दोघांनी ठरवले की जे तुमच्या दोघांचे प्रेम असफल झाले होते ते तुम्हा दोघांना परत मिळवून द्यायचे. मग आम्ही दोघांनी प्लॅन करून तुम्हाला एकत्र केरळला पाठवले." ईशा म्हणाली.

"बाबा, माझी आई माझ्या लहानपणी सोडून गेली. तुम्ही मला तुमच्या हाताचा पाळणा करून वाढवले. तुम्हाला संसारसुख मिळाले नाही. फक्त आणि फक्त माझाच विचार केलात. तुम्ही दोघांनी खूप सोसलंत. आता उर्वरित आयुष्य एकमेकांच्या साथीने घालवायचे."अभिर म्हणाला.

"अरे पण,""

"बाबा, कुठला समाज ? जेव्हा आपल्याला गरज असते तेव्हा येतो का तो समाज आपल्यासाठी ? लोकं दोन्ही बाजूंनी बोलतात त्यांना घाबरून आपण आपल्या आयुष्याचा विचार करायचा नाही ? ते काही नाही आम्हाला चौघांनाही वाटतं की आता तुम्ही दोघांनी एकत्र यावे. एकमेकांची साथ तुम्हाला लाभावी. उद्या आपण सगळे नागपूरला जाऊ. तुम्ही दोघे एकमेकांच्या साथीने आयुष्याचा पुढचा प्रवास सुरू करा." अभिर म्हणाला.

"ईशा तुझ्या सासरचे काय विचार करतील माझ्याबद्दल ? ह्या वयात मी दुसरे लग्न कसे करू ?" स्वानंदी म्हणाली.

"आई, माझ्या घरच्या लोकांना मी सगळं सांगितलं आहे. त्यांनी सगळ्या गोष्टींना मान्यता दिली आहे." पार्थ म्हणाला.

"बाबा, माझ्या आईला प्रपोज करा पाहू." अभिरने एक अंगठी सुहासच्या हातात दिली.

"स्वानंदी, माझ्याशी लग्न करशील ?" सुहासने गुडघ्यावर बसून आणि स्वानंदीच्या समोर अंगठी धरून विचारले. स्वानंदीने लाजून होकार दिला. चारही मुलांनी टाळ्या वाजवल्या.

"आई, ह्या प्रसंगी तर तुझे गाणे झालेच पाहिजे. प्रसंगानुरूप अगदी फीट बसते आहे ते." ईशा म्हणाली.



स्वानंदीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू पाझरत होते. त्याच भावनांच्या हिंदोळ्यावर स्वानंदी गाऊ लागली, 'नाही कशी म्हणू तुला म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने आड येते रीत.'


## विनोद

**काल एकाला उधारी मागण्यासाठीघरच्या लँडलाईन वर फोन केला,तर तो म्हणतो,''अरे यार, थोडा वेळाने फोन कर...**

**मी आता गाडी चालवतोय..."**

# टीप्स

**अंडी उकडताना न फुटण्यासाठी**

जर अंडी उकडताना फुटत असल्यास काळजी करू नका. अंडी उकडायला ठेवताना पाण्यात थोडं मीठ घालावं आणि मग अंडी उकडावीत. मग अंडी छान उकडली जातील.

**एखादा पदार्थ लागल्यामुळे भांड खराब झाल्यास**

जर जेवण बनवताना एखादा पदार्थ जळल्यामुळे भांड खराब झाल्यास ते स्वच्छ करणं कठीण जातं. असं झाल्यास चहा करून उरलेल्या चोथा आणि पाणी त्या भांड्यात काहीवेळ घालून ठेवा. त्यानंतर स्वच्छ करा भांड अगदी चमकेल.

**मिक्सरच्या ब्लेडला धारदार करण्यासाठी**

काही वेळा मिक्सर वारंवार वापरल्यामुळे त्यातील ब्लेड खराब होतं आणि धार कमी होते. हे टाळण्यासाठी मिक्सरच्या भांड्यात महिन्यातून किमान एकदा मीठ घालून ते फिरवून घ्या. यामुळे ब्लेडची धार चांगली होईल.

**मऊ ईडल्या बनवण्यासाठी**


ईडली मऊ आणि फुगण्यासाठी होण्यासाठी त्याच्या पीठात थोडे उकडलेले तांदूळ वाटून घाला. तसंच ईनो किंवा बेकींग सोडा घाला. असं केल्याने ईडल्या मऊ होतील आणि टम्म फुगतील.

**मोकळा भात कसा शिजवावा**


खूप महिलांची अशी तक्रार असते की, भात मोकळा होत नाही. शिजल्यावर भात एकदम गच्च होतो. जर तुम्हाला मोकळा भात हवा असल्यास तो झाकणाशिवाय भांड्यात शिजवा. जर असं शक्य नसल्यास भात लावताना त्यात लिंबू पिळावा किंवा त्यात तूप घालावं. त्यामुळे भात मोकळा होतो आणि चिकट होत नाही.

**लिंबाचं सरबत अजून छान कसं बनवता येईल**

लिंबू सरबत बनवताना पाण्यात फक्त लिंबाचा रस नाही तर लिंबाचं सालं ही किसून घालावं.यामुळे लिंबाच्या सरबताची चव अजून छान लागेल. तसंच लिंबाच्या सालातील सत्त्वही आपल्याला मिळेल.



दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



# दिलेश संखे

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**पालघर.**

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

# राजू पाटील

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**पालघर.**

# आयुष्याच्या संध्याकाळी

- माधुरी चौधरी

**"बाबा सध्या आम्ही खूप कामात आहोत. तुमच्याकडे लक्ष द्यायलाही वेळ नाही. आम्ही असे करतो; दिवाळीला आम्हीच येतो तिकडे."**

"सुमे, मी आबांना नेऊ शकत नाही. सांगितलं ना एकदा. अगं माझा मुलगा बारावीला आहे यावर्षी."

संतोष अगदी पोटतिडकीने बोलत होता.

"अरे मग काय झालं राहतील की एका खोलीत. मी पडले मुलगी माझ्या सासरचे ऐकून घेणार नाहीत. नाहीतर मीच नेले असते बाबांना."

सुमती ही दयेचा खोटा आव आणत बोलत होती.

"तू राजेशला का बोलत नाही."

"संतोष भाऊ तू मोठा आहेस ही तुझीच जबाबदारी आहे. तसेही माझी मुले अजून लहान आहेत.त्यात आम्ही  दोघेही कामाला जातो. बाबांकडे कोण लक्ष देईल"

एवढा वेळ शांत बसलेला राजेश बोलला.

माधवराव मात्र खुर्चीवर डोळे मिटून शांत बसले होते.जणू त्यांना या सगळ्याची अपेक्षा होतीच. ज्यांना आपण तळहातावरच्या फोडासारखे जपले,ज्यांच्यासाठी प्रसंगी स्वतःच्या इच्छा मारल्यात त्यांनाच आज आपल्याच बापासाठी दोन वेळेचे जेवण द्यायचे जड जात होते...याच पोरांचा त्यांना किती अभिमान होता. सर्व गावात सांगत फिरायचे त्यांच्या मुलांचे कर्तृत्व पण आज तीच मुले त्यांना अशीवागणूक देत होते. मिटल्या डोळ्यांपुढे माधवरावांसमोर हळूहळू त्यांचा संपूर्ण जीवनपट उभा ठाकला. एक वर्षापूर्वी मंजिरी त्यांना सोडून गेली. तिच्या वर्षश्राद्धासाठी जमलेत की कशासाठी हेच त्यांना समजत नव्हते .

मंजिरी माधवरावांची पत्नी लग्न होऊन घरी आली तेव्हा माधवरावांचे एकत्र कुटुंब होते. शेती विषयात पदवी घेऊन माधवराव आधुनिक पद्धतीने शेती करत होते तर त्यांचे दोन भाऊ शिकत होते. मंजिरीचा संपूर्ण दिवस कामामध्ये जायचा.

माधवरांनी दोन्ही भावांना छान शिकवले ते नोकरीला लागून शहरातच स्थायिक झाले. संतोष, राजेश, सुमती ही त्यांच्या संसारवेलीवरची फुले. मंजिरीने स्वतःला घरादारासाठी वाहून घेतले. कसलीही अपेक्षा न करता ती दिवसरात्र राबायची. संतोष बारावी होऊन घराबाहेर पडला आणि खर्चाचा आलेख वाढतच गेला. त्याचे इंजिनीअरींग झाले तेव्हा माधवरांनी सुटकेचा श्वास सोडला.

"मंजिरे, आता सायबाची माय होणार तू. वट आहे बाबा एका बयेची."

"जावा.... तुमचं आपलं कायतरीच"

म्हणत मंजिरी लाजली. माधवराव पुढे काही बोलणार येवढ्यात फोनची रिंग वाजली.

"हॅलो बाबा मी संतोष ...मला बंगलोरला एमबीए करायचे आहे... माझा नंबरही लागला आहे... मला फी साठी व इतर खर्चासाठी पाच लाख रूपये हवे."

"आरे पोरा, पण एवढे पैसे आणायचे कुठून ?"

"तो तुमचा प्रश्न आहे बाबा.. माझा नाही"

म्हणत संतोषने फोन ठेऊनही दिला होता. क्षणात आनंदात असणारे माधवराव पैशांच्या काळजीने मटकन खाली बसले. दोनच दिवसांपूर्वी त्यांनी राजेशची इजिनीयरिंगची फी भरली होती. सुमतीला पण बारावीचे क्लास लावायचे होते.... दहा एकराच्या शेतीच्या तुकड्याच्या भरवश्यावर ते काय काय करणार होते...

"कशाला काळजी करता हे घ्या माझे स्त्रीधन अन् भागवा नड यावेळी.." म्हणत मंजिरीने होते नव्हते ते माधवरावांच्या हातावर ठेवले.येथूनच जमाखर्चाचे गणित चुकत गेले.त्यातच पावसानेही धोका दिला आणि माधवराव पार कोसळलेच.... काळाच्या ओघात डोक्यावर कर्जाचा डोंगर साचला होता.... एक दिवस कर्जवसुलीसाठी बॅकेतून फोन आला..



"मंजिरे असं वाटलं होतं की पोर शिकली सवरली, नोकरीला लागली की करतील मदत पण नशीबच खोटे ग.."

"काय चिंता करू नका होईल सर्व व्यवस्थित "

मंजिरी माधवरांना धीर देत होतीय; पण ती सुद्धा आतून फारच कोसळली होती. शेवटी पाच एकरचा तुकडा विकून कर्ज फेडले होते. पण दोघही मुलांनी कौडीची मदत केली नव्हती.

" बाबा तुमची काय इच्छा आहे..."

सुमतीच्या आवाजाने माधवराव भानावर आले.

"कसली..."

"तुमची राहण्याची काय सोय..."

"माझे मी बघून घेईल.... तुम्ही कुणीच चिंता करू नका."

"बाबा पण मला माझा हिस्सा विकायचा आहे ....माझ्या मुलाच्या पुढच्या शिक्षणासाठी सोय करायची आहे.... म्हणूनच तर जमलोय ना आपण आज."

संतोषची बायको जरा तोऱ्यातच बोलली.

"आज मंजिरीचे वर्षश्राद्ध, जरा आज तर शांत रहा...."

"आता झाले की वर्ष बाबा आणि पुन्हा पुन्हा इथे यायला आम्हाला कुठे परवडते.... एकदा आले तर चार पाच हजाराचे पेट्रोलच लागते नुसते.."

राजेश बोलला. लाखोने कमावणारा आज हजार रुपये बोलून दाखवत होता....



"हो ना; तुमच्या हाताने दोघांना दोन हिस्से देऊन टाका म्हणजे टेंशनच नाही.."

"वा रे, दोन का ? मलाही हिस्सा हवाय..."

सुमती मध्येच बोलली......

"सरळ विकून टाका तो जमिनीचा तुकडा अन् प्रत्येकाचा हिस्सा देऊन टाका." संतोषची बायको तिच्या म्हणण्यावर ठाम होती.....

"जमिनीचा तुकडा विकायचा ?... मग मी खायचे काय ?" माधवराव विषण्ण झाले होते.

"एकट्या जीवाला असे लागते तरी किती ?आणि काही लागले तर आम्ही आहोतच की"

माधवरावांनी सरळ गप्प बसणेच योग्य समजले. एक वर्षापूर्वी मंजिरीच्या उपचारासाठी याच मुलांनी हात वर केले होते, ते आपली काय काळजी घेतील. माधवरावांच्या मनात येऊन गेले व ते पुन्हा भूतकाळात गेले. अशीच ती दुपार होती. सकाळची न्याहरी खाऊन मंजिरी आणि माधवराव शेतातल्या खोपट्यात निवांत बसले होते. सकाळी भल्या पहाटेपासून कामाला लागल्याने दोघेही थोडी थकली होती.

"मला काय वाटतेय दोन तीन दिवस पोरांकडे फिरून यावे. कधीचेच नातवंडांना भेटलो नाही हो."

मंजिरीने मनातले बोलून दाखवले.

"मलाही खूप आठवण येतेय पोरांची. थांब फोनच लावतो. जाऊन येऊ आपण पुढच्या आठवड्यात."

म्हणत माधवरावांनी संतोषला फोन लावला.

"हॅलो"

"हॅलो, बेटा कसे आहात सगळे ? आम्हाला तुमची खूप आठवण येतेय. आम्ही पुढच्या आठवड्यात येतोय तुझ्याकडे."

माधवरावांनी एका दमात सांगून टाकले.

"बाबा सध्या आम्ही खूप कामात आहोत. तुमच्याकडे लक्ष द्यायलाही वेळ नाही. आम्ही असे

करतो दिवाळीला आम्हीच येतो तिकडे.''

म्हणत संतोषने फोन ठेवला. संतोषचे उत्तर ऐकून राजेशला फोन करायची इच्छाच झाली नाही माधवरावांना. मंजिरी मात्र खूप नाराज झाली. ज्या पोरांसाठी पोट जाळून संसार केला तेच आज अशी वागत होती. या प्रसंगानंतर ती खमकी वाघीण पार खचली होती. एके दिवशी संध्याकाळी मंजिरीला छातीत दुखायला लागले, दरदरून घाम फुटला. दवाखान्यात गेल्यावर डॉक्टरांनी सांगितले की हृदयविकाराचा झटका येऊन गेला. माधवराव खूपच घाबरून गेले. त्यांनी मुलांना फोन केला. पण 'वेळ नाही' आता तब्बेत तर ठीक आहे आईची, म्हणत संतोष व राजेश दोघांनी यायचे टाळले. ही गोष्ट मंजिरीच्या मनाला खूपच बोचली. दिवसेंदिवस तिची तब्बेत अजून खराब होत गेली.

''अहो, कधी नातवंडांचे तोंड बघते असे झालेय''

''येणार आहेत हं पोरं तू नको काळजी करू.''

माधवराव तिची समजूत काढत होते.

'' कधी ?''

माधवरावांनी तिला समजवण्यासाठी तिचा हात हातात घेतला. ते काय बोलावे याचाच विचार करत होते की पुन्हा एकदा जोरदार झटका येऊन तो देह अनंताच्या प्रवासाला निघाला होता. हाताचा थंडगार स्पर्श होताच माधवरावांनी 'मंजिरे' असा टाहो फोडला.

विचार करत असतानाच माधवरावांनी खरोखरच 'मंजिर' अशी हाक मारली.

''म्हातारा बावचळला वाटते'' एवढा वेळ शांत बसलेली राजेशची बायको बोलली. माधवराव



तरीही शांत होते.

''बाबा काय ठरले मग तुमचे ?'' सुमतीने शांतपणे विचारले.

''ऐका, जोपर्यंत मी जीवंत आहे तोपर्यंत हे घर आणि शेती मी विकणार नाही. शेती दुसऱ्यांना कसायला देऊन येणाऱ्या पैशांमधून मी माझा खर्च भागवेन''

''मग आम्ही सद्धा तुमचे काहीही करणार नाही.'' संतोषची बायको रागातच बोलली.

''नका करू पोरांनो माझे काही... मी इथेच डबा लावून घेईल किंवा वृद्धाश्रमात जाईन.''

बस्स येवढेच बोलून माधवराव तिथून उठून विठ्ठलाच्या दर्शनासाठी मंदिराकडे जायला निघाले......

दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

# श्रेयस पाटील

**कॉन्ट्रॅक्टर**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**पालघर.**



# ओम पब्लिकेशन

- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे, जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह
- ड्रिंक्स ॲन्ड डाईन -मिनी कॉफी टेबल बुक (मराठी आणि इंग्रजी)

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

संर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१

E-mail : vilaspawar@ompublication.com

# माहेर एक हिरवळ

- कल्पना मापूसकर

**मोजून जास्तीतजास्त अडीच वर्षे. त्यावर 'जा' म्हटले तरी नाही जाऊ शकत ती; कारण मुलं मोठी होतात, शाळेत जातात. मग शाळेला सुट्टी असेल तर दोन दिवस.**

माहेर हे सासरी गेलेल्या मुलीसाठी आल्हाददायक हिरवळीपेक्षा काही कमी नसते. सकाळी उठण्याची रोकटोक नसते. आयता तयार चहा हातात मिळतो. शेजारी-पाजारी माहेरवाशीण आली म्हणून टेकायला मिळते. गप्पा होतात. कौतुकाने तिथेही चहा होतो. गाव भटकून आल्यावर गरम गरम जेवणही तयार असते.

नील : बरेच दिवस झाले माहेरी गेली नाहीस...!!

का...!! अडचण होतेय का माझी तुम्हाला इथे....!!

सुवर्णा भस्कन नीलच्या अंगावर ओरडत बोलली.

नील : अरे.....सहजच विचारले; एवढं चिडायला काय झालं....

सुवर्णा :...का....सहजच विचारले का...

मग मी पण सहजच विचारत होते ना...पूर्वी जाऊन येऊ का दोन दिवस माहेरी म्हणून.

तेव्हा काय म्हणायचात.....

सारखं सारखं काय वाढून ठेवलेल असतं ग माहेरी ?

म्हणायचात ना..... ? ?

मग आत्ताच का माझा माहेरी जाण्याविषयी एवढा पुळका म्हणते मी ? सुवर्णा तावातावाने बोलायला लागली.

तिला तर आयते कोलीतच मिळाले.

नील: असं मी अस काय बोललो की तू एकदम हमरीतुमरीवर आलीस.

सुवर्णा : नाही....तसं तुम्ही काहीच बोलला नाही हो.

जे बोलला ते आधी बोलायला हवे होते

जेव्हा मी माहेरी जाते म्हणत होते तेव्हा 'जा' म्हणायला हवे होते; म्हणजे असे झाले तुमचे, की जेव्हा इच्छा होत होती माहेरी जायची तेव्हा मारून



टाकली आणि आता ढकलून ढकलून पाठवताय माहेरी.

नील: उगाच बोललो...... डोक्याला हात लावत

तुला ना सुवर्णा, प्रेमाचे दोन–चार शब्द बोललेले पचतच नाहीत. असे मला वाटते.

सुवर्णा : कसे पचतील .....

या कानांना ऐकायची सवय नाही ना...

नील: काय झालं....एवढी का डोक्यात गरम हवा भरलीय ?

सुवर्ण : काही नाही. जखमेवर मीठ तुम्हीच चोळता आणि मला विचारता काय झाले म्हणून.

नील : मी काय केलं...प्रेमाने विचारले फक्त माहेरी गेली नाहीस म्हणून!

सुवर्णा : एक सांगू...

बाई २०–२२ वर्षे माहेरी राहते. लग्न झाले म्हणजे काय. लाईटचे बटन दाबल्यासारखे स्विचऑन, स्विच ऑफ होणार का....

काही दिवस, महिने ओढ ही रहाणारच ना....

आणि जाऊन जाऊन किती दिवस जाणार हो माहेरी....!!

मोजून जास्तीत जास्त अडीच वर्षे. त्यावर जा म्हटले तरी नाही जाऊ शकत ती; कारण मुलं मोठी होतात, शाळेत जातात. मग शाळेला सुट्टी असेल तर दोन दिवस. पुढे अजून अडीच वर्षांनी अभ्यासाचा लोड... त्यात ती मुलांचा अभ्यास व शाळा बुडवून तर नाही ना जाणार...!!

अगदीच अडचणी आल्या तर वेळे शाळेचे किती संधान बांधून सर्कस करावी लागते.

बाईची प्रापंचिक जबाबदारी वाढते. घरचे वरिष्ठ थकले भागलेले असतात. त्यांना सोडून जावेसे पण वाटत नाही; पण हेच वरीष्ठ त्यावेळी समजूतदारपणा दाखवत नाही.

म्हणत नाहीत जाऊ दे रे माहेरी...

उलट नवऱ्याचे कानच भरत असतात.

काय ती सारखी सारखी माहेरी जाते...

जरा दम भर तिला....

वास्तविक सासूबाई सुद्धा या परिस्थितीतून गेलेल्या असतात

पण; उपयोग शून्य.

फुकटची कुरघोडी दुसरं काय! बाईवर सासरी हळूहळू कालांतराने जबाबदारी पडली ना की ती आपोआप माहेरचा रस्ता कापू लागते. इच्छा असली तरी शक्य होत नाही.

आणि हळूहळू तिचं सासर तिच्या अंगवळणी पडायला लागतं. जबाबदारीने घेरल्या जाते ती. कुणी जा म्हटलं तरी नाही पाय उचलत तिचा.


म्हणून सांगते...नव्यानवलाईच्या दिवसात मनसोक्त तिला जाऊ द्या माहेरी. माहेरच्या हिरवळीत तिला स्वच्छंदीपणे विहरू द्या.

With best compliments from

# MAHENDRA

## REALTORS AND INFRASTRUCTURE PRIVATE LTD

**Prop -Bhavesh shaha**



# दिवाळीच्या
# हार्दिक शुभेच्छा!



## फेडरेशन ऑफ कमर्शियल प्रिमायसेस अ‍ॅन्ड इंडस्ट्रियल इस्टेट को. ऑप. सोसायटी लि. ठाणे डिस्ट्रीक्ट

**डॉ.विलास ज.पवार**
अध्यक्ष

**डॉ. अनिल खडतरे**
सचिव

**वंदना श्री.काटदरे**
खजिनदार




कार्यालय : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : ०२२-२५३६४१४१.
Email: fed.premises@gmail.com

# दोष कुणाचा

- सुनीता देहरकर

**मी त्याच्या डोळ्यातून वाहणारे अश्रू पुसले व म्हणाले "राजेश मला सुरूवाती पासूनच माहीत होते की, माझे वडील दुसऱ्या कुठल्याही जातीच्या मुलाशी माझे लग्न लावून देणार नाहीत.**

असं म्हणतात की, माणूस परिस्थितीचा गुलाम असतो त्या त्या वेळची परिस्थिती माणसाला घडवत असते व बिघडवत असते. काही लोक सत्य जाणून न घेता दुसऱ्याला दोष देऊन मोकळे होतात व नंतर त्यांना कळून येते की, आपण ज्याला दोष दिला त्या माणसाची तर काहीच चूक नव्हती. माझ्या आयुष्यातही असेच घडले. त्याचीच ही कथा.

साधारणपणे ८७ किंवा ८८ साल असावे. माझे वडील श्री. चंद्रकांत क्षीरसागर यांनी ठाण्यावरून सिंहपूर येथे शिफ्ट होण्याचे ठरवले.आम्ही सुवर्णकार (सोनार) असल्याने सोन्याचे दागिने बनवण्याचा आमचा पिढीजात धंदा होता. वडील ठाण्यालाच सोनार समाजाच्या संघटनेचे अध्यक्ष होते. त्यांना समाजात खूप मान होता. ते स्वतः उत्कृष्ट कारागीर होते. सिंहपूरला आमचे पिढीजाद घर होते. वडील पेढीवरून निवृत्त होऊन सिंहपूरच्या घराचे नव्याने बांधकाम करण्याच्या विचारात होते. आईला पण तो विचार पसंत पडला, आमचे कुटुंब खरेच 'लहान कुटुंब, सुखी कुटुंब' या व्याखेत बसणारे होते. माझ्या आईचे नावं सुधा होते. सुधा म्हणजे अमृत. माझी आई खरंच अमृतासारखी गोड होती. माझे नावं मोहिनी. मी सर्वांत मोठी. मी बारावीच्या वर्गात होते. छोटी बहीण स्विटी, तर सर्वांत लहान भावाचे नाव रोहन होते. वडिलांच्या कलेचा वारसा आमच्याकडे पण चालत आला होता व त्यात प्रावीण्यही मिळविले होते. आम्हा दोघींना शाळेकडून व समाजाकडून बरीच बक्षिसेही मिळाली होती.

आमचे गोत्र जमदग्नी होते आणि आमचे वडील खरोखरच जमदग्नीचा अवतार! आम्हा मुलांवर बंधने नव्हती; पण घरातले नीता–नियम पाळवेच लागत. वडिलांचा स्वभाव करारी तर होताच

पण शिस्तप्रियही होता. मुला-मुलींनी विशेषतः मुलींनी सातच्या आत घरात यायलाच हवे. वडिलांसमोर बोलण्याची कुणाची हिंमत नव्हती. याचा अर्थ वडिलांचे आमच्यावर प्रेम नव्हते असे नाही. वडील आमचे सर्व लाड पुरवत. खाण्या-पिण्याची चंगळ होती. कपडेलत्ते मुबलक असायचे. त्यांना खोटे बोललेले आवडत नसे. स्वैराचार त्यांना पसंत नव्हता. वडिलांनी सिंहपूरला जाण्याचा निर्णय आईला विचारून घेतात. आईवर त्यांचे खूप प्रेम होते व आम्हां सर्वांचेही. सिंहपूरला जाऊन वडिलोपार्जित घर नव्याने बांधायचे असल्याने, तात्पुरते का होईना पण आम्हाला भाड्याने घर घ्यावे लागणार होते. शेवटी आमच्या घरापासून २ मिनिटे अंतरावर असलेल्या देशमुख वाडीत आम्हाला भाड्याची खोली मिळाली आणि मग एका चांगल्या शुभमुहूर्तावर आम्ही ठाणे सोडले व सिंहपुरात आलो.

आमच्या चाळीच्या बाजूला सावंतांचा खूप मोठा वाडा होता. श्री.रावसाहेब सावंत खूप मोठे जमीनदार होते. शेतीवाडी, दूध-दुभते यांची नुसती रेलचेल होती. संपूर्ण सिंहपुरात त्यांच्याकडून दूध जायचे. त्यांची पोल्ट्री होती. दूधाचा मोठा व्यवसाय होता. शिवाय शेतीपासून मिळणारे भाताचे पीक होते. भाजीपाल्याचा मळा होता. रावसाहेबांच्या पत्नीचे नावं भागीरथीबाई. जवळच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांना दूध त्याच द्यायच्या. आम्हालाही दूधाचा उकाडा लावायचा होता आणि म्हणून मी व आईने,सौ.भागीरथीबाई यांच्याकडे जाण्याचे ठरवले.



भागीरथीबाईंकडे गेल्यावर त्यांनी आमची आस्थेने विचारपूस केली व इथे नवीनच राहायला आल्याचे कळतात त्या म्हणतात "हे बघा बाई, तुम्ही काही संकोच वाटू घेऊ नका. तुम्ही आता आमच्या शेजारी आहात. जर तुम्हाला काही गरज लागली तर निःसंकोचपणे सांगत जा. आणि तुमचे नावं सांगाल का? कारण आम्ही महिन्याच्या शेवटी पैसे घेतो. आजपासून तुमचा दूधाचा उकडा सुरू झाला."

आई म्हणाली, "भागीरथी बाई, माझे नावं सुधा चंद्रकांत क्षीरसागर आणि ही माझी मुलगी कु. मोहिनी ही बारावीत शिकत आहे. मला हिला गणिताची शिकवणी लावायची आहे. पण वयात आलेल्या मुलीला एकटे बाहेर पाठवायला मन धजावत नाही हो. तुमच्या ओळखीचा कुणी टीचर असेल तर सांगा मला. मी दूधचा उकाडा लावण्यासाठी आले आणि माझी कामे सांगत बसले."

"अहो सुधाताई, तुम्ही आमच्या शेजारी आहात आणि शेजारधर्म पाळायलाच हवा. पण तुम्ही मोहिनीच्या शिकवणीची काही काळजी करू नका. अहो माझा

मुलगा नोकरी सांभाळून गणिताच्या शिकवण्या घेतो, तो घेईल की मोहिनीची शिकवणी. बाकी तुम्ही तुमच्या मुलीचे नावं खूपच छान ठेवले आहे हं! ती तुमच्या सारखीच दिसायला सुंदर तर आहेच आणि कुणावरही तिची मोहिनी पडेल असे तिला सौंदर्य लाभले आहे."

"भागीरथी बाई, मला सुधा बाई म्हणण्यापेक्षा मला तुम्ही फक्त सुधा म्हणूनच हाक मारा. मला आवडेल ते. एकतर तुम्ही मला माझ्या आईसारख्या आहात आणि आईने मुलीला नावाने हाक मारली तर जास्त चांगले व शोभूनही दिसेल नाही का?"



आमचे बोलणे चालूच असताना राजेश तेथे आला. त्याला पाहिल्यावर भागीरथी बाई म्हणाल्या, "अरे राजेश, तुझ्या विषचीच मघाशी आमचे बोलणे झाले. तू गणिताच्या ट्यूशन्स घेतोस ना, मग मोहिनीला पण त्यांच्या घरी जाऊन गणित शिकवशील का?"

राजेश उतावीळपणे म्हणाला "आई, मी एका पायावर तयार आहे. परंतु माझी एक अट आहे."

"कुठली रे अट?" भागीरथी बाई म्हणाल्या.

"आई, मी मोहिनीकडून शिकवणीचे पैसे घेणार नाही."

"हो, हो, हे मात्र खरं आहे. राजेशला माझं पूर्णपणे अनुमोदन आहे. कारण सुधा, तू मला आईच्या ठिकाणी पाहतेस ना. मग मोहिनी माझी मुलगी नाही का? आणि मुली कडून कोण पैसे घेईल का?"

"आई, पण माझी दुसरी एक मागणी आहे. पण ही अट नव्हे." "कुठली रे?" राजेशच्या आईने त्याला विचारले.

"आई, मोहिनीच्या परीक्षेचा निकाल लागल्यावर मी ती तिला सांगेन. त्याची चर्चा आता नको." राजेश व त्याच्या आईने आम्हा दोघी मायलेकींना बोलूनच दिले नाही व परस्पर निर्णय घेऊन टाकला. परीक्षा पास झाल्यावर राजेश माझ्याकडे काय मागणार आहे या विषयी मला अंदाज बांधता आला नाही. मी तो विचार सोडून दिला. पण मला ते जाणून घेण्याची उत्सुकता मात्र लागून राहिली.

राजेश, माझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठा होता. त्यावेळी माझे वय १८ वर्षं होते तर राजेशचे २३ वर्षं. सिंहपूर येथील सरकारी कार्यालयात तो लिपिक म्हणून काम करत होता. ग्रॅज्युएट झाल्याबरोबर त्याला लगेचच नोकरी लागली होती. वास्तविक त्याला वकील व्हायचे होते. परंतु सिंहपुरात लॉ कॉलेज नसल्याने त्यानी तो निर्णय बदलला. दुसरे असे की, त्याला नोकरी करून

गावातल्या गावत त्यांचा असलेला दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेती या साऱ्यांकडे पाहण्यासाठी वेळ देता येणार नाही. राजेशला नोकरीची अजिबात गरज नव्हती. पण स्व-कर्तृत्त्वावर दोन पैसे कमवावेत अशी त्याची प्रामाणिक इच्छा होती. बापजाद्यांच्या इस्टेटीवर मजा करावी, ऐश करावी अशी त्याची मनोवृत्ती नव्हती. हे मला कळल्यावर त्याच्याविषयी मला आदर वाटू लागला.

राजेश, दररोज मला न चुकता गणित शिकवायला यायचा. तो मला आमच्या घरच्या लोकांसारखाच, 'बेबी' म्हणून हाक मारायचा.

गणिते शिकवताना कधी-कधी माझ्या अंगाला त्याचा स्पर्श व्हायचा त्यावेळी अंगातून गोड शिरशिरी उठायची. माझे रक्त सळसळायचे. कानशिले गरम व्हायची व छातीत धडधड सुरू व्हायची. पण मी स्वतःला सावरायचे कारण शिकवणीच्या वेळी तो माझा गुरू असायचा, तर मी त्याची शिष्या. मी मनातल्या मनात देवाला प्रार्थना करायची की, देवा! मला सावर, वयात आलेल्या मुला-मुलींच्या बाबतीत तारूण्य सुलभ भावना या मनात येणारच. त्याला आवर किती घालणार ? आईच्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणून मी स्वतःला जपत होते. माझ्याकडून कधीच मर्यादेचे उल्लंघन होऊ नये म्हणून मी देवाला साकडे घालायची. अभ्यासावर लक्ष केंद्रित करायची.



एक गोष्ट मात्र खरी होती, ती म्हणजे कळत-नकळत मी राजेशकडे ओढली जात होती. राजेश सुसंस्कृत होता, हुशार होता. विनयशील होता. थोरा-मोठ्यांचा मान राखणे दुसऱ्यांशी बोलतांना आदबीने बोलणे व शेजाऱ्या-पाजाऱ्यांना मदत करणे हे त्याचे गुण मला खूप आवडायचे. त्याला पिढीजात श्रीमंतीची मस्ती नव्हती, माज नव्हता. स्व-कर्तृत्त्वावर त्याचा विश्वास होता. माझ्या विषयी त्याच्या मनात काय भावना आहेत याची कल्पना मला नव्हती. पण एक दिवस तसा प्रसंग आला. त्याचे असे झाले की, आमच्याकडे पाच दिवसांचा गणपती भाद्रपद महिन्यात आला, या पाच दिवसांत आमच्याकडे भरपूर कार्यक्रम असत. रात्रीचे जागरण असायचे, तसेच स्त्रियांकरता नाच-गाणी, झिम्मा व फुगडी असे कार्यक्रम असत. मुलांकरता गाण्याच्या भेंड्या, सामुदायिक पत्ते खेळण्याचा कार्यक्रम, कॅरम, बुद्धिबळ वगैरे खेळ असत. या सर्व कार्यक्रमात राजेश मनापासून भाग घ्यायचा. राजेश, माझा पार्ट टाईम मास्तर आहे हे आमच्या नातेवाईकांना व मित्रमंडळींना चांगले माहीत होते. तसेच सावंत

कुटुंबाचा व क्षीरसागर कुटुंबाचा चांगला घरोबा आहे, हेही ठाऊक होते. त्यामुळे राजेशचे येणे-जाणे कुणाला खटकणारे नव्हते. राजेश आणि मी आरत्या म्हणणाऱ्यांमध्ये प्रमुख असायचो. या पाच दिवसात आमची जवळीक खूप वाढली. राजेशच्या घरचा गणपती कोकणातल्या घरी यायचा. पण राजेशने मला गणपती येण्याच्या चार-पाच दिवस अगोदरच सांगितले की, तो कोकणात यंदा जाणार नाही. कारण गेल्यावर्षी तो जाऊन आल्यामुळे यंदा दुसरे भाऊ जाणार आहेत. राजेशचे वडील पक्षा घाताने आजारी पडल्यापासून भागीरथी बाईंनी कोकणात जायचे सोडून दिले होते व आईला सोबत म्हणून राजेशही जाणार नव्हता.



गणेश चतुर्थीला दुसऱ्या दिवशी मी व राजेश गणपती समोर बसून बुद्धिबळ खेळत होतो. रात्री १ ची वेळ होती. आम्ही दोघेच जागे होतो. आम्ही देवाच्या मखरात बसून खेळत होतो. काहीजण मखरा बाहेर होते. अचानक राजेशने मला जवळ ओढली व माझ्या ओठावर ओठ टेकवून म्हणाला, ''बेबी! आय लव्ह यू!'' राजेश, असा काही करेल हे मला अपेक्षित नव्हतं. मी गांगरून गेले. गोंधळून गेले. काय बोलावे ते मला सूचेना. बुद्धिबळाचा पट उधळला गेला होता. मी कशीबशी त्याच्या तावडीतून सुटका करून घेतली व त्याला म्हणाले, ''राजेश, हे तू काय कारतोस. आपण देवासमोर आहोत याचातरी विचार कर. मृगजळाच्या मागे धावू नकोस. स्वतःला सावर.'' मला सोडून राजेश म्हणाला, ''सॉरी! मी स्वतःवर ताबा ठेवायला हवा होता. पण मला तुझ्यावरचे प्रेम व्यक्त करायचे होते. आज देवासमोरच माझ्या प्रेमाची कबूली मला द्यावीशी वाटली.''

राजेशने देवाला हात जोडले व म्हणाला, ''देवा, मला माफ कर पण आमची जोडी फोडू नकोस, माझे खूप प्रेम आहे बेबीवर.'' राजेशने असे बोलून देवासमोरचा एक पेढा उचलला व अर्धा दातानी तोडून स्वतः खाल्ला व अर्धा उष्टा पेढा बेबीच्या तोंडात भरवला. मी तो उष्टा पेढा बिनतक्रार करता खाल्ला व राजेशला म्हणाले, ''राजेश तू मला आवडतोस. माझे तुझ्यावर प्रेमही आहे. पण तू मराठा आणि मी सोनार. जात ही आपल्या मार्गातील खूप मोठा अडथळा आहे. माझे वडील सुवर्णकार संघाचे अध्यक्ष आहेत आणि ते कधीही आपल्या लग्नाला परवानगी देणार नाहीत.'' आमचे हे बोलणे कुणीही ऐकत नव्हते व सर्वजण ओटीवर झोपली होती.

बायका स्वयंपाक घरात झोपल्या होत्या. आमचे हे बोलणे हळू आवाजात चालू होते. राजेशने भावनेच्या भरात जे काही केले ते मला तिरकेसे आवडले नाही आणि म्हणून मी राजेशला म्हणाले, "राजेश, जरा संयमाने वागत जा. आपण देवासमोर आहोत याचे तरी तू भान ठेवायला हवे होते. जर कुणी जागे झाले असते तर......" माझे वाक्य अर्धवट तोडून राजेश म्हणाला, "मी काय करू ? तुझ्या शिवाय जगण्याची मी कल्पनाच करू शकत नाही."

"राजेश, तू मराठा आणि मी सोनार. मग मला सांग, आपले लग्न कसे होणार ? कारण माझ्या वडिलांना जातीचा खूप अभियान आहे, हे झाले एक कारण. दुसरे असे की, माझी आई तुला माझ्या भावाच्या जागी पहाते. हे तिच्या तोंडूनच मला कळले. माझी अवस्था 'इकडे आड -तिकडे विहीर' सारखी झाली आहे. कळलं! राजेश तुझ्याकरता मी मृगजळ आहे. मृगजळाच्या मागे धावू नकोस."

गणपती विसर्जनानंतर माझी आई व मी सौ. भागीरथी बाईंना प्रसाद द्यायला त्यांच्या घरी गेलो. राजेशही तिथे हजर होताच. भागीरथी बाई आईला म्हणाल्या, "सुधा, अग देवाकडे काही मागितलंस की नाही ?" आई म्हणाली, "नाही हो! देवाने सर्व काही भरपूर दिले आहे. आता बेबीचं शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढचे पुढे. पण तुमचा राजेश मात्र खूपच चांगलं शिकवतो.आता बघू या, परीक्षेत काय होणार आहे ते."

राजेशने मध्येच संभाषणात भाग घेऊन म्हटले, "सुधा काकू, गणित खूपच सोपा विषय आहे. गणितात स्टेप्स् म्हणजे पायऱ्या महत्त्वाच्या. स्टेप्स् चुकल्या तर गणित चुकते. दुसरे म्हणजे गणितात आपले उत्तर चूक की बरोबर ते लगेच समजते. तुमची बेबी तर काय हुशार मुलगी आहे. फक्त दररोज न चुकता तिने गणिते सोडवायला हवीत."

माझी आई म्हणाली, "राजेश, गणितातच काय, माणसाच्या आयुष्यातपण पायरी चुकवून चालत नाही. प्रत्येकाने आपली पायरी पाहून वागायचे असते. पायरी चुकली तर वरून खाली यायला जसा वेळ लागत नाही तसेच खालून वर जातानाही दोन पायऱ्या



एकदम ओलांडायचा जर प्रयत्न केला तर तोही अंगलट आल्याशिवाय राहत नाही. तेंव्हा माणसाने पायरी पायरीने आपले ध्येय गाठावे. जे गणितात तेच माणसाच्या आयुष्यात. स्टेप बाय स्टेप गेले तर उत्तर बरोबर येणारच. असो, मी तुलाच लेक्चर देत बसली. पण तुम्ही तरूण मुले काही वेळा चुका करून बसतात म्हणून सांगितले हं!" "सुधा ताई, तुम्ही अगदी बरोबर बोलतात. राजेशला मी नेहमीच सांगत असते." भागीरथी बाईंनी आईच्या म्हणण्याला पुष्टी

दिली. मला मात्र उगीचच वाटले की, आईला आमच्या वाढत्या सलगी बद्दल व जवळीकी बद्दल अप्रत्यक्ष सुचित तर करायचे नसेल ना. मी तो विचार झटकला व आईबरोबर घरी आले.

मे महिना आला. मला सायकल चालवायला वेळ मुहूर्त मिळाला. राजेश मला सायकल चालवायला शिकवणार होता. मी त्याकरता आईकडून परवानगी मिळविली होती. तिनेही ती आनंदाने दिली. माझ्या आईला नेहमी वाटायचे की, माझ्या मुलीला पोहणे, वाहन चालवणे,चित्र काढणे हे सारे सारे यायला हवे.

एके दिवशी मी भाड्याने सायकल आणली व राजेशला म्हणाली,"ए राजेश, चल मला सायकल चालवायला शिकव." राजेश आनंदाने तयार झाला. सायकल चालवताना कित्येकदा मी त्याच्या अंगावर पडले. त्याचा स्पर्श मला व्हायचा तेंव्हा अंगावर रोमांच उभे रहायचे. मी स्वतःला हरवून बसायचे. त्याचा श्वास माझ्या श्वासात मिसळून जायचा. कधी आनंदाने मन भरून जायचे तर कधी अनामिक भीतीने थरकाप उडायचा. एकाच वेळी संमिश्र भावनांचा अनुभव येत होता. मला कळेना यालाच तर प्रेम म्हणत नाही ना! आणि ते जर प्रेम असेल तर मी राजेशच्या प्रेमात पडले होते एवढे नक्की!




मे महिन्यामध्ये सिंहपूरला विविध स्पर्धा होत. मी माझ्या आवडीच्या ड्राईंग कॉम्पीटिशन मध्ये भाग घेतला होता. स्पर्धा दोन दिवसावर आली होती आणि म्हणून मी वेगवेगळी चित्रे काढण्याची प्रॅक्टीस करत बसले होते. आईला माझ्यासाठी कपडे आणायला बाजारात जायचे होते, पण मीच बाजारात जाणार नव्हते आणि म्हणून मी आईला सांगितले की, "आई, तू भागीरथी काकूंना घेऊन बाजारात लवकर जा. तू आणलेले कुठलेही कपडे चांगलेच असतील याची मला खात्री आहे आणि तुझा, माझा चॉईसही सारखाच आहे." आई हसून म्हणाली,"मोहिनी एखाद्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवायची कला कुठे शिकलीस ग? बरं बाई मी भागीरथी बाईंना घेऊन जाते व राजेशला आपल्याघरी बसायला सांगते. कारण घरात तू एकटीच आहेस ना."

"कशाला! अग आई, मी आता लहान का आहे? कुणी मला खाणार नाही की पळवून नेणार नाही. तू नको काळजी करू."

"अग बाई, मुलगी उपवर झाली की, आई-बाबांना काळजी वाटणारच. तुला नाही कळणार ते." आई निघून गेल्यावर राजेश आमच्या घरी आला. मी राजेशला म्हणाले, "राजेश, बरं झालं तू आलास. मला तुझे पण चित्र काढायचे आहे. आता परीक्षापण

संपली आहे. मलापण वेळ आहे. तू माझ्यासमोर स्टूलावर बस. मी तुझे पेन्सीलीने चित्र काढणार आहे.''

''जशी आपली आज्ञा'' असे म्हणून एकाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे राजेश स्टुलावर बसला. राजेशचे मी हुबेहूब चित्र काढले. त्याला ते खूप आवडले. आश्र्चर्याने तो माझ्या तोंडाकडे पाहतच राहिला.



''असे पाहतोस काय माझ्याकडे ? हे चित्र माझ्यातर्फे तुला सप्रेम भेट. यापुढे आपली भेट होईल ना होईल म्हणून आजच मी हे चित्र काढले. राजेश, उद्या मला पहायला मुलाकडची माणसे येणार आहेत. मला देखील हे आजच कळले. आता आई भागीरथी काकूंबरोबर बाजारात गेली आहे ना ती मला साड्या आणण्यासाठी.''

अरे, मी तिला विचारले, ''घरात एवढे कपडे असताना नवीन कपडे कशाला आणतेस ?'' तेंव्हा ती मला म्हणाली, ''अग तुझ्या वडीलांनी तुझ्याकरता स्थळ आणले आहे आणि मला निक्षून सांगितले की, मोहिनीला ड्रेस घालायला सांगू नकोस, तर साडी नेसायला सांग.'' राजेश आमच्या वडिलांसमोर बोलायची आमची कुणाचीच हिंमत नसते. उद्या सकाळी माझे आर्ट गॅलरीमध्ये चित्रकलेचे प्रदर्शन आहे तर संध्याकाळी मला पहायला येणाऱ्या पाहुण्यांसमोर माझे शरीर प्रदर्शन. एक जीवंत चित्र म्हणून उभे रहावे लागणार आहे.सांग मी काय करू ? माझ्या डोळ्यांतून अश्रू बाहेर पडले.

माझ्या डोळ्यांतील अश्रू पाहून राजेश जागेवरून उठला व त्याने मला बाहुपाशात बद्ध केले. माझ्या ओठावर ओठ टेकवून तो म्हणाला, ''बेबी, आय लव्ह यू व्हेरीमच ! तू मला सोडून जाऊ नको. मी या अगोदरच एक बेबी नावाच्या मुलीला कारण नसतांना मुकलो आहे. त्यावेळी निदान मी अज्ञान तरी होतो. पण आता सज्ञान असूनही, नोकरीला असूनही व मुख्य म्हणजे तुझ्यावर प्रेम असूनही जर तू मला मिळणार नसशील तर मी कोलमडून जाईन ग. माझा प्रेमावरचा विश्र्वासच उडेल.''

त्याच्या मिठीतून सुटण्याची धडपड करता मी म्हणाले, ''राजेश, मृगजळाच्या मागे लागू नको. त्यात तुझे नुकसान आहे. तू मला विसरून जा. दुसरी एखादी चांगली मुलगी पाहून लग्न कर. सुखी हो. माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि या पुढेही राहील. पण मी तुझ्याशी लग्न नाही करू शकणार !''

''पण का ?'' राजेशने विचारले.

''कारण ऐकायचे आहे तर ऐक. माझे बाबा सनातनी

आहेत. जुन्या विचारसरणीचे व रूढी प्रिय आहेत. सुवर्णकार संस्थेचे अध्यक्ष आहेत. समाजात त्यांच्या शब्दाला किंमत आहे, त्यांना मान आहे.

मागच्या आठवड्यात जिल्हा स्तरावर झालेल्या समाजाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात अध्यक्ष पदावरून केलेल्या भाषणात त्यांनी समाजबांधवांना असा उपदेश केला की, समाजातील तरुण-तरुणींनी आपल्याच समाजातील मुला-मुलींशी लग्ने करावीत. कारण आपला समाज कर्तृत्ववान आहे. आपल्या समाजात हुशार व गुणवान मुलांची कमतरता नाही. तेंव्हा अशा सद्‌गुणी व सुंदर मुलांना डावलून दुसऱ्या जातीतील मुलांशी लग्न करणे हा सोनार समाजातील मुलांचा अपमान नाही का ? तेंव्हा पालकांनो आपल्या मुलींना असे करण्यापासून परावृत्त करा. तसेच आपल्या समाजातील मुलाशीच त्या लग्न करतील याची काळजी घ्या. तसे वातावरण तयार करा व त्यांची खात्री पटवा,''

त्यांच्या या भाषणातून समान बांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोकांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. आमच्या समाजातील तरुण मुलांचे ते गळ्यातले ताईत बनले आहेत. सर्व तरुण वर्ग त्यांच्यावर जाम खूश आहे. त्यांच्या भाषणानंतर संमेलनाला बोलाविलेल्या स्थानिक वृत्तपत्रांच्या वार्ताहरांपैकी एकाने त्यांना प्रश्न केला, "मि. क्षीरसागर, माफ करा मी हा प्रश्न विचारतो म्हणून. पण उद्या जर तुमच्या मुलीने परजातीच्या मुलाशी प्रेम विवाह केला तर तुम्ही काय कराल?" त्यावर ते ताडकन म्हणाले, "मि. वार्ताहर, एकतर माझी मुलगी असे काही करणार नाही. तिच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आपल्या कृत्याने आपल्या वडिलांचे समाजात नाक कापले जाईल, त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असे कृत्य तिच्याकडून घडणे कधीच शक्य नाही आणि जर तसे तिने चुकून का होईना केलेच तर दुसऱ्या दिवशी मी या जगात नसेन, कळलं" बिचारा वार्ताहर त्यांच्या उत्तराने अवाक्



झाला व गुपचूप निघून गेला. कुठून हा प्रश्न विचारला असे त्याला झाले.

"राजेश माझे वडील बोलल्याप्रमाणे वागत असतात. 'आत एक- बाहेर एक' असा त्यांचा स्वभाव नाही. आम्हा सर्वांना ते ठाऊक आहे आणि म्हणून मी तुला नेहमी सांगत असते की, मृगजळाच्या मागे धावू नकोस. आता तूच सांग, मी वडिलांची इच्छा डावलून जर तुझ्याशी लग्न केले तर त्यांचे किती गंभीर परिणाम होतील.जी व्यक्ती समाजबांधवांच्या स्नेहसंमेलनात छातीठोकपणे आपल्या मुलीच्या वागणूकीबद्दल एवढा निर्वाळा देते त्यांची मुलगी वडिलांच्या इच्छेविरुद्ध जाऊन परजातीतल्या मुलाशी

लग्न करणे शक्य आहे का? मी माझ्या वडिलांना कशी तोंडघशी पाडू शकते? याचा जरा विचार करा!"

मी राजेशला वस्तुस्थितीची जाणीव करून दिली. राजेश काहीही प्रतिक्रिया व्यक्त न करता निघून गेला. मी बारावीची परीक्षा फर्स्टक्लास मध्ये पास झाली. गणितात मला विशेष प्रावीण्य मिळाले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. निःसंशयपणे माझ्या यशाचे श्रेय राजेशकडे जाते. पण राजेशला आता मी ऊठसूट भेटू शकत नव्हते. कारण मला पहायला आलेल्या वराकडच्या लोकांनी मला पसंत केले होते. थोड्याच दिवसांनी माझा साखरपुडा होणार होता. त्या लोकांनी कुठलीही मागणी केली नाही. उलट मुलीला पुढचे शिक्षण घ्यायला आमची काहीच हरकत नाही असेही सांगितले.

मला स्वतःला राजेशला घरी जाऊन भेटायचे होते. त्याला काय वाटले असेल याची कल्पना मला होती. राजेश हल्ली मला टाळत होता. साखरपुडा होण्याअगोदर जाऊन भेटणे गरजेचे होते. एक दिवस मी आई व भागीरथी बाई बाजारात गेल्याचे पाहून राजेशच्या घरी गेले. सुदैवाने राजेश घरीच होता. वडिलांच्या खोलीत त्यांच्या पायाशी बसला होता. मला पाहिल्यावर तो बाहेर आला. आम्ही दोघे राजेशच्या बेडरूम मध्ये गेलो. माझ्या डोळ्यांत पाणी आले. मी राजेशला म्हणाले, "राजेश, मी तुझा निरोप घ्यायला आले आहे. आता लवकरच माझा साखरपुडा होणार आहे. यापुढे मला तुला भेटता येणार नाही. तुला मी नेहमी सांगायची की, तू मृगजळाच्या मागे लागू नकोस. पण तू माझे ऐकले नाहीस." राजेशने मला आवेगाने जवळ ओढली व म्हणाला, "बेबी,मी तुला कधीच विसरू शकणार नाही."

मी त्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पुसले व म्हणाले "राजेश मला सुरूवाती पासूनच माहीत होते की, माझे वडील दुसऱ्या कुठल्याही जातीच्या मुलाशी माझे लग्न लावून देणार नाहीत. कारण काही गोष्टी त्यांच्या प्रतिष्ठेच्या बनल्या आहेत. म्हणूनच मी तुला, मृगजळाच्या मागे लागू नको अर्थात माझ्या प्रेमात पडू नको, प्रेम करू नको असे सांगत होते. पण आज तुझ्या आयुष्यातून कायमची निघून जाताना मी तुला देवाशपथ खरं सांगते की, माझे फक्त आणि फक्त तुझ्यावरच प्रेम होते आणि ते मी दुसऱ्याची झाली तरी कायम राहिल." मी राजेशला भेटून निघून जात असताना राजेशने माझ्या हातात एक कागद दिला व मला म्हणाला, "बेबी, हा कागद घरी गेल्यावर वाच. तू मला वेळोवेळी मृगजळाच्या मागे धावू नकोस म्हणून सांगत असताना मी तुझे ऐकले नाही. पण आज मला कळते की, तू १०० टक्के बरोबर होतीस. पण मृगजळाच्या मागे धावण्यात माझीच चूक झाली." मी घरी गेल्यावर कागद उलगडला व राजेशनी लिहिलेली कविता वाचायला सुरुवात केली.

"चूक"

मृगजळाच्या मागे धावण्यात
खरंच माझी चूक झाली
तुझ्या आणि माझ्या प्रेमात
त्याची मला प्रचिती आली
जाती-पातीच्या बंधनात
'प्रीत' आपली सापडली
समाजाच्या नियमात
'प्रीत' आपुली अडकली
प्रेम तुझ्यावर करताना

ही गोष्ट नाही कळली
मृगजळाच्या मागे धावताना
खरं माझी चूक झाली
तुझ्या काळ्याभोर डोळ्यांत
किती होती स्वप्ने पाहिली
तुझ्या हदयाच्या स्पंदनात
माझ्या हदयाची धडधड ऐकली
फक्त एकच गोष्ट आपल्या प्रेमात
खरोखरच बाधक ठरली
मृगजळाच्या मागे धावण्यात
खरंच माझी चूक झाली

**—— राजेश**


राजेशची कविता वाचून माझ्या डोळ्यांत पाणी आले.

जर प्रेमाची परिमिती दु:खातच होणार होती, तर नियतीने माझ्या आयुष्यात राजेशला का पाठवले होते ? या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही.

## विनोद



पूर्वी मी खूप कष्टाळू होते.
..
..
आता कष्ट टाळू झाले....



## चारोळ्या

*मन गहीवरले अन् शब्द जरी*
*अन् दाटल्या त्या भावना*
*नभातील पावसानेच*
*समजवावे नभांना*

*त्या अंतर्मनाला सांग सखे*
*त्या आठवणींना सजव मनी*
*ओलांडून माप स्वर्गसुखाचे*
*कृष्णमय हो मनोमनी*

*चंद्र तारेच शृंगार आहेत*
*कवितेच्या कविच्या*
*चंद्रकोर जशी खुलूनी दिसे*
*भाळी पतीव्रतेच्या*

*का संवादच अपेक्षित*
*अबोलाही छान वाटतो*
*डोळ्यांतून बोलताना मग*
*भावनांचा पाऊस पडतो...*

**- निशा खरात**

# काव्यसृष्टी

## दशभुजाधारी आदिशक्ती



स्त्री शक्ती बात मोठी, गोष्ट नाही हो खोटी
खोटी मनुस्मृती, संसाररथाचं वंगण बाई,
बाईमुळे होतो जीवनप्रवास सुखकर खरा
खरा अवघड घाट लीलया पार करते आई //१//

आई कल्पतरू, गुरू, परिचारिका, भार्या होई
होई ती दशभुजाधारी आदिशक्ती, माया,
माया तिची भोळी, किती वर्णावा महिमा
महिमा जगत्जननीचा, ती सृष्टी परछाया //२//

परछाया देवीस्वरूपी, ईश्वरीय कलाकृती
कृती महनीय, पुरवी संस्कारांची शिदोरी,
शिदोरी चूलमूल सांभाळून अंतरिक्षी झेप
झेप उंच नभी तरी हाती पाळण्याची दोरी //३//

दोरी घट्ट नात्यांची, निभावते स्वयंसिद्धा नारी
नारी या नवयुगाची, उठवी कर्तृत्वाचा ठसा,
ठसा राष्ट्रपती 'प्रतिभा', घेई हरक्षेत्री आघाडी
आघाडी घेऊनही चालवी परंपरेचा स्त्री वसा //४//

वसा लक्ष्मी, जिजा, सावू सिंधू अन् आनंदीचा
आनंदाची असे पर्वणी, ती संस्कृतीचं खरं बेणं,
बेणं राखीच्या पवित्र रज्जूचं, हवी प्रेमळ बहीण
बहिणाबाई ही जपे जीवापाड सौभाग्याचं लेणं //५//

**- सरोज सुरेश गाजरे**

# जन्मास कारण की ...!

देवास तरी असेल का
ठाऊक कारण याचे
सुटले असेल का कोडे
त्याला तरी जन्माचे


एकटेपणा वाटला असावा
त्यालाही जन्मास येऊन
सोबतीला म्हणोनी मनुष्यास
पाहिले जन्मास घालून!

त्याला कुठे होते ठाऊक
कोणाशी सोबत केली?
माणसं म्हणता म्हणता
कधी जनावरं झाली!

आता पडला असेल
त्यालाही प्रश्न खरा
कसा थांबवावा हा
जन्म -मृत्यू चा फेरा?

पण आता कुठे राहिला
मनुष्यही त्याच्या हाती?
मानव निर्मिला त्याने
मानवाने निर्मिल्या जाती!

अन् घेतले वाटुनी देवांना
धर्माची नावे देऊन
देवही धन्य जाहले
घराघरात जन्म घेऊन!



-अर्चना गोरे...

# सखी...

होईल तुझ्यावर
शुभेच्छांचा, कौतुकाचा नि प्रेमाचा वर्षाव
पण तू मात्र त्याने हुरळून जाऊ नकोस...
जो तो काढेल सेल्फी तुझ्याबरोबर
आणि ठेवेल स्टेट्सवर

आदिशक्तीचा सन्मान केल्याचा पुरावाच तो जणू...
आज ठेवतील तुला पुजून देव्हाऱ्यात
पण उद्यापासून, सुरू होईल तीच जगरहाटी
न थांबणारी, संपणारी...

पण तुला काय हवयं हे विचारलंय का कोणी ?
केलाय तुझ्या मनाचा विचार ?
एक दिवस कौतुक करायचं
आणि झेलायची अवहेलना तिने वर्षभर ?

जागोजागी सहन करायचं वासनेच्या पुतळ्यांना ?
पूजा करायची तिची खेटराने ?
त्याच्यापेक्षा नको हो तुमचे हे
कौतुक, सत्कार समारंभ सोहळे
ह्यापेक्षा ठेवा मनात तुमच्या
किंचितसा आदर
दाखवा जाण तिच्या गुणांची, कर्तृत्वाची
तेवढे देखील पुरे आहे आम्हाला !

सीता, द्रौपदी नि कुंतीचे दाखले
पुरे झाले आता
नका दाखवू तेच तेच पुन्हा पुन्हा...

आता गरज आहे सखी तुला
दुर्गा,चंडिका नि काली बनण्याची
अन्यायाने पेटून उठण्याची
हातात शस्त्र घेऊन
स्वतःचे रक्षण करण्याची...

**-कविता झुंजारराव**



# स्वरांगिनी

की आज मला पुन्हा
सजायचं आहे,

माझं मला नव्याने रूप
पहायचं आहे,

जबाबदाऱ्या, परंपरांच्या
ओझ्यातून मोकळा श्वास घ्यायचा आहे,



पुन्हा एकदा स्वतःच्या प्रेमात
मला पडायचं आहे,

रंग, रूप, सुंदरतेची कुबडे
फेकून मनाचे सौंदर्य जपायचं आहे,

स्वतःच्या प्रतिबिंबाच्या प्रेमात पडून
सोनचाफा केसात माळायचा आहे,

विखुरलेल्या स्वप्नांना पुन्हा
नव्याने जोडायचे आहे,

माझी मी स्वरांगिनी बनून
धुंदी यशाची जगायची आहे,

की आज मला पुन्हा
सजायचं आहे.

**-शितल चेंदवणकर**

# बंध..

जुईबाई जुईबाई
तुझे कोणते ग बंध..
फांदी फांदी गुंडाळतेस
तुझा वेडावतो गंध..

‘नको नको’ म्हणताना
गुंततो मी पुन्हा पुन्हा..
कैदेत मी सोनचाफा
काय केला मी गुन्हा ?

तुझ्या वेलीचं सपान
माझी फांदी ग हिरवी..
सोनंपिवळ्या चाफ्यास
साद मखमली झुलवी..



गेली गेली म्हणताना
आभाळाला भिडलीस..
‘तुझा सुखाचा आधार’
मागे वळून म्हणालीस..


होऊन अंगोपांगी पिवळी
चांदराती भिनलीस..
जर्द पिवळ्या प्रपंची
जीवघेणी रमलीस..

– **सीमा ह.पाटील**

# पाककृती

## मोरधनाचे धिरडे

**मोरधनाच धिरडे मोरधन बहुतेक उपवासाची पाककृती म्हणून वापरली जाते, म्हणजे हा एक प्रकारचा तांदूळ आहे, ज्याला समा तांदूळ, भगर आणि इंग्रजीमध्ये बार्नयार्ड मिलेट इत्यादी नावांनी ओळखले जाते. उपवासाच्या दिवसात त्याचे सेवन करणे खूप महत्वाचे आहे, कारण ग्लूटेन मुक्त धान्य असण्यासोबतच त्यात व्हिटॅमिन ए, सी, ई, कार्बोहायड्रेट्स, मॅग्नेशियम आणि प्रथिने असल्यामुळे ते पचनासाठी उपयुक्त मानले जाते. त्यापासून खिचडी, इडली, खीर, उपमा, ढोकळा, डोसा इत्यादी अनेक प्रकारचे पदार्थ बनवले जातात, उपवासाच्या दिवसात ते खाल्ले जातात. मोरधनाचे धिरडे बनवण्याची रेसिपी जाणून घ्या.**



**साहित्य –**१ वाटी मोरधन, १ वाटी उकडलेले मॅश केलेले बटाटे, १ वाटी बारीक चिरलेला टोमॅटो, १/२ वाटी बारीक चिरलेली काकडी, १/२ टीस्पून तिखट, १/२ टीस्पून चाट मसाला, १ टीस्पून भिजवलेले मनुके, थोडी चिरलेली कोथिंबीर, चवीनुसार सैंधव मीठ.

**कृती:** सर्व प्रथम मोरधन स्वच्छ करून तासभर आधी पाण्यात भिजवावे.

त्यात भिजवलेले मनुके, उकडलेले बटाटे, मीठ, तिखट घाला.

पाण्याच्या मदतीने मिक्सरमध्ये मऊ वाटून घ्या.

आता घोळ तयार करा. नंतर गरम तव्यावर तेल लावून धिरडे कुरकुरीत होईपर्यंत शिजवा.

तयार धिरड्यांवर बारीक चिरलेली काकडी आणि हिरवी कोथिंबीर पसरवा आणि गरम धिरडे घडी करून सर्व्ह करा.

शुभ दिपावली

# मटन खिमा

**साहित्य:** अर्धा किलो मटन खिमा, एक इंच आलं, दोन हिरव्या मिरच्या, दहा ते बारा लसूण पाकळ्या, अर्धी वाटी कोथिंबीर, दीड चमचा सोनारी मसाला, हळद, हिंग, मीठ, पाच ते सहा टी-स्पून तेल, खडा मसाला, दोन कांदे.



**कृती:** प्रथम खिमा स्वच्छ धुऊन घेणे. आलं, लसूण, मिरची, कोथिंबीर सर्व बारीक वाटून घेणे (हिरवा मसाला) सोनारी मसाला, हळद कच्चे तेल घेऊन चांगले चोळून घेणे. अर्धा तास मुरण्यास ठेवणे. कांदा बारीक चिरून घेणे. गॅसवर कुकर ठेवणे त्यात तेल घालणे. तेल गरम झाल्यावर त्यात सर्व खडे मसाले व हिंग घालणे. बारीक चिरलेला कांदा घालून तो सोनेरी करून घेणे कांदा सोनेरी झाल्यावर त्यात खिमा घालणे. चांगले परतून घेणे. चार ते पाच कप पाणी घालून चार ते पाच शिट्ट्या काढणे. खिमा चांगला शिजला का ते बघणे व पूर्ण पाणी आटवणे. पूर्ण सुखा करणे. पाणी आटल्यावर मीठ घालणे. कोथिंबीर घालून पावासोबत किंवा भाकरी सोबत खाण्यास तयार.

# मटन वजरी

**साहित्य:** अर्धा किलो वजरी, अर्धा वाटी कोथिंबीर, दोन हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, दोन कांदे, दीड चमचा सोनारी मसाला, हळद, हिंग, पाच ते सहा टीस्पून तेल, खडे मसाले, दहा ते बारा लसूण पाकळ्या.

**कृती:** प्रथम वजरी धुऊन स्वच्छ करणे. एकदम बारीक कापून घेणे. जेवढी जमेल तेवढी बारीक कापणे. हिरवा मसाला, सोनारी मसाला, हळद, कच्चे तेल घालून चांगले चोळून घ्यावे. अर्धा तास मसाला मुरण्यास ठेवणे. तोपर्यंत कांदा बारीक चिरणे गॅसवर पातेले ठेवणे. त्यात तेल टाकणे. तेल गरम झाल्यावर खडा मसाला, हिंग, कांदा टाकणे. कांदा चांगला लालसर करणे. कांदा लालसर झाल्यावर त्यात वजरी टाकणे. पाच ते सहा कप पाणी टाकणे. सहा ते सात शिट्ट्या काढणे. शिट्या झाल्यावर वजरी शिजली का ते बघणे व पाणी पूर्ण आटवून घेणे तेल सुटेपर्यंत. चवीनुसार मीठ घालणे.

**टीप: वजरी शक्य तेवढी बारीक कापणे. यामुळे चांगली मिळून येते व लवकर शिजते.**

**- गौरी धबडे**

# जीरा मसाला सरबत



**साहित्य:** जिरे ४ ते ५ चमचे (पोहे खायचे चमचे ), १ चमचा बडीशोप, ७ / ८ काळी मिरी, पाव किलो खडीसाखर, चाट मसाला १ छोटा चमचा, २ लिंबू , थोडेसे काळे मीठ, १ चमचा सब्जा.

**कृती:** जिरे, बडीशोप , काळी मिरी एका कढईत घेऊन मंद आचेवर परतवून घ्यायची. खूप जास्त भाजू नये नाहीतर जिऱ्याचा कडवटपणा त्यात उतरतो. हे सर्व मंद आचेवर परतून झाले की मिक्सरमध्ये त्याची बारीक पूड करावी. एकीकडे गॅसवर कढईत खडीसाखर व पाणी घालावे. खडीसाखर भांड्यात घालून मोजून घ्यावी, जेवढी खडीसाखर तेवढेच पाणी घ्यावे. मग खडीसाखर पूर्ण विरघळली की त्या गरम पाण्यातच एका लिंबाचे साल किसून घालावे. साल किसणीने अगदी हलक्याहाताने किसून घ्यावे त्यामुळे लिंबाचा सुंदर असा स्वाद ह्या सरबतात उतरतो. खडीसाखर, पाणी, लिंबाचे साल हे सारे मिश्रण उकळू लागले की मग त्यात अर्धा चमचा काळे मीठ, थोडा चाट मसाला घालावा. हे गॅसवर उकळू द्यावे. हे मिश्रण चमच्यात घेऊन चिकटसर झाले की नाही ते पहावे. एकतारी पाक करू नये. बोटाला फक्त चिकट चिकट लागले पाहिजे. नंतर गॅस बंद करावा व थोड्या वेळाने त्यात साल काढलेले लिंबू व अजून एक लिंबू असे दोन लिंबू पिळावेत. सर्व मिश्रण गाळणीने गाळून घ्यावे. गार झाले की एका काचेच्याबरणीत भरावे. हे मसाला जीरा सरबताचे प्रिमिक्स तयार झाले. हे फ्रीजमध्ये महिना, दोन महिने सहज टिकते. आता सरबत करण्यापूर्वी सब्जा भिजत घालावा. एका ग्लास सरबतासाठी २ ते अडीच चमचे प्रिमिक्स घ्यावे. भिजलेला सब्जा, प्रिमिक्स व त्यात पाणी घातले की झाले सरबत तयार. वेळेवर पुदिना घरात असल्यास२/३ पुदिन्याची पाने चुरगळून यात घालू शकतात.


**सूचना– जिरे, बडीशोप, लवंग जास्त भाजू नयेत. खमंग वास येईपर्यंत परतून घ्यावे.**

**फायदा– उष्णतेचा त्रास कमी होतो, पचन सुधारते.**

**-वैशाली नेरकर**

## काकडी पुदिना सरबत

**साहित्य:** २ काकड्या, ५/७ पुदिन्याची पाने, पाऊण चमचा साखर, पाव चमचा काळे मीठ, १ लिंबू .



**कृती**: काकड्या स्वच्छ धुऊन शिलून घाव्यात म्हणजे काकडीची साले काढून घ्यावीत. नंतर काकडीचे छोटे छोटे तुकडे करून घ्यावेत. हे तुकडे मिक्सरच्या भांड्यात घालावेत. त्यातच ५/७ पुदिन्याची पाने, पाऊण चमचा साखर, पाव चमचा काळे मीठ घालून घ्यावे नंतर हे सर्व मिक्सर मधून फिरवून घ्यावे. त्यात साधारण दीड ग्लास पाणी घालून पुन्हा फिरवावे. आता तयार झालेले सरबत गाळून घ्यावे. त्यात १ लिंबाचा रस घालावा. छान ढवळून घ्यावे व लगेचच प्यायला घ्यावे. वरील साहित्यात साधारण दोन मोठे ग्लास सरबत तयार होते.

**फायदा – काकडी गुणाने थंड असल्यामुळे उन्हाळ्यात हे सरबत आरोग्यास लाभदायक. पुदिना घातल्यामुळे पचनास उत्तम.**

**सूचना – सरबत बनवण्यासाठी माठातील गार पाण्याचा उपयोग केल्यास उत्तम.**

**- वैशाली नेरकर**

## पीयूष

**साहित्य:** ४वाट्या ताजे ताक, ५चमचे पिठी साखर, एक वाटी विकतचे केशर श्रीखंड, चिमूटभर केशरकाड्या दुधात शिजवलेले, विलायची जायफळपुड एक चमचा,७/८पिस्ते बदाम बारीक केलेले घ्या.




**कृती:** ताक छान घुसळून घ्या.त्यात पिठी साखर घाला नंतर केशर श्रीखंड घालून पुन्ह घुसळा, मग दुधात भिजवलेले केशर व जायफळ विलायची पूड घाला पुन्हा घुसळून घ्या. फ्रिज मधे तासभर ठेवा. नंतर आवडीचा सुकामेवा टाका. छान चवदार पीयूष तयार.

**सूचना– यात बर्फ वापरू नका, पीयूष पातळ होते.**

**फायदा: छातीत जळजळ होत नाही, ॲसिडिटी होत नाही. झोप शांत लागते.**

**-वर्षा ब्रम्हपुरकर**

## आवळा सरबत



**साहित्य**: मिक्सर मधे फिरवून आवळ्याचा एक वाटी रस काढून घ्या, दोन वाट्या  साखरेचा पक्का पाक तयार करून घ्या, चमचा भर आद्रकाचा रस, एक चमचा सायट्रिकॲसिड घ्या, अर्धा चमचा काळे मीठ, चिमूटभर वेलची पूड. पिवळा रंग चिमूटभर. एक चमचा जिरेपूड घ्या. आवडीचे इसेन्स घ्या.

**कृती** : साखरेच्या थंड पाकात आवळ्याचा रस घाला. यात काळे मीठ, आले अर्क, वेलची पूड, जिरं पूड, रंग घालून ढवळून घ्या.  इसेन्स घाला. हे तयार सरबत एक ग्लास घेऊन त्यात तीन ग्लास पाणी घाला. छान सरबत तयार होईल.

**फायदा– हे सरबत प्यायल्याने  भूक लागते, अन्नपचन व्यवस्थित होते, ॲसिडिटी होत नाही.**

## द्राक्षाचे सरबत



**साहित्य:** एक वाटी साखरेचा पक्का तयार झालेला पाक घ्या, एक वाटी हिरव्या द्राक्षांचा रस, चिमूटभर काळमीठ,अर्धा चमचा सायट्रिक ॲसिड(लिंबूसत्व ), थोडासा हिरवा रंग .


**कृती:** प्रथम तयार केलेल्या पाकात द्राक्षाचा रस घाला मीठ, रंग, सायट्रिक ॲसिड घाला. चांगले ढवळा. यातील एक ग्लास सरबत घ्या त्यात २वाट्या पाणी घाला. तीन ग्लास सरबत तयार होईल.

**सूचना– रंग आवडत असेल तरच घाला. इसेन्स आवडीचे वापरू शकता.नुसत्या साखरे पेक्षा पाक वापरला तर सरबत जास्त टिकतं.**

**फायदा–शक्तीवर्धक, शरीराला थंडावा देणारं पेय आहे. मुलांना खूप आवडतं.**

**-वर्षा ब्रम्हपुरकर**

# बेलफळाचे सरबत



**साहित्य:** पिकलेल्या बेलफळाचा गर वाटीभर, साखर, काळेमीठ, लिंबूसत्व तीन वाट्या पाणी.

**कृती**: एका भांड्यात गर घेऊन त्यात तीन वाट्या पाणी घाला. हाताने चोळून घ्या. नंतर ते पाणी गाळून घ्या. त्यात लिंबूरस किंवा लिंबूसत्व टाका.साखर, काळेमीठ घाला. चांगले ढवळून घ्या.

**विशेष सूचना –हे सरबत चवीला थोडेसे तुरट लागते.**

**फायदा–शरीरातील उष्णता कमी करते. हे औषधी गुणाचे उत्तम सरबत आहे.**

**-वर्षा ब्रम्हपुरकर**

# मक्याचे टोस्ट



**साहित्य –** मक्याच्या कणसाचे दाणे, कांदे, टोमॅटो, आले, लसूण, तिखट, मीठ, हळद, तेल, जिरे, मोहोरी, ब्रेड, मैदा.


**कृती –** प्रथम दोन मोठे कांदे, टोमॅटो चिरून घ्या. मक्याचे दाणे मिक्सरमधून काढून घ्या. आता फोडणी तयार करा. गॅस वर कढलं ठेऊन त्यात तेल घाला. तेल गरम झाले की कांदा घाला चांगला लाल होईपर्यंत परतून घ्या. टोमॅटो घाला. आले लसूण पेस्ट घाला तिखट, हळद, मीठ घालून मिश्रण परता. वर कोथिंबीर व मक्याचे काही दाणे घालून मिश्रणाला फक्त एक वाफ द्या. झाले आता आत भरायचे मिश्रण तयार.

आता ब्रेडची दोन स्लाइस घेऊन मध्यभागातून गोल आकारात कापा. एका कापावर मिश्रणातचा गोळा ठेवा. वर दुसरा स्लाइस ठेऊन त्याच्या कडा मैदा पेस्टने बंद करून घ्याव्या जेणे करून टोस्ट तळताना आतील मिश्रण बाहेर येणार नाही. कढईत तेल गरम करून घ्यावे. तेल गरम झाले की मिश्रण भरलेले ब्रेड गरम तेलात सोडून तळून घ्यावे. झाले कुरकुरीत ब्रेड टोस्ट तयार. सॉस सोबत वाढावे.

**-कल्पना मापूसकर**

# गाबोळीचा रस्सा

**साहित्य:** पाव किलो गाबोळी, एक वाटी ओलं खोबरं, दोन चमचे कोथिंबीर, दोन हिरव्या मिरच्या,१२ पाकळ्या लसूण, अर्धा चमचा पेक्षा कमी धने, चार कोकम, तेल, अर्धी चमचा हळद, दोन चमचे सोनारी मसाला, मीठ आणि हिंग.



**कृती:** प्रथम गाबोळी स्वच्छ धुणे एका पातेल्यात घेणे. त्यात अर्धे पाणी घेणे. पाणी गरम करण्यास ठेवणे. गरम पाण्यात गाबोळी सोडणे. पंधरा मिनिटे चांगली शिजवून घेणे. शिजलेली गाबोळी काढून त्याचे सुरीने तुकडे करून घेणे. ओले खोबरे, कोथिंबीर, हिरवी मिरची, लसूण वाटून घेणे. पातेले तापायला ठेवणे. त्यात दोन मोठे चमचे तेल घालणे. तेल तापल्यावर त्यात चिमूटभर हिंग टाकणे. वाटलेले मिश्रण टाकणे. पाच मिनिटे परतणे. त्यात हळद, सोनारी मसाला टाकून दोन मिनिटे परतणे. दोन वाटी पाणी घालणे. पाच मिनिटानंतर गाबोळीचे तुकडे टाकणे. सात ते आठ मिनिटे शिजवून घेणे. कोकम व मीठ टाकून दोन ते तीन मिनिटं चांगली उकळी काढून घेणे.

**टीप: गाबोळी गरम पाण्यात शिजवल्यामुळे ती कालवणात फुटत नाही व हिवसपणा निघून जातो.**

**- गौरी धबडे**

# चारोळ्या

*शब्दच आले विसाव्याला*
*सजुनी कवितेत ते थकले*
*भावनेखातीर किती जुळावे*
*म्हणूनी रुसूनी बसले*

*ढग नभात दाटे हा पावसाळा*
*जरी संपवावे म्हंटले मी ऋतू आता*
*काठावरती येऊन छेडे*
*का मनास प्रेमऋतू आता*

*मी व्यक्त जाहले अजूनही नाही*
*सुख दु:ख मनोमनी अन् अजूनही काही*
*रातराणी अन् तो चंद्र नभातील*
*प्रेमात तुझ्या मी कविते देतील ग्वाही*

*प्राजक्ताचे आयुष्य कमी हे*
*दरवळे तरीही ओघळताना*
*सुख दु:खांचा हिशोब नव्हता*
*आवाजही नव्हता तुटताना*

**- निशा खरात**

**With best compliments from**

# Savani
## Heritage

**With best compliments from**

# BALAJI CHAVAN AND COMPANY

# मे. वामन शंकर मराठे प्रा. लि. ठाणे
# व
# वामन शंकर मराठे ज्वेलर्स ठाणे





## सहर्ष सादर करीत आहेत

### अभिनव सुवर्ण संचय
### डिस्काऊंट योजना





मे. वामन शंकर मराठे ज्वेलर्स प्रा. लि.
अभिवादन, १ ला मजला, शिवाजी पथ, ठाणे (प.)
दूरध्वनी : ०२२-२५४२२४९४/२५४२३३३७
मोबाईल : ९००४००७९५०
अवश्य भेट द्या : website : www.vsmarathe.com
Email : vsmarathe@gmail.com



---

★ वामन शंकर मराठे ज्वेलर्स ★
१ आणि २ पूजा विहार को. हौ. सो. राम मारूती क्रॉस रोड नं. ३, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२, दूरध्वनी : ०२२-२५४१९७८६

★ वामन शंकर मराठे ज्वेलर्स ★
१, अंकिता, नवघर रोड, मुलूंड जिमखान्या समोर, मुलूंड (पू.)
मुंबई - ४०० ०८१, दूरध्वनी : ०२२-२१६३५७६७

शुभ दिपावली

★ वामन शंकर मराठे ज्वेलर्स ★
बदलापूर, दूरध्वनी : ०२५१-२६९३७६७
Email :vsmarathejewellers@gmail.com
website : www.vsmarathe.com

शुभ दिपावली

**APPROVED GOLD VALUER**
**(GOVT. OF INDIA)**